सोलापूर तरुण भारत

# आसमंत



# सावध! ड्रॅगन सापळा रचतोय...

**अमेरिका-चीन दरम्यान सुरू असलेल्या व्यापार संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, चीनने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये निर्णायक बदल घडवून आणण्यास सुरुवात केली आहे. जगभरातील पुरवठा साखळीतील प्रभुत्व टिकवून ठेवण्यासाठी आणि अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांच्या संभाव्य परिणामांपासून संरक्षण मिळवण्यासाठी, चीन आता दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांशी 'सहकार्य' आणि 'मैत्री'च्या नावाने नवीन भूराजकीय डावाची मांडणी करत आहे. शी जिनपिंग यांचा आताचा व्हिएतनाम दौरा हा याच नव्या रणनीतीचा स्पष्ट निदर्शक मानावा लागेल.**

लक्ष्यवेध

कौस्तुभ वीरकर

अमेरिका-चीन दरम्यान सुरू असलेल्या व्यापार संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, चीनने आपल्या परराष्ट्र धोरणामध्ये निर्णायक बदल घडवून आणण्यास सुरुवात केली आहे. जगभरातील पुरवठा साखळीतील प्रभुत्व टिकवून ठेवण्यासाठी आणि अमेरिकेच्या आर्थिक निर्बंधांच्या संभाव्य परिणामांपासून संरक्षण मिळवण्यासाठी, चीन आता दक्षिण आशियातील शेजारी राष्ट्रांशी 'सहकार्य' आणि 'मैत्री'च्या नावाने नवीन भूराजकीय डावाची मांडणी करत आहे. शी जिनपिंग यांचा आताचा व्हिएतनाम दौरा हा याच नव्या रणनीतीचा स्पष्ट निदर्शक मानावा लागेल. या दौऱ्यादरम्यान झालेली परस्पर सहकार्याची घोषणा, संरक्षण करारांची शक्यता, हे सर्व चीनच्या एका स्पष्ट उद्देशाकडे निर्देश करतात. ती शक्यता म्हणजे, अमेरिकेच्या विरोधात प्रभावशाली सहकारी समूह उभा करणे.

अमेरिकेचे आयातशुल्क, तांत्रिक वस्तूंवरचे निर्बंध आणि पुरवठा साखळी धोरणांमुळे चीनवर मोठा दबाव निर्माण झाला आहे. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपल्या उत्पादन केंद्रांचे स्थलांतर व्हिएतनाम, भारत आणि इंडोनेशियाकडे करण्याचा विचारही सुरू केला आहे. या प्रक्रियेचा आर्थिक फटका चीनच्या निर्यात आधारित अर्थव्यवस्थेला बसू लागला आहे. परिणामी, चीनला आता केवळ व्यापारासाठी नव्हे, तर राजकीय विश्वासार्हतेसाठीही नवीन भागीदारांची निकड भासू लागली आहे. आशियातील देशांशी असलेले संबंध पुनरुज्जीवित करताना, चीन आपले जुने सीमावाद, दक्षिण चीन समुद्रातील दावे आणि द्विपक्षीय संघर्ष वगळण्याचा धूर्तपणा दाखवत आहे. कदाचित यातील काही बाबींवर एखाद्या देशाने जोर दिल्यास, चीन त्याला तात्त्विक मान्यताही देईल. तथापि, इतिहासाचा मागोवा घेतल्यास स्पष्ट होते की चीनची 'मैत्री' ही नेहमीच परिस्थितीजन्य आणि हितसंबंधाधिष्ठित राहिली आहे. चीनचे इस्पित साध्य झाल्यानंतर ही मैत्री 'धोकादायक' ठरू शकते.

भारताच्या बाबतीत चीनचे धोरण आणखीनच गुंतागुंतीचे आहे. एकीकडे गलवान संघर्षानंतर परस्पर संशय अधिक गडद झाला आहे, तर दुसरीकडे चीनला सध्या भारतासारख्या देशाची गरजही आहे. त्यामुळेच, पायघड्या घालताना 'आशियातील दोन मोठ्या अर्थव्यवस्था' म्हणत चीन भारताला स्वतःबरोबरचे स्थान देत आहे. पण, चीनला ज्ञात आहे की, भारताचे 'स्वायत्त धोरण' हा चीनच्या आशियातील आर्थिक महासत्ता होण्याच्या वाटचालीमधील एक महत्त्वपूर्ण अडथळा आहे. पण, आज चीनला अमेरिकेबरोबरच्या व्यापार युद्धाच्या पार्श्वभूमीवर भारतासारख्या देशाशी वैर घेणे परवडणारे नाही. म्हणूनच भारत सोबत नसला, तरी अमेरिकेच्या पक्षात जाऊ नये यासाठी चीन सध्या मृदूभाषेचा वापर करत आहे. मात्र, हे करत असताना प्रत्यक्षात मात्र चीनने सीमारेषेवरील दबाव कायम ठेवला आहे, हे विसरून चालणार नाही.

चीन आजही अनेक आंतरराष्ट्रीय मंचांवर स्वतःला 'विकसनशील देश' म्हणूनच सादर करतो. हा स्वतःतच एक धोरणात्मक विरोधाभास आहे. आर्थिक, सामरिक आणि तांत्रिक ताकद गाठलेला देश, जो आफ्रिका आणि आशियातील इतर देशांवर प्रभाव प्रस्थापित करत आहे, तो केवळ जबाबदाऱ्या टाळण्यासाठी आणि आर्थिक लाभ पदरात पाडून घेण्यासाठी हा मुखवटा वापरत आहे. ही भूमिका 'जागतिक समान विकासाच्या' कल्पनेला हरताळ फासते.

चीनच्या आंतरराष्ट्रीय सहकार्य धोरणाची पूर्वानुभूती घेतली असता, श्रीलंका आणि पाकिस्तानसारख्या देशांचा अनुभव फार बोलका ठरतो. चीनचे सहकार्य हे सहअस्तित्वापेक्षा राजकीय आणि आर्थिक दडपशाहीचे प्रतीक आहे. दक्षिण आशियातील देशांनी चीनच्या प्रस्तावित करारांकडे तत्कालिक लाभाच्या दृष्टीने न पाहता, दीर्घकालीन भूराजकीय आणि आर्थिक परिणामांची सखोल चिकित्सा केली पाहिजे. चीनचे सहकार्य अनेकदा राजनैतिक दबावाचे रूप घेते. ज्याक्षणी चीनला आपल्या सहकार्यांचा उपयोग संपल्यासारखा वाटतो, त्याक्षणी तो मैत्रीचे मुखवटे बाजूला ठेवतो. त्यामुळे आजचे लाभदायक सहकार्य उद्याचे धोरणात्मक बंधन ठरू नये, यासाठी आशियातील राष्ट्रांनी अधिक विवेकी आणि तटस्थ राजनैतिक दृष्टिकोन स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीनवर 'टेरिफ' बॉम्ब टाकल्यानंतर दोन्ही देशांमध्ये व्यापार युध्द सुरू झाले आहे. त्यातच आता चीनने भारता संबंधात आपली भूमिका नमती घेतल्याची चिन्हे दिसू लागली आहेत. चीनने यावर्षी केवळ तीन महिन्यांतच तब्बल ८५ हजार भारतीयांना व्हिसा दिला आहे. भारतासोबत राजकीय, आर्थिक, पर्यटन आदी मुद्द्यांवर संबंध सुधारण्यासाठी चीनकडून हे पाऊल उचलण्यात आल्याची चर्चा आहे. चीनची ही बदलती भूमिका त्याची गरज आहे की, त्यांचा सापळा आहे, हे ओळखणे गरजेचे आहे.

# मृगजळ की नवी सुरुवात?

**'जागतिक आरोग्य संघटने'ने नुकतेच एक महत्त्वाचे पाऊल उचलले. महामारी नियंत्रणासाठी एक आंतरराष्ट्रीय करार तयार करण्याबाबतचा प्रस्ताव या संघटनेने अंतिम केला आहे. या कराराचा उद्देश भविष्यातील साथरोगांचा धोका ओळखून, त्यावर तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी जागतिक सहकार्याची नवी चौकट निर्माण करणे हा आहे. या मसुद्यात प्रभावी लसीकरण, वैद्यकीय संशोधन, माहितीचे पारदर्शक आदानप्रदान आणि सार्वजनिक आरोग्य यंत्रणांतील समन्वय यासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले आहेत. पण, या प्रस्तावाची वेळ, स्वरूप, आणि त्यामागची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता, काही मूलभूत प्रश्न समोर येतात...**

वेधक

प्रतिनिधी

'जागतिक आरोग्य संघटन'ने नुकतेच एक महत्त्वाचे पाऊल उचलले. महामारी नियंत्रणासाठी एक आंतरराष्ट्रीय करार तयार करण्याबाबतचा प्रस्ताव या संघटनेने अंतिम केला आहे. या कराराचा उद्देश भविष्यातील साथरोगांचा धोका ओळखून, त्यावर तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी जागतिक सहकार्याची नवी चौकट निर्माण करणे हा आहे. या मसुद्यात प्रभावी लसीकरण, वैद्यकीय संशोधन, माहितीचे पारदर्शक आदानप्रदान आणि सार्वजनिक आरोग्य यंत्रणांतील समन्वय यासंबंधी काही महत्त्वाचे मुद्दे मांडले गेले आहेत. पण, या प्रस्तावाची वेळ, स्वरूप, आणि त्यामागची ऐतिहासिक पार्श्वभूमी पाहता, काही मूलभूत प्रश्न समोर येतात.

'कोविड-१९' या जागतिक महामारीत 'जागतिक आरोग्य संघटने'ची भूमिका वादग्रस्त ठरली. २०१९च्या शेवटी चीनमध्ये 'कोरोना' विषाणूचा प्रादुर्भाव सुरू झाला, तेव्हा आरोग्य संघटनेने त्या देशाकडून मिळालेल्या अपूर्ण आणि अनेकदा दिशाभूल करणार्या माहितीवरच आपले प्राथमिक निष्कर्ष मांडले. यामुळे अनेक देशांनी प्रारंभीच्या टप्प्यातील योग्य ती तयारी करण्याची संधी गमावली. त्याचवेळी लसींच्या वाटपाच्या प्रक्रियेतही संघटनेने अपेक्षेपेक्षा कमी सक्रियता दाखवली. 'कोवॅक्स' योजनेद्वारे गरीब आणि विकसनशील देशांना लसवाटप करण्याचा उद्देश असला तरी, प्रत्यक्षात विकसनशील देशांना प्रत्यक्ष लस मिळण्यास मोठाच विलंब झाला. अनेक प्रगत राष्ट्रांनी स्वतःसाठी लसींचा साठा करून ठेवला आणि 'जागतिक आरोग्य संघटना' या असमतोलावर केवळ औपचारिक चिंताच व्यक्त करत राहिली. तसेच विकसित राष्ट्रांच्या लसींना मिळणारी मान्यता आणि विकसनशील राष्ट्रांच्या लसींना मिळणारी मान्यता, यामध्ये कालावधीचा मोठा फरक होता. नवीन कराराचा मसुदा तयार होण्यासाठीही सुमारे तीन वर्षे लागली. हा कालावधीच 'जागतिक आरोग्य संघटने'च्या कार्यक्षमतेवर प्रश्न उपस्थित करणारा आहे.

'कोविड'नंतर जागतिक पातळीवर 'जागतिक आरोग्य संघटने'च्या विश्वासार्हतेला मोठा धक्का बसला. अनेक देशांना वाटते की, ही संस्था काही प्रभावशाली राष्ट्रांच्या दबावाखाली निर्णय घेते. तिच्या निधीचा मोठा हिस्सा काही मोजक्या देशांकडून येतो आणि त्यामुळे संस्था संपूर्णपणे स्वायत्त आहे का? हा प्रश्न नेहमीच उपस्थित होतो. हेच कारण आहे की, 'जागतिक आरोग्य संघटने'ने मांडलेल्या या नव्या 'महामारी करारा'च्या प्रस्तावाकडे जग संशयानेच पाहते आहे. या करारात असलेल्या चांगल्या उद्दिष्टांचीही अंमलबजावणी किती प्रभावीपणे होईल, हा एक वेगळाच प्रश्न.

१९४८ साली स्थापन झालेली 'जागतिक आरोग्य संघटना' ही संयुक्त राष्ट्रांच्या अधिपत्याखालील सर्वांत महत्त्वाची संस्था मानली जाते. तिची स्थापना सार्वजनिक आरोग्याची जागतिक समन्वयक संस्था म्हणून झाली.

या संस्थेने लसीकरण कार्यक्रम, मलेरिया नियंत्रण, पोलिओ निर्मूलन, एड्सविरोधी मोहिमा आणि सार्स व इबोलासारख्या साथींवर महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

(पान ४ वर)





# इमामांवर बंगाली 'ममता'

**प. बंगाल हा तर धर्मांधांचा बालेकिल्लाच! त्यातही मुर्शिदाबाद जिल्ह्यात ६६ टक्क्यांहून अधिक लोकसंख्या ही मुस्लिमांची आणि ३४ टक्क्यांसह हिंदू तिथे अल्पसंख्याक. मग काय, मुर्शिदाबादमध्ये धर्मांधांनी रस्त्यावर उतरून अक्षरशः थैमान घातले. नासधूस केली. जाळपोळ करून अख्खा जिल्हाच वेठीस धरला. नुकतेच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी कोलकात्यात इमामांची बैठक घेऊन शांततेचे आवाहन केले. म्हणजे, ज्यांच्यावर अन्याय-अत्याचार झाले, त्या पीडितांपेक्षा, त्या अन्यायासाठी उकसवणार्यांसमोर ममतादीदींनी नांगी टाकली. हिंदूंचे कितीही रक्त सांडले, तरी मुस्लीम लांगूलचालन हीच दीदींची राज्यनीती! त्यामुळे हिंदू जीवानीशी गेले, तरी इमामांवरची ही बंगाली 'ममता' कधीही आटणार नाही, हेच खरे!**

दखल

विजय कुलकर्णी

वक्फ सुधारणा कायद्या'ला मंजुरी मिळताच अपेक्षेप्रमाणे त्याविरोधात मुसलमानांची माथी भडकावून देशभरात ठिकठिकाणी दंगली उसळतील, याची पद्धतशीर तजवीज करण्यात आली. प. बंगाल हा तर धर्मांधांचा बालेकिल्लाच! मग काय, मुर्शिदाबादमध्ये धर्मांधांनी रस्त्यावर उतरून अक्षरशः थैमान घातले. नासधूस केली. जाळपोळ करून अख्खा जिल्हाच वेठीस धरला. मात्र, नागपूर दंगलीप्रमाणे अगदी सुनियोजित षड्यंत्रांतर्गत हिंदूंचीच घरे, दुकाने, वाहने लक्ष्य करण्यात आली. परिणामी, ४०० हून अधिक हिंदू कुटुंबांवर जीव मुठीत घेऊन पलायनाची वेळ आली. त्यात आता या हिंसाचारात बांगलादेशींचा सहभाग असल्याचा प्राथमिक चौकशीचा अहवाल केंद्र सरकारला सादर करण्यात आला आहे. पण, यावर प. बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी केंद्र सरकार आणि गृहमंत्रालयावरच खापर फोडले. बांगलादेशी घुसखोरांनी बंगालमध्ये घुसून दंगल पेटवली आणि ते पुन्हा सीमेपार गेले, हे सीमा सुरक्षा दलाचेच अपयश म्हणून ममतादीदींनी बांगलादेशी घुसखोरांना पाठीशी घालण्याचाच निलाजरेपणा दाखवला. म्हणजे, राज्याच्या सुरक्षेत झालेल्या अक्षम्य चुकीची जबाबदारीही मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी स्वीकारायला तयार नाहीत. उलट सीमासुरक्षेच्या मुद्द्यावरून केंद्र सरकारलाच दुषणे देण्याचे उद्योग करणे म्हणजे चोराच्या उलट्या बोंबाच! प. बंगालमध्ये केंद्रीय सुरक्षा दलाच्या फौजा तैनात केल्यामुळे परिस्थिती नियंत्रणात असली तरी, यामुळे राष्ट्रीय सुरक्षेचा गंभीर प्रश्न उपस्थित झाला. त्यातही हिंदू हे बांगलादेशातच नाही, तर आता बंगालमध्येही सुरक्षित नसल्याचे ममतांच्या राजवटीत पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. पण, ममतांना पीडित हिंदूंपेक्षा चिंता सतावते ती दंगेखोरांवर कारवाई केली, तर इमाम दुखावायला नको याची! म्हणूनच काल त्यांनी कोलकात्यात इमामांची बैठक घेऊन शांततेचे आवाहन केले. म्हणजे, ज्यांच्यावर अन्याय-अत्याचार झाले, त्या पीडितांपेक्षा, त्या अन्यायासाठी उकसवणार्यांसमोर ममतादीदींनी नांगी टाकली. हिंदूंचे कितीही रक्त सांडले, तरी मुस्लीम लांगूलचालन हीच दीदींची राज्यनीती! त्यामुळे हिंदू जीवानीशी गेले, तरी इमामांवरची ही बंगाली 'ममता' कधीही आटणार नाही, हेच खरे!

चोर सोडून संन्याशाला फाशी' हेच ममता बॅनर्जींचे मुख्यमंत्रिपद स्वीकारल्यापासूनचे धोरण. त्यामुळे 'सीएए', 'एनआरसी'विरोधी आंदोलने असो अथवा आता 'वक्फ'विरोधी आंदोलन, ममता बॅनर्जींनी कायमच मुस्लिमांना झुकते माप दिले. जणू आपण केवळ एकाच समाजाच्या, धर्माच्या मुख्यमंत्री आहोत आणि त्या समाजामुळेच आपली खुर्ची आजवर टिकून आहे, इतक्या ममतादीदी मुस्लीम मतांच्या ओझ्याखाली दबलेल्या. मुर्शिदाबाद दंगलीनंतरही तेथील हिंदू पीडितांना भेट देण्याचे ममतादीदींनी टाळले. आता मुर्शिदाबाद ते राजधानी कोलकाता हे अंतर जवळपास २१६ किमी. मुख्यमंत्री म्हणून दीदींच्या दिमतीला हेलिकॉप्टर आहेच. म्हणजे रस्त्याने हे अंतर कापायला साधारण पाचएक तास लागत असतील, तर तेच अंतर दीदी कोलकात्यावरून अवघ्या एक-दीड तासांत हेलिकॉप्टरने सहज गाठू शकत होत्या.

पीडितांचे सांत्वन करून सत्यपरिस्थिती समजून घेणे हे मुख्यमंत्री म्हणून त्यांचे राजनैतिक कर्तव्यच! तसेच यानिमित्ताने मुर्शिदाबादमध्ये प्रत्यक्ष जाऊन कायदा-सुव्यवस्थेच्या स्थितीचा आढावा घेतला असता, तर या दंगलीमागचे वास्तव दीदींनाही कळले असते. पण, तिथे गेल्यावर जे कटू सत्य कानी पडले असते, ते पचवण्याची, त्याला सामोरे जाण्याची आणि दोषींवर कारवाईची दीदींची मुळी मानसिकताच नाही. त्यात दीदी या राज्याच्या गृहमंत्रीदेखील आहेत. त्यामुळे दंगलीची खडान्खडा माहिती त्यांच्यापर्यंत पोहोचली नसेल, हे मानणे भाबडेपणाचे ठरावे. दंगलीच्या सगळ्या ज्ञात-अज्ञात कंगोर्यांची माहिती असताना, मग प्रत्यक्ष पीडित हिंदूंप्रति सहानुभूती दाखवलीच, तर मुस्लीम मतपेढी दुखावेल, म्हणून दीदींनी पीडितांपेक्षा इमामांनाच जवळ केले. आता पीडितांसाठी दीदींनी काहीच केले नाही, असे विरोधकांनी म्हणायला नको, म्हणून लगोलग दंगलीतील मृतांच्या नातेवाईकांना दहा लाखांची मदत जाहीर करून दीदींनी हात वर केले. तसेच, ज्यांच्या घरांचे नुकसान झाले, त्यांना सरकारी योजनेतून घरे बांधून देण्याचे आणि दुकानांचा पंचनामा करून मुख्य सचिवांना नुकसान भरपाईचे आदेश दिले. पण, पीडितांना, त्यांच्या कुटुंबीयांना केवळ आर्थिक मदत जाहीर करून ममतादीदी घडल्या प्रकाराची जबाबदारी कदापि झटकू शकत नाही. त्यामुळे हिंदूंच्या जीवितासाठी बंगालमध्ये राष्ट्रपती राजवट हाच आता अंतिम पर्याय!

# एक तरफ बंदूके दन दन एक तरफ थी टोलियाँ



एक विमान दि. १३ एप्रिल १९१९ रोजी दुपारी अमृतसर शहरावरून चक्कर मारून गेले. पंजाबच्या बैसाखी सणाचा तो दिवस होता. खुद्द शहरातले आणि आजूबाजूच्या परिसरातले हजारो स्त्री-पुरुष अमृतसरच्या प्रख्यात सुवर्ण मंदिरात येत-जात होते. तिथून जवळच असलेल्या जालियाँवाला बाग (जालियानवाला बाग हा चुकीचा, भ्रष्ट इंग्रजी उच्चार) या मैदानाकडे सरकत होते. संध्याकाळी ४.३० वाजता तिथे एक सभा होणार होती.

अमृतसरचा मिलिटरी कमांडंट कर्नल (तात्पुरता ब्रिगेडियर जनरल) रेजिनाल्ड डायर हे वृत्त ऐकून खवळला. त्याने सकाळीच शहरात संचारबंदी जारी केली होती. बैसाखी सणाला अमृतसरला घोड्यांचा आणि गुरांचा मोठा बाजार भरायचा. दुपारी २ वाजता डायरच्या सैनिकांनी तो बाजार बंद करायला लावला. साहजिकच तिथले रिकामे लोकही जालियाँवाला बागेकडे वळले. गुप्तचरांकडून डायरकडे सूचना येऊ लागल्या की, हजारो हिंदू, मुसलमान आणि शीख लोक जालियाँवाला बागेत गोळा झालेत. वातावरण तप्त आहे. जमलेल्या लोकांची गर्दी नेमकी कितीशी आहे, याचा अंदाज घेण्यासाठी डायरने चक्क विमान पाठवले. ठरल्याप्रमाणे ४.३० वाजता सभा सुरू झाली. संतापलेला डायर ९० सैनिकांनिशी तिथे येऊन पोचला. ५० सैनिकांकडे ३०३ ली-एनफिल्ड रायफल्स होत्या. (नंतर या बंदुकीला थ्री नॉट थ्री म्हणू लागले.) शिवाय त्याच्याबरोबर दोन चिलखती गाड्या होत्या नि प्रत्येकीत एकेक मशीनगन होती. जालियाँवाला बाग ही जागा सर्व बाजूंनी ३ ते ४ मजली इमारतींनी वेढलेली आणि मध्य सुमारे ६-६॥ एकर मोकळे मैदान अशा स्वरूपाची होती. त्या मैदानात एक विहीरही होती. सुवर्ण मंदिरापासून अगदी जवळच ही बाग आहे.

डायरच्या ताफ्यातल्या चिलखती गाड्यांना जालियाँवाला बागेकडे जाणाऱ्या अरुंद गल्लीतून आत शिरता येईना. म्हणून त्यांना तिथेच थांबवून नाकाबंदी करण्यात आली. स्वतः डायर आणि अमृतसर शहराचा डेप्युटी कमिशनर आयर्व्हिंग, ५० बंदूकधारी सैनिकांसह बागेत शिरले. समोर किमान १० हजार निःशस्त्र लोक शांतपणे भाषण ऐकत होते. पोलिस किंवा सैनिकांनी जमावाला कसे हाताळावे याचे काही संकेत आहेत. प्रथम तोंडी सूचना द्यायच्या असतात. त्या न पाळल्या गेल्यास लाठीमार आणि त्याचाही उपयोग न झाल्यास गोळीबार असे टप्पे असतात. गोळ्याही जमावाच्या खालच्या बाजूला झाडायच्या असतात. म्हणजे जमाव जखमी व्हावा, त्याला जरब बसावी, पण शक्यतो माणसे मरू नयेत. डायरने यातले काहीही न करता सरळ हुकूम दिला, 'फायर.!' युद्धात, युद्धासाठी वापरल्या जाणाऱ्या बंदुका दणादण वाजू लागल्या. समोरच्या किमान १० हजार लोकांच्या हातात मात्र कोणतेही शस्त्र नव्हते. अखंड १० मिनिटे अविरत गोळीबार सुरू होता. काडतुसे संपली तेव्हाच गोळीबार बंद झाला. असा हा प्रचंड पराक्रम गाजवून डायर आणि आयर्व्हिंग आपल्या शिबंदीसह निघून गेले. नशीब एवढेच की, मशीनगन्स अरुंद रस्त्यामुळे आत नेता आल्या नाहीत. अन्यथा त्याने मुडद्यांच्या राशीच रचल्या असत्या.

स्वतःला सुधारलेले, प्रागतिक, आधुनिक वगैरे म्हणवून घेणाऱ्या या इंग्रजांची मनोवृत्ती मध्ययुगीनच होती. प्रतिपक्षाला नामोहरम करायचेय ना; मग बेछूट कत्तल करा. त्याशिवाय त्यांना कळायची नाही आपली ताकद! मध्ययुगात याच मनोवृत्तीतून चंगेजखान, तैमूरलंग, नादिरशहा यासारख्या कत्तलबाजांनी शत्रूच्या मुंडक्यांचे मनोरे रचले नि रक्तामांसाचा चिखल केला. जालियाँवाला बाग हत्याकांड प्रत्यक्ष घडवणारा रेजिनाल्ड डायर आणि त्याला अशी काहीतरी जबरदस्त कारवाई करण्याची प्रेरणा देणारा पंजाब प्रांताचा गव्हर्नर सर मायकेल ओडवायर या दोघांची मनोवृत्ती तशीच होती. अमृतसरच्या या भयंकर हत्याकांडाच्या बातम्या भारतभर पोचल्या आणि दुःख-संतापाचा एकच कहर उसळला. अमृतसरचा सिटी सिव्हिल सर्जन, जो स्वतःच एक इंग्रज होता, तो मृतांचा आकडा एक हजार सांगत असताना, सरकार मात्र अधिकृतपणे ३०० लोक मृत असे म्हणत होते. स्वामी श्रद्धानंदांनी गांधीजींना लिहिलेल्या पत्रात १५०० मृत असे म्हटले होते. वृत्तपत्रांमधून आणि सभांमधून ओडवायर, डायर आणि एकंदरीतच इंग्रज सरकारविरुद्ध प्रचंड गदारोळ झाला. ब्रिटिश संसदेत या विषयावर जोरदार चर्चा झाली. खुद्द युद्धमंत्री विन्स्टन चर्चिल याने भारत सरकारच्या या कृत्याची 'सैतानी कृत्य' या शब्दांत संभावना केली. परिणामी डायरला सैन्यातून बरखास्त करण्यात आले आणि ओडवायरलाही इंडियन सिव्हिल सर्व्हिसमधून काढून मायदेशी बोलावण्यात आले. मात्र याखेरीज आणखी कसलीही त्या दोघांवरही करण्यात आली नाही. साहजिकच सत्तेचा माज चढलेले ते दोघेही जण, 'आम्ही जे काही केले ते ब्रिटिश साम्राज्याच्या हिताच्या दृष्टीने योग्यच होते, असेच म्हणत राहिले. त्यातही मायकेल ओडवायर हा जास्तच उर्मट आणि माजुर्डा होता.



१३ एप्रिलच्या घटनेने देशभर प्रचंड अस्वस्थता होती. दोनच दिवसांनी म्हणजे १५ एप्रिल १९१९ रोजी पंजाब प्रांतातच गुजरानवाला या शहरात दंगा सुरू झाला. ओडवायरने सरळ रॉयल एअर फोर्सला पाचारण केले आणि सांगितले, 'विमानातून मशीनगन्स चालवा. तेवढ्याने भागले नाही तर दंगेखोरांवर बॉम्ब टाका.' वायुदलाने हुकूमाची अंमलबजावणी केली. १२ जण ठार झाले नि २७ जखमी झाले. हेदेखील सरकारी आकडे आहेत. परंतु रेजिनाल्ड डायर आणि मायकेल ओडवायर यांचा हा माजोरीपणा आणि संताप मुळात एका भयातून निर्माण झाला होता. ते भय म्हणजे, भारतात इंग्रजी राजवटीविरुद्ध १८५७ सालप्रमाणेच काहीतरी जबरदस्त क्रांती होणार आहे, अशी चाहूल त्यांना लागली होती. १८५७ ची क्रांती दडपून टाकल्यावर इंग्रजांनी ईस्ट इंडिया कंपनीचे बाहुले बाजूला करून रीतसरपणे भारताचा राज्य कारभार ब्रिटिश पार्लमेंटच्या हाती घेतला. एक अत्यंत बलवान आणि सूक्ष्म असे राज्ययंत्र स्थापित करून त्यांनी पुढची ४०-४५ वर्षे भारताची मनसोक्त लूट केली. पण हे सदासर्वकाळ जमेल याची त्यांना शाश्वती वाटेना. १९०५ साली व्हॉईसरॉय कर्झनने बंगालची फाळणी याचसाठी तर केली. पण तो उद्योग चांगलाच अंगाशी आला.

आतापर्यंत असंघटित असलेला भारत उलट वेगाने संघटित होऊ लागला. इंग्रजांच्या दृष्टीने डोकेदुखी असणारे महाराष्ट्र, बंगाल आणि पंजाब हे प्रांत तर भलतेच सक्रिय झाले. अखेर १९११ मध्ये इंग्रजांना नाईलाजाने बंगालची फाळणी रद्द करावी लागली. यामुळे उत्साहित झालेल्या क्रांतिकारकांनी १९१२ साली खुद्द व्हॉईसरॉय लॉर्ड हार्डिंजवर बॉम्ब फेकला. पंजाबचे लाला हरदयाळ आणि बंगालचे रासबिहारी बसू हे युरोप-अमेरिकेतून काहीतरी जबरदस्त क्रांतियुद्ध पेटवण्याच्या प्रयत्नात असल्याच्या बातम्या इंग्रजांना त्यांच्या गुप्तहेरांकडून मिळत होत्या. तेवढ्यात म्हणजे १९१४ साली युरोपात महायुद्ध पेटले. या युद्धात भारतीय क्रांतिकारक जर्मनी-तुर्कस्तान यांना मदतीला घेऊन अफगाणिस्तानमार्गे भारतावर लष्करी हल्ला करण्याचीही शक्यता इंग्रजांना वाटत होती. याचा बंदोबस्त करण्यासाठी १९१५ साली इंग्रजांनी 'डिफेन्स ऑफ इंडिया अ‍ॅक्ट-१९१५' नावाचा एक कायदा पारित करून घेतला. कुणाही व्यक्तीला बिना वॉरंट अटक करण्याचा आणि बिना चौकशी कितीही काळ तुरुंगात डांबून ठेवण्याचा अधिकार या कायद्याने सरकारला मिळाला.

१९१८ साली महायुद्ध संपले. जर्मनी-तुर्कस्तान पराभूत झाले, पण भारतीय क्रांतिकारकांची गुप्त 'गदर पार्टी' म्हणजे क्रांती पक्ष याच्या कारवाया थांबेनात. गदरवाले भारतीय सैन्यात उठाव घडवून आणणार, अशा खबरा इंग्रजांना मिळू लागल्या. याचा बंदोबस्त करण्यासाठी न्यायाधीश सर सिडने रौलेट याच्या कमिशनने डिफेन्स ऑफ इंडिया अ‍ॅक्ट-१९१५ मध्ये आणखी काही कडक नियम लावले. १९१९ च्या मार्चमध्ये हा नवा रौलेट अ‍ॅक्ट लागू झाला. त्याच्या विरोधात देशभर कडक हरताळ आणि निदर्शने झाली. पंजाब प्रांतात रौलेट अ‍ॅक्टविरोधी निदर्शन करणारे काँग्रेसचे दोन मान्यवर नेते सत्यपाल आणि डॉ. किचलू यांना सरकारने पकडले आणि अज्ञातस्थळी अटकेत ठेवले. वातावरण त्यामुळे अधिकच तापले. येत्या बैसाखी सणाला प्रांतभर काहीतरी जबरदस्त घडणार. १८५७ सारखी क्रांतीदेखील होऊ शकते, अशा खबरा गुप्तचरांकडून मिळत गेल्यामुळे बहुधा ओडवायर आणि डायर आणखी-आणखी पिसाटत गेले. इंग्रजी साम्राज्याविरुद्ध बंड करण्याची हिंमत करतात हे भारतीय? दाखवूयाच यांना इंग्रजी साम्राज्याची ताकद. म्हणजे बंड होण्याचे भय, स्वतःच्या शक्तीचा माज आणि गुलाम भारतीयांबद्दलची जन्मजात तुच्छता, यातून ही कृती घडली.कवी प्रदीप यांच्या शब्दात आपण त्या हुतात्म्यांचे पुण्यस्मरण करू या-

**जलियाँवाला बाग ये देखो यहीं चली थी गोलियां ये मत पूछो किसने खेली यहाँ खून की होलियां एक तरफ़ बंदूकें दन दन एक तरफ़ थी टोलियां मरनेवाले बोल रहे थे इंक़लाब की बोलियां यहां लगा दी बहनों ने भी बाजी अपनी जान की इस मिट्टी से तिलक करो ये धरती है बलिदान की वंदे मातरम, वंदे मातरम...!**

(लेखक प्रसिद्ध स्तंभलेखक आहेत.)

---

## सुखात्म

### डॉ. अविनाश मोहरील

विचारांचे काही तार कसे जुळतात, याचे काही आखीव गणित नाही. माणसाची विचार प्रक्रिया ही एक अतिशय गूढ व अतर्क्य व्यवस्था आहे. कोणत्या संदर्भाने कोणता विचार कोठे जोडला जाईल, याचा काहीच अंदाज बांधता येत नाही. या विचार जुळणीला स्थळ-काळाचेही बंधन नाही. असाच एक अनुभव मला नुकताच आला व खूप वर्षांपूर्वी ऐकलेल्या एका अफाट संकल्पनेशी मी जोडला गेलो. ती संकल्पना म्हणजे ग्रे.

बऱ्याच दिवसांनंतर घराला रंग देण्याचे ठरले. आता नव्या काळात रंग देणे ही एक नवी प्रक्रिया आहे. जुन्याकाळी घराला रंग देताना घरातले बाबा सफेदी मारून घ्यायचे आणि घर सजून जायचे. परंतु आता मात्र रंगाचे जगच बदलले. आपल्या घराला रंग द्यायचा म्हटल्यावर घरातील प्रत्येकाचे मत तयार होते. रंगाचे जग बदलले तसे घराघरातील वातावरणदेखील बदलले. लोकशाही पद्धतीने प्रत्येकाने आपापल्या खोल्यांचे रंग ठरविणे सुरू केले. यामध्ये घरापासून नोकरीच्या निमित्ताने दूर असलेलीदेखील सर्व मंडळी ऑनलाईन सामील झाली व रंगाबाबत महाचर्चा घडू लागल्या. यामध्ये घराच्या बाहेरून देण्याच्या रंगासंबंधी सूचना करताना माझा भाऊ म्हणाला की, आपण ग्रे फॅमिलीमधील रंग निवडूया. रंगांच्या या नव्या दुनियेत एक अडचण अजून जाते, ती म्हणजे रंगांच्या नावांची. आपल्याला इंद्रधनुषी 'ता ना पि हि अ नि जा' (तांबडा, नारिंगी, पिवळा, हिरवा, अस्मानी, निळा व जांभळा, मुद्दाम नव्या पिढीच्या वाचकांना समजावे म्हणून) हे ठळक रंग ठाऊक होते. आता या रंगाच्या रंगीत दुनियेत रंग दोनच नावाने ओळखला जातो. शॅडो डान्स किंवा ८०८३. आता हे दोन्ही प्रकार आपल्याला कळत नाहीत. एका बिंदूनंतर तर सर्वच रंग सारखे वाटून सर्वच आवडायला लागतात. अशावेळी भावाने ग्रे फॅमिली म्हटल्यावर काळ्यापासून तो पांढऱ्याशुभ्र रंगापर्यंतचे वेगवेगळे २० ते २५ शेड मी बघायला लागलो. सहजच बोलून गेलो, 'किती कमी फरक आहे या रंगांमध्ये, पण फरक आहे.' अचानक माझ्या विचारप्रक्रियेमध्ये साधारण १५ वर्षांपूर्वी मी ऐकलेल्या एका संकल्पनेची आठवण झाली. मी पुन्हा म्हणालो, 'इतकेच काय, या ग्रे फॅमिलीत तर अजूनही खूप शेड असतात.' मनाने मी पोहोचलो होतो थेट म्हैसूरला, एका आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये, जेथे लंडनहून आलेल्या डॉ. सॅम्युअल डोरेक्स या प्रसिद्ध मानसोपचार तज्ज्ञाने सादर केलेले एक संशोधन सादरीकरण मला आठवले; ज्याचे शीर्षक होते Mahabharata : A journey from black to white via many shades of grey. एक अतिशय अफलातून संशोधन त्या डॉ. सॅम्युअलने केले होते, ज्यामध्ये त्याने महाभारतातील विविध व्यक्तिरेखांचा अभ्यास मांडताना त्या व्यक्तिरेखांमधील वेगवेगळे मानसिक पैलू या ग्रे रंगाच्या विविध छटांशी तुलना करून विषद केले होते. मानवी मनाचा अभ्यास हा अतिशय गुंतागुंतीचा प्रकार असतो व त्यात महाभारतासारख्या महाग्रंथामध्ये तर मानवी मनाचे सारे पैलू दर्शविणाऱ्या वेगवेगळ्या व्यक्तिरेखा आहेत. या सर्व व्यक्तिरेखा व त्यांची मनोभूमिका ही काळ्याकडून पांढऱ्या रंगाकडे होणाऱ्या प्रवासाचे द्योतक आहे. या दोन टोकांमध्ये वेगवेगळ्या ग्रे छटा दाखविणाऱ्या व्यक्तिरेखा आहेत. काळ्या रंगाचे प्रतिनिधित्व करणारी सर्वात प्रभावशाली व्यक्तिरेखा म्हणजे दुर्योधन, जो कपट, असूया, मत्सर यासारख्या दुर्गुणांचे प्रतीक आहे व सर्वात शुभ्र अशी व्यक्तिरेखा म्हणजे धर्मराज युधिष्ठिर, जो सद्गुणांचा समुच्चय असलेल्या मनोभूमिकेचे प्रतीक आहे. कुणाचे काळ्या रंगाकडे झुकते माप आहे तर कुणाचे पांढऱ्या रंगाकडे. वाईट मनोभूमिका असलेल्या काही व्यक्तिरेखा काही क्षणांना चांगुलपणा दाखवतात. जसे कर्णाची व्यक्तिरेखा, तर काही शुभ्रतेच्या जवळ असूनही परिस्थितीने बांधल्या गेल्यामुळे ग्रे झालेली व्यक्तिरेखा जसे भीष्म पितामह. महाभारतातील वेगवेगळ्या व्यक्तिरेखांचा ग्रे रंगातील विविध छटांच्या दृष्टीने केलेला तो अभ्यास आम्हा सर्वांना चकित करून गेला. सर्व महत्त्वाच्या व्यक्तिरेखांचे विश्लेषण केल्यावर सर्वात जास्त रोचकतेने त्यांनी सादर केला कृष्णाच्या व्यक्तिमत्त्वाचे प्रतिनिधित्व करणारा ग्रे. कृष्णाचा सावळा रंग अनेकांना आकर्षक वाटतो; किंबहुना बरेच वेळा पांढऱ्याशुभ्र रंगापेक्षाही त्याला उजवे माप मिळते. कारण कृष्ण मानवी जगण्याच्या व्यावहारिक संदर्भांचे सर्वोत्तम उदाहरण ठरतो.




चांगल्याचाच विजय व्हावा याकरिता प्रयत्नशील, परंतु त्याकरिता वाईटाचा निःपात करताना केलेले कारस्थानदेखील समर्थनीय ठरविणारा विचारवंत. माणसाच्या जगण्याच्या सर्व अवस्थांचा बारकाईने अभ्यास असणारा तत्त्वज्ञ, प्रसंगी बुद्धीचा वापर करून मानवी भावनांना वापरून घेऊन कार्य सिद्धीस नेणारा प्रशासक. शस्त्र हातात न घेण्याची प्रतिज्ञा करून ती शेवटपर्यंत निभावणारा सच्चा व्यक्ती, प्रसंगी आपल्या जवळील शक्तीच्या धाकाने कुप्रवृत्तींना काबूत ठेवण्याची क्षमता असलेला योद्धा. तसेच त्या कुप्रवृत्तींचा नायनाट करण्यासाठी अनेक वीरांना शस्त्र उचलून लढायला लावणारा नेता. पांडवांच्या सद्प्रवृत्तीला जगासमोर ठेवण्यासाठी शिष्टाई करून कौरवांना परत एक संधी देण्यासाठी गेलेला विचारदूत तर झालेल्या अपमानाचा सूड घेतला जाईल, असे वचन द्रौपदीला देणारा तिचा सखा. कृष्णाच्या या ग्रे रंगाचे कितीतरी प्रकारे वर्णन करता येऊ शकते. आजच्या या नव्या जगतात कृष्णाच्या ग्रे रंगाचेच अनुसरण माणसाचे आयुष्य सुखमयी करू शकते, असा निष्कर्ष डॉ. सॅम्युअल यांनी काढला होता. किती खरे होते त्यांचे म्हणणे. रामाच्या ठायी असलेला आदर्शवाद हे आपल्या सर्वांचे जीवनध्येय असायलाच हवे, परंतु त्या ध्येयापर्यंत जाण्यासाठी जो जीवन मार्ग अवलंबावा लागतो त्याकरिता मात्र कृष्णाचा ग्रे कामात येतो. नवे जग हे व्यावहारिक व उपयोगीतावादी बनते आहे. त्या दिशेने झपाट्याने होणारी वाटचाल आपल्यापैकी कुणालाही थांबविता येणे आता शक्यच नाही. हे सारे आधुनिकीकरणाचे सहपरिणाम असतात व त्यांना सामोरे जावे लागतेच. त्यासाठी आपली इच्छा आहे अथवा नाही हा पर्याय उपलब्ध नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने माणूसपण निभावताना रामाच्या किंवा युधिष्ठिराच्या शुभ्रतेचा आदर्श ठेवूनच मार्गक्रमण करावे लागते. कारण ते आदर्श ध्येयच माणसाला इतर प्राणिमात्रांपेक्षा वेगळे अस्तित्व प्रदान करते. त्या मार्गावर आपला हात धरून आपल्याला मदत करतो कृष्णाचा व्यावहारिक व भावनिकतेचे उत्कृष्ट संमिश्रण असलेला ग्रे. तो ग्रे आपल्याला सुख म्हणजे काय हे सांगतो, तो आपल्याला आनंद कसा मिळवायचा ते सांगतो. तो आपल्याला निराशा पदरी न येण्यासाठी माणसे वाचायला शिकवितो व त्यानुसार आपले वर्तन करायला शिकवितो. तो आपल्याला उदात्त विचार करायला शिकवितो, पण तो उदात्त विचार सोसण्याची क्षमता असलेल्यापर्यंतच नेण्याचे चातुर्य देतो. तो आपल्याला समर्पण शिकवितो, परंतु आपल्यासोबत कृतघ्नतेने व बदमाशीने वागणाऱ्यांशी जशास तसे वागण्याची कला शिकवितो. तो आपल्याला प्रेम करायला शिकवितो, परंतु प्रेमाला जीवनाचा आधार कसा बनवायचा हेदेखील सांगतो. तो आपल्याला आत्मिक एकरूपतेचा मार्ग सांगतो, परंतु ती आत्मिक एकरूपता भौतिकतेचा मजबूत आधार घेऊनच प्राप्त होते, ही वैचारिक योग्यता प्रदान करतो. तो आपल्याला मित्र बनायला शिकवतो, परंतु त्या मित्राचे सख्यामध्ये रूपांतरही तोच करवितो. असा वैशिष्ट्यपूर्ण ग्रे जो कृष्णाच्या आकर्षक सावळ्या रंगाशी साधर्म्य ठेवतो तो आपल्या जीवनामध्ये सम्मिलित करून त्या रंगात रंगून जावेः त्या ग्रेच्या अनेक आनंदलहरी आयुष्यभर आपल्याला सुखावत राहतील. म्हणूनच डॉ. सॅम्युअलच्या त्या शोध निबंधातील शेवटचे वाक्य अद्यापही स्मरणात आहे. ते म्हणाले होते- Krishna's grey is great, so assimilate it to make our lives great. So, Friends be GREY... IT'S REALLY BEAUTIFUL!!

---

## पुस्तक परिक्षण

### चन्द्रशेखर टिळक

भ्र. ९८२०२९२३७६

ही कादंबरी लिहितांन एस. एल. भैरप्पा यांच्या मनात काय होते हे मला माहीत नाही. पण ही कादंबरी वाचताना दरवेळी मला आपल्या विवाह विधितील, कन्यादान या विधीची नेहमीच आठवण होते... एस. एल. भैरप्पा यांची मूळ कन्नड कादंबरी.

१९६२ साली ज्याची पहिली कन्नड आवृत्ती प्रसिध्द झाली अशी ही कादंबरी. आपल्या मराठीत उमाताई कुलकर्णी यांनी अत्यंत समर्थ अनुवाद केली आहे अशी ही कादंबरी. हा ३२२ पानी अनुवाद (किंमत ३५० रुपये ) मेहता पब्लिशिंग हाऊस ने प्रकाशित केला आहे. आज ६२-६३ वर्षानंतरही आपली लोकप्रियता, खरं म्हणजे, वाचकप्रियता केवळ टिकवून नव्हे तर सतत वाढती लोकप्रियता असणारी आशयसंपन्न कादंबरी म्हणजे एस. एल. भैरप्पा यांची वंशवृक्ष ही कादंबरी. अशाही अर्थाने वंशवृक्ष....

## वंशवृक्ष...




गेल्या काही वर्षात ही कादंबरी मी कितीवेळा वाचली असेल याला काही गणतीच नाही. आणि दरवेळी त्याचा नवीन अर्थ, नवीन संदर्भ लागत राहतो असे हे पुस्तक. अनुभवाच्या अंशाने विचारांचा वृक्ष वाढता राहतो याची प्रचिती देणारे हे पुस्तक. नाहीतरी या पुस्तकात एस. एल. भैरप्पा म्हणतातच...

आपण वाचत राहीले की अर्थही हळूहळू समजू लागतो. अशाही अर्थानं वंशवृक्ष.... का कोण जाणे पण एस. एल. भैरप्पा यांची वंशवृक्ष ही कादंबरी वाचताना मला दरवेळी हटकून निर्मला देशपांडे यांच्या टिकलीयेवढं तळ या मराठी कादंबरीची आठवण येते.

उद्देश- उद्दिष्ट- उद्योग आपले निर्णय ठरवते की आपली मानसिकता आपले निर्णय घेते हे प्रश्न सतत मनात येतच असतात आणि दरवेळी त्याची उत्तरे वेगवेगळी असतात कारण प्रश्न निरपेक्ष असतात मात्र, उत्तरे कालसापेक्ष, व्यक्तीसापेक्ष, वृत्तीसापेक्ष, स्थितीसापेक्ष असतात. अशाही अर्थाने वंशवृक्ष....

वंशवृक्ष आणि टिकलीयेवढं तळ असे एकत्र डोक्यात घुमत असताना जाणवत रहाते. काळानुरुप स्थितीस्थापकत्व दाखवत असतानाच सदसदविवेकबुद्धीचा नंदादीप दोन्हीकडे आहे. वंशवृक्षमधे श्रीनिवास शास्त्री, तर टिकलीयेवढं तळमधे निशिकांत. असेच या दोन पुस्तकातले अजून एक समांतर व्यक्तिमत्व म्हणजे वंशवृक्ष मधले राज हे पात्र आणि टिकलीयेवढं तळ मधले श्री हे पात्र. तशा एका अर्थानं या दोन पुस्तकातील नायिकाही समांतर आहेत.

वंशवृक्ष मधली नागलक्ष्मी वाचताना तर मला टिकली येवढं तळ मधली निशिकांतची पत्नी हमखास आठवते. पण अशी तुलना मनात उभी राहत असताना कुठेतरी, कधीतरी, काही प्रमाणात तरी वाटतें की एकच विषय पुरुष लेखक आणि स्त्री लेखिका वेगवेगळ्या पद्धतीने हाताळतात का? पुस्तकाचा लेखनकाल आणि प्रकाशनकाल यांनीही त्यात फरक पडतो का? अशी तुलना मनोमन होत असताना अजून एक लक्षात येणारी गोष्ट म्हणजे या पुस्तकात उपयोगात आणलेली वैशिष्ट्यपूर्ण विशेषणे... पृथ्वीचे वर्णन आपण अनेकदा नवोन्मेषशालीनी असे वाचतो. पण एस.एल. भैरप्पा यांच्या वंशवृक्ष या पुस्तकात अनेकदा पृथ्वीचे वर्णन चिरनूतन, चिरचेतन असे करण्यात आले आहे. असे वाचताना टिकली येवढं तळ मधले मनाजवळची माणसे मनात डोकवायला लागते.

एस. एल. भैरप्पा यांची वंशवृक्ष आणि निर्मला देशपांडे यांची टिकली येवढं तळ ही दोन पुस्तके एकदम किंवा एका पाठोपाठ एक आठवताना किंवा वाचताना असे मनात येते की ही दोन्ही पुस्तके साधारणपणे एकाच लोलकाचे प्रतिनिधित्व करतात. त्यांचा परिप्रेक्ष एकच आहे. सद्सदविवेकबुद्धी नावाचा अंतरीचा दिवा दोन्ही कलाकृतींचे दालन आहे. आणि हे दालन आपण फार लवचिकतेने वापरतो आणि त्या त्या वेळेच्या परिस्थितीला अनुसरून किंवा शरण जाऊन निर्णय घेतला अशी आपलीच आपण समजूत करून घेतो याची जाणीव ही दोन पुस्तके करून देत असतात.

या दोन पुस्तकांची तुलना करायचे मनात येते म्हणजे एक सर्वसामान्य वाचक म्हणून मला असे वाटते की या दोन्ही पुस्तकांचा आपल्यावर होणारा परिणाम अगदीं एकसारखा आहे... भैरप्पा यांच्या या पुस्तकात असलेल्या ओळींचा आधार घेत सांगायचे तर ही दोन्ही पुस्तके त्यांच्या वाचकाला एकच प्रश्न विचारतात.... तुला तुझ्या जीवन- ध्येयाचे आकलन झाले आहे का?

आता हेच बघा ना...

वंशवृक्ष ही कादंबरी मी पुन्हा एकदा गेल्या दोन- चार दिवसात वाचली. आणि सहज मनात आले की या कादंबरीत ज्या निष्ठेने, ज्या सातत्याने, श्रीनिवास शास्त्री आणि सदाशिवराव आपल्या विषयाचा अभ्यास करतात, लेखन करतात, ते सातत्य, ती निष्ठा आजच्या artificial intelligence च्या जमान्यात कोणी दाखवेल का? दाखवू शकेल का? कोणी दाखवलीच तर इतरजण त्याच्याकडे कसे बघतील? त्याच्याविषयी कसे बोलतील? असे वाटत असतानाच मनात आले की artificial intelligence च्या काळात output ची यथार्थता inputs वर अवलंबून असते. आणि असे inputs सातत्यपूर्ण, निरलस, अभ्यासू असावे लागतात. त्यामुळे आजच्या परिस्थितीत सदाशिवराव आणि श्रीनिवास शास्त्री यांच्या सारखी माणसे जास्त आवश्यक, अगदीं अत्यावश्यक आहेत. असे काहीतरी मनात येत असते ना तेंव्हा अजून एक भाबडा विचार कुठेतरी तरळत राहतो. तो विचार म्हणजे भैरप्पा यांच्या या कादंबरीला उत्तर कर्नाटकची भौगोलिक पार्श्वभूमी आहे. त्यात या अभ्यासू वातावरणाची , सातात्याची परंपरा आहे. आजही संगणकीय क्षेत्राची राजधानी कर्नाटक असणे हा निव्वळ योगायोग असेल का?

अशाही अर्थाने वंशवृक्ष...

असे वाटण्याचे कारण म्हणजे एस. एल. भैरप्पा यांची वंशवृक्ष ही कादंबरी एका अर्थाने चिरंतन सनातन मूल्ये आणि बदलता जमाना यांची सांगड आणि त्याचवेळी तुलना करत राहते. जगण्याचे सातत्य तर आहे; पण जीवनाचा प्राणवायू बदलत आहे याचे भान असणारी ही कादंबरी आहे. या कादंबरीची हा पवित्रा आजच्या बदलत्या युगातही महत्त्वाचे आहेच की! तपशील बदलतातः तत्त्व नाही...

अशाही अर्थाने वंशवृक्ष...

आधी वंशवृक्ष, मग गृहभंग, नंतर पर्व...

ही तिन्ही एस. एल. भैरप्पा यांची पुस्तके...

ही तिन्ही पुस्तके मराठीत अनुवादित झाली आहेत...

हे तिन्ही मराठी अनुवाद उमा कुलकर्णी यांनी केले आहेत...

हे तिन्ही मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाउसने प्रकाशित केले आहेत.

हे तिन्ही अनुवाद कमालीचे वाचकप्रिय आहेत.

अशाही अर्थाने वंशवृक्ष...

वंशवृक्ष...

वंशवृक्ष आणि टिकलीयेवढं तळ....

अशाही अर्थाने वंशवृक्ष...


यशासाठी
डॉ. नितीन विघ्ने
भ्र. ९८२२४६२९६८

# गरजा : किती खऱ्या? किती खोट्या?

**१.** ब्रह्मदेवाने रावणपुत्र इंद्रजीतला अनेक वरदाने दिलीत. त्यात जो १४ वर्षे झोप व अन्नपाण्याशिवाय राहील तोच इंद्रजिताचा वध करू शकेल, असा एक वर होता. १४ वर्षांच्या वनवासात लक्ष्मणाने अन्नपाणी आणि झोपेचा त्याग केला होता. म्हणूनच त्याला इंद्रजितवध करता आला. मानवाला निद्रा, अन्नपाणी यांची अत्यंत गरज असते. मग लक्ष्मण १४ वर्षे कसा जिवंत राहू शकला?

**२.** माऊंट-अबू येथे वयाच्या ११ व्या वर्षी प्रल्हाद जानी यांना अंबामातेचा साक्षात्कार झाला. तेव्हापासून अन्नपाण्याचा संबंध कायमचा सुटला. म्हणजे १९४० पासून तर त्यांच्या ९० व्या वर्षी झालेल्या मृत्यूपर्यंत म्हणजे एकूण ८० वर्षे त्यांनी अन्न व पाणी दोन्हीही ग्रहण केले नाही. त्यामुळे मलमूत्र विसर्जनसुद्धा नाही. तरीसुद्धा प्रकृती तुमच्या-आमच्या सारखीच ठणठणीत होती. त्यांच्या जिवंतपणी जेव्हा ही बातमी पसरत गेली तेव्हा अनेक डॉक्टर्स आणि वैज्ञानिकांनी हे अशक्य असून बुवाबाजी किंवा फसवणुकीचाच प्रकार असेल म्हणून धुडकावून लावले. मग उत्सुकतेने नेमके खरेखोटे तपासण्यासाठी २००३ साली अहमदाबादेतील नामवंत स्टर्लिंग हॉस्पिटलमध्ये तज्ज्ञांच्या समितीने अत्याधुनिक वैद्यकीय तंत्रज्ञानाचा वापर करून सलग १० दिवस त्यांच्या सर्व प्रकारच्या तपासण्या केल्या. त्यांना संडास-बाथरूमला जाताच येणार नाही, याची खात्री केली. अखंड व्हिडीओ रेकॉर्डिंग केले, कडेकोट बंदोबस्त ठेवला. त्यांनी खरोखरच त्या १० दिवसात अन्नपाणी घेतले नाही व मलमूत्र विसर्जन पण केले नाही. हे कसे शक्य आहे या रहस्याचा उलगडा झाला नाही. विज्ञानाने हात टेकले. विज्ञानाच्या कक्षेबाहेरील हा विषय असून त्याचे कारण समजून घेण्यास आम्ही आणि आधुनिक वैद्यकीय शास्त्र सक्षम नाहीत, असा अधिकृत अहवाल सहभागी डॉक्टरांनी दिला. स्टर्लिंग हॉस्पिटल अहमदाबादने प्रल्हाद जानी यांच्या २००३ मध्ये केलेल्या तपासण्या आणि त्याचे अहवाल सार्वजनिक केले आहेत. त्याची ही लिंक आहे. http:// www. sudhirneuro.org/files/mata-ji_case_study.विष या प्रकरणाने जगातील वैद्यकीय जगतामध्ये एकच खळबळ माजली. मानवी शरीराचा हा विलक्षण चमत्कार आहे, हे पाश्चात्त्यांनी मान्य केले. बीबीसी, टेलिग्राफ, सीएनएन या वृत्तपत्रांनी याची ठळक नोंद घेतली. त्यावर विशेष वृत्तांत तयार केले. सेक्युलर भारतीय माध्यमांनी मात्र याकडे सोयीस्कर दुर्लक्ष केले. काही भारतीय महाभागांनी अत्यंत वस्तुनिष्ठ, काटेकोर वैद्यकीय तपासण्या आणि अहवालावर प्रश्न उपस्थित केले.

पाश्चात्त्य जगतामध्ये मात्र यावर खुलेपणाने साधकबाधक चर्चा होत राहिली. ऑस्ट्रेलियातील P.A. Straubinger या दिग्दर्शकाने त्यांच्यावर IN THE BEGINNING THERE WAS LIGHT ही डॉक्युमेंटरी फिल्म तयार केली. निव्वळ सत्यकथन करणाऱ्या, कुणाचीही बाजू न घेता समतोल भाष्य असलेल्या या फिल्मचे जगभर स्वागत झाले. खुद्द केम्ब्रिज विद्यापीठाने या प्रकरणात रस दाखवला. २०१० साली पुन्हा सलग १५ दिवस प्रल्हाद जानी यांची अत्यंत काटेकोर तपासणी केली गेली. अहमदाबादेतील डॉक्टरांसोबत संरक्षण मंत्रालयामधील तज्ज्ञांसह एकूण ३५ जण या तपासण्यांमध्ये सहभागी होते. एवढे करूनही रहस्यभेद काही झालाच नाही. प्रल्हाद जानी यांच्या मृत्यूनंतर आजही आधुनिक विज्ञानासाठी त्यांचे जीवन एक रहस्य म्हणून कायम आहे. या सर्व तपासण्यांमध्ये जानी यांनी बिनशर्त सहकार्य केले होते. ते स्वत:ला अम्बामातेचा अंश समजून नेहमी स्त्रीवेषातच असत. त्यांना 'माताजी' म्हणून ओळखतात. ते सांगत. 'साक्षात्कारामुळे सूर्यप्रकाशापासून ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता शरीरामध्ये निर्माण झाली आहे.' तुम्हाला हे कसे शक्य झाले? असे त्यांना विचारले तेव्हा ते म्हणाले, मला बालपणीच देवींचे दर्शन झाले तेव्हा त्यांनी अन्नपाणी ग्रहण करू नकोस असे सांगितले. तेव्हा मी हे कसा करणार असे देवींना विचारले तेव्हा देवीने माझ्या ओठांवर बोट ठेवले. त्याबरोबर माझ्या टाळूतून अमृत पाझरले. डॉक्टरांनी हे ऐकून त्यांच्या तोंडातील टाळूची तपासणी केली असता तिथे त्यांना एक छिद्र आढळले.




तसेही मी अन्नपाणी घेत नाही यात काही विशेष नसून वनस्पतीसुद्धा याच पद्धतीने आपले अन्न मिळवतात. त्यामुळे मला बाहेरून अन्न-पाणी घ्यावे लागत नाही. पाण्याचा एक थेंबसुद्धा न घेता त्यांच्या मूत्रपिंडामध्ये लघवी तयार होत होती आणि ती परत शरीरामध्ये शोषली जात असल्याचे विलक्षण अद्भुत निदान वैद्यकीय तपासण्यांमध्ये झाले. आधुनिक विज्ञानासाठी हे मोठे अद्याप न सुटलेले कोडे आहे. मानवी शरीराच्या क्षमतांना आव्हान देणाऱ्या या रहस्याची उकल करण्याचा विडा पाश्चात्त्यांनी उचलला होता. त्यांच्या पद्धतीने सत्याचा शोध घेतला, पण अन्न-पाण्याविना त्यांचे शरीर जीवनाला आवश्यक असणारी ऊर्जा कशी उत्पन्न करते ते कुणालाच कळले नाही. त्यांच्या हयातीत सत्याचा सामना करण्यापेक्षा अज्ञानाच्या अंधारात डोळे मिटून बसणे भारतीय अभ्यासकांनी पसंत केले. सत्याचा स्वीकार केला तर आपला पुरोगामीपणाचा ढोंगी मुखवटा टराटरा फाटेल म्हणून सत्याकडे पाठ फिरवून ही मंडळी बसली होती. जगभरातील संशोधक याचा छडा लावण्यासाठी तऱ्हेतऱ्हेचे तर्क लढवीत आहेत. जगातील सर्वाधिक रहस्यमय १० प्रकरणांमध्ये हे प्रकरण दुसऱ्या क्रमांकावर आहे. प्रल्हाद जानी हे जगभर किती मोठ्या विस्मयाचा आणि चर्चेचा विषय बनले होते.

हिरारतन माणेक (१९३७-२०२२) यांनी सांगितले की, १८ जून १९९५ पासून ते फक्त पाण्यावर जगत. कधी कधी चहा-कॉफी व ताक घेत. शुद्ध हवा व सूर्याकडे एकटक पाहून ते त्यांच्या शरीराचे पोषण करीत असत. भारताबाहेरील जगात अशी उदाहरणे आहेत का याचा शोध घेतला असता अन्नपाणी न घेता राहणाऱ्यांना इनेडिया किंवा ब्रेदरिअनिजम म्हणतात. प्यारासेलस (१४९३-१५४१) हा माणूस फक्त सूर्यप्रकाशाच्या आधारावरच जिवंत होता, असे म्हणतात. रामबहादूर बोम्जान बाक्जी हा नेपाळी बौद्ध भिक्षुक अन्नपाण्याविना राहायचा. त्यावर डिस्कव्हरी चॅनेलने डॉक्युमेंटरी बनवली होती. असे प्रयोग जगात अनेक लोकांनी केलेत. पण गर्दी, आवाज व हवेतील प्रदूषणामुळे त्रास होतो, असे त्यांनी सांगितले. रे मावर या इस्रायलमधील माणसावर अतिकडक डॉक्टरांच्या देखरेखीखाली सतत आठ दिवस तपासण्या झाल्यात. तो अन्नपाणी काहीही घेत नसे. एकूण काय भारतात आणि जगात अशी अनेक उदाहरणे आहेत, ज्यात अनेक वर्षे लोक अन्नपाण्याशिवाय जगलेत. मात्र जिथे प्रदूषण नाही अशा पर्वतीय किंवा हिमालयात आजही असे अनेक साधू सहजच असतील, जे फक्त हवा, सूर्यप्रकाशावरच जिवंत राहून तपश्चर्या करतात. त्यांना प्रसिद्धीची हावी नाही. जगाशी कुठलाही संबंध ठेवण्याची इच्छा नाही. आपल्या गरजा...

आपल्यासारख्या सामान्य लोकांबद्दल विचार केल्यास असे आढळते की, अन्नपाणी, हवा, झोप, व्यायाम, निवारा व शिक्षण या आपल्या आरोग्यमय जीवनासाठी अति आवश्यक आहेत. याशिवाय आपण अनेक गोष्टींना आपल्या जीवनात आवश्यक गरजा म्हणून मानतो; त्यातल्या खऱ्या किती आवश्यक आहेत?

**अब्राहम मास्लो सिद्धांत**

अमेरिकन मानसशास्त्रज्ञ अब्राहम मास्लो यांच्या प्रेरणा आणि गरजांच्या पदानुक्रमाच्या सिद्धांतानुसार, मानवी गरजा पूर्ण करण्यासाठीच व्यक्ती प्रेरित असतो. या गरजा मूलभूत ते जटिल असतात. या सिद्धांताला 'मास्लोचा गरजांचा पदानुक्रम' किंवा 'मास्लोचा पिरॅमिड ऑफ हायरार्की ऑफ नीड्स' असेही म्हणतात. मास्लोच्या गरजांची श्रेणीरचना बहुतेकदा पिरॅमिडच्या आकारात दर्शविली जाते; ज्यामध्ये सर्वात मोठ्या, सर्वात मूलभूत गरजा तळाशी असतात आणि आत्म-साक्षात्कार, पराकाष्ठेची आवश्यकता वरच्या बाजूला असते. पिरॅमिडच्या सर्वात मूलभूत चार थरांमध्ये मास्लोने Deficincy Needs म्हणजे 'कमतरतेच्या गरजा' म्हटले आहे. आदर, मैत्री, प्रेम, सुरक्षितता आणि शारीरिक गरजा. जर या 'कमतरतेच्या गरजा' पूर्ण झाल्या नाहीत तर व्यक्ती चिंताग्रस्त आणि तणावग्रस्त वाटेल. वंचितपणामुळे कमतरता निर्माण होते, म्हणून जेव्हा एखाद्याच्या गरजा पूर्ण होत नाहीत, तेव्हा ते त्यांना नाकारल्या जाणाऱ्या गोष्टी पूर्ण करण्यास प्रेरित किंवा उद्युक्त करतात.

एकदा का व्यक्ती शिक्षण, सुरक्षितता, सामाजिक स्थान यात स्थिर झाली की मग सगळे लक्ष अधिक प्रगती करण्याकडे म्हणजे 'उत्कर्षात्मक गरजा' यावर केंद्रित होते. शेवटी आत्म-साक्षात्कार म्हणजे जीवनातील सर्वोत्कृष्ट ध्येय म्हणजे आपल्यातील सर्व क्षमतांचा यथार्थ उपयोग करून जीवनाची सार्थकता करण्यावर मन केंद्रित होते. क्लेटन अल्डरफर याने ERG म्हणजे Existence, Relatedness (समर्पकता) व Growth (विकास) संबंधी आपल्या गरजा असतात असे सांगितले. शिकायचे काय? यशासाठी राहणीमानाचा दर्जा वाढवण्यापेक्षा जीवनाची गुणवत्ता वाढवायचा प्रयत्न करावा.

**राहणीमानाचा दर्जा:** तुमच्या घराचा पत्ता किती उच्च लोकवस्तीत आहे? घर किती मोठे आहे? मुले किती मोठ्या व प्रसिद्ध शाळा कॉलेजात शिकत आहेत? तुमची कोणत्या व किती क्लबमध्ये मेंबरशिप आहे? तुमचे कपडे किती छान व महागडे आहेत? सुटीत तुम्ही कुठल्या डेस्टिनेशन हॉलिडे ट्रिपला जाता? समाजात तुम्हाला किती मान आहे? वगैरे प्रश्न ज्यांना महत्त्वाचे, त्यांनुसार त्यांचा राहणीमानाचा दर्जा ठरतो.

**जीवनाची गुणवत्ता:** जर गरजा कमीतकमी असतील, कोणतेही कर्ज नसेल, कमाईच्या मर्यादेत खर्च असेल, कुटुंबातील प्रत्येकासोबत तुम्ही भरपूर वेळ आनंदाने वापरता तसेच घरातील सर्वजण एकमेकांना मदत करतात व वेळेचा नेहमीच सदुपयोग करतात. पालक व मुलांना 'नीड' आणि 'वॉन्ट'चा फरक कळतो. त्यात खऱ्या नीडला महत्त्व देऊन अनावश्यक वॉन्टकडे दुर्लक्ष करायला शिकवतात. स्वत:साठी, समाज व देशासाठी जबाबदार नागरिक बनवायला कृतिशील आहात तरच तुमच्या जीवनाची गुणवत्ता उत्तम आहे. (लेखक सायकॉलॉजिस्ट, करीअर कौन्सेलर व सॉफ्ट स्किल्स ट्रेनर आहेत.)



## हरिनामावीना । मोक्ष नाही ।।

अहंकारा पोटी । विनाश नांदतो ।।
सर्वनाश होतो । आयुष्याचा ।।१।।

निंदक वंदक । दोन्हीही घातक ।।
होतात जाचक । सावधान ।।२।।

स्वार्थी या जगाचा । खेळ असे न्यारा ।।
मायेचा पसारा । ओळखावा ।।३।।

साधक बाधक । करूनी विचार ।।
ठेवावा आचार । सर्वकाळ ।।४।।

संतवाणी सदा । आचरावी मना ।।
हरिनामाविना । सुख नाही ।।५।।

प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
९४०३०२९१७८

## खूप येते आठवण तुझी

विचारलं म्हणून सांगतो
प्रत्येक दोन तासाने तू
ऑनलाईन आहेस का मी पहातो
तुला आठवायला मला
अलार्म लावायची गरज नाय ती सारखीच येते
तिला अजून कामच काय
तूझी आठवण डोळे
उघडल्यापासून चालू होते
ते बंद राहिले तरी
स्वप्नात मात्र तूच येते
तुझ्या आठवणीने भारावून जाते मन
शेवटी डोळ्यात पाणी येते
हलके होते मन डोळे पुसून
मी सांगतो मनाला एवढं विचारलं होत तिनं
आठवण येते का तुम्हाला.....

उदयसिंह मोहिते

## विश्वंभर अम्हि आहोत

विश्वंभर साऱ्या विश्वासि पोसतो तरी
अम्हि उपोषित याव घणाचे सोसतो
कृषिकर्म नच सोपे असे असिधारा
व्रत साधना नि श्रमाविण ना दिसे देव भक्ताप्रत
धडे गिरविती नेते आत्महत्या महापाप
अम्हि मेल्यावर येती सरकार मायबाप
बोलाचाच असे भात बोलाचीच असे कढी
नक्राश्रू ढाळण्या येती बघण्या आमची मढी
वरुणाच्या अवकृपे बीजांकुरे करपली नि दुबार
पेरणीने सुख-स्वप्ने हरपली
पोटालागिं अन्न मिळो हीच आहे एक आस परि घडे
विपरीत अम्हा गळीं पडे फास

रमेश वि. ढाकुलकर

समाजभान
पंकज जयस्वाल
भ्र. ७८७५२१२१६१

# भारतातील शहरी नक्षलवाद आणि मार्कस सिसेरो यांचे विधान...

स३ ईसापूर्व मध्ये सल्लागार असलेले रोमन राजकारणी मार्कस टुलियस सिसेरो यांच्या मते, एखादे राष्ट्र त्याच्या मूर्खांना आणि महत्त्वाकांक्षी लोकांनाही टिकवून ठेवू शकते. तथापि, ते अंतर्गत बेईमानीला तोंड देऊ शकत नाही. वेशीवर असलेला शत्रू कमी शक्तिशाली असतो कारण तो सुप्रसिद्ध असतो आणि तो त्याचा झेंडा फडकवतो. तथापि, देशद्रोही वेशीच्या आत असलेल्यांमध्ये मुक्तपणे फिरतो, त्याचे धूर्त विचार सर्व गल्लीबोळातून गुंजत असतात आणि अगदी सरकारच्या स्वत:च्या सभागृहातही पोहोचतात. कारण देशद्रोही देशद्रोही दिसत नाही; तो अशा बोलीभाषेत बोलतो ज्याची त्याला सवय असते, समाजातील अन्य लोकांचे स्वरूप आणि कल्पना स्वीकारतो आणि सर्व लोकांच्या आत खोलवर असलेल्या अशा सुप्त अवगुणांवर खेळतो. तो राष्ट्राच्या आत्म्याला कुजवतो, दिवस रात्र देशाच्या अस्मितेला कमकुवत करण्यासाठी गुप्तपणे आणि अदृश्यपणे काम करतो आणि राजकीय शरीराला इतके संक्रमित करतो की ते आता प्रतिकार करू शकत नाही. त्यांच्यापेक्षा खून करणारा कमी भयावह असतो. भारत नक्षलवादाच्या त्याच समस्येचा सामना करत आहे, ज्यामध्ये शहरी नक्षलवादाचाही समावेश आहे. जरी २०१४ मध्ये नक्षलग्रस्त जिल्ह्यांची संख्या १२६ वरून ३८ पर्यंत कमी झाली आहे. केंद्र सरकार २०२६ पर्यंत हे नेटवर्क नष्ट करण्याची योजना आखत आहे. तथापि, मार्कस सिसेरोची विधाने शहरी नक्षलवादाच्या सर्वात मोठ्या धोक्याचे वर्णन करतात. या विषारी मानसिकतेचा किंवा विचारसरणीचा परिणाम म्हणून आपण एक समाज आणि राष्ट्र म्हणून खूप त्रास सहन करत आहोत. ते आता 'महाराष्ट्र विशेष सार्वजनिक सुरक्षा विधेयक, २०२४' विरुद्ध लोकांचे ब्रेनवॉशिंग करत आहेत. शहरी नक्षलवादी भारतासाठी धोका का आहे आणि ते कोण आहेत?

**शहरी नक्षलवादी त्यांच्या नेटवर्कमध्ये कसे कार्य करतात आणि ते कोण आहेत?**

अलीकडच्या काळात लोकप्रिय झालेला 'शहरी नक्षलवादी' हा शब्दप्रयोग शहरी भागातील अशा व्यक्ती आणि संघटनांना सूचित करतो जे माओवादी बंडखोरीबद्दल सहानुभूती दाखवतात, त्यांना पाठिंबा देतात किंवा सक्रियपणे मदत करतात. शहरी नक्षलवादी आणि माओवादी भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी धोका निर्माण करत आहेत आणि शत्रू देशांमध्ये त्यांचे असंख्य समर्थक आहेत, ज्यांच्याशी आपण अनेक वर्षांपासून प्रॉक्सी युद्ध लढत आहोत. स्थानिक स्पर्धेला विकत घेऊ पाहणाऱ्या जागतिक व्यावसायिक महाकायाप्रमाणे हे शहरी नक्षलवादी आणि माओवादी भारताविरुद्ध हल्ला करण्यासाठी आदर्श मार्ग आहेत. हे शहरी नक्सलवादी खोटी सहानुभूती दाखवणारे, बनावटी बुद्धिमान, चांगुलपणाने बोलणारे असतात आणि सामाजिक कार्यकर्ते, शिक्षणतज्ज्ञ किंवा मानवी हक्कांचे समर्थक म्हणून स्वत:ला सादर करतात. परंतु त्यांचे खरे ध्येय तरुण, भोळ्या लोकांना सोबत घेऊन माओवादी प्रचाराचा प्रसार करून देश अस्थिर करणे आहे. एनआयएच्या अभ्यासानुसार, अनेक आघाडीच्या संघटना आणि विद्यार्थी संघटना या भरती प्रयत्नांचे नेतृत्व करत आहेत. या संघटना महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये विद्यार्थ्यांच्या आदर्शवादाचा आणि नाजूक मनाचा फायदा घेतात. ते विद्यार्थ्यांना सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते असल्याचे भासवून, सरकारला विरोध करण्यास आणि हिंसक, बंडखोर जीवनशैली स्वीकारण्यास प्रवृत्त करून कट्टरपंथी विचारसरणीचे शिक्षण देतात.



कॅम्पसमध्ये भारतविरोधी जे काही निषेध आणि हिंसाचार आपण पाहतो ते मुख्यत्वे शहरी नक्षलवाद्यांच्या विद्यार्थ्यांवर प्रभाव पाडण्याचे परिणाम आहेत. अशा ब्रेनवॉशिंगमुळे समाज आणि राष्ट्राच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला धक्का बसतो. हे नक्षलवादी, जागतिक डीप स्टेट बाजारपेठेच्या मदतीने, स्वार्थी कारणांसाठी ज्यांच्यासाठी ते काम करतात अशा आंतरराष्ट्रीय मालकांना आणि वित्तपुरवठादारांना अनुकूल असलेल्या कार्यांना समर्थन परंतु राष्ट्र-समर्थक असलेल्या प्रत्येक गोष्टीला नाकारतात. त्यांना फक्त जातीय वाद, काश्मिरी फुटीरतावाद आणि खलिस्तानी चळवळीसारखे विभाजन भडकवायचे आहे, जे बहुतेक अनिवासी भारतीय सोशल मीडिया, मुख्य प्रवाहातील मीडिया आणि कॅम्पस गप्पा मारण्यासारख्या व्यासपीठांवर पसरवत आहेत. तुम्हाला कळण्यापूर्वीच, भारताला आतून पोखरण्यासाठी पुरेसे नक्सलवादी तयार झालेले असतात. त्यांचे अनुयायी आणि कार्यकर्ते, तसेच माओवाद प्रभावित भागातील बहुसंख्य लोकांचाही माओवादाशी फारसा सैद्धांतिक संबंध नाही. ते फक्त संतप्त, अलिप्त व्यक्ती आहेत ज्यांना अत्याचारित, अपमानित आणि अन्याय्य वागणूक दिली जात आहे असे वाटते. माओवादी या भावनेचा चतुराईने फायदा घेतात; उदाहरणार्थ, बिहारमधील जातीचे वाद, आंध्र प्रदेशातील जमीनदारांबद्दलचा द्वेष, आदिवासी भागात वन कायद्यांबद्दल असंतोष, तरुणांची बेरोजगारी आणि मुस्लिम कट्टरतावाद हे सर्व बंदुकांच्या वापराद्वारे सत्ता मिळविण्याचे मार्ग म्हणून सांगितले जातात. कट्टरपंथी कशासाठी उभे आहेत याची अंतिम उद्दिष्टे आणि परिणामांबद्दल सार्वजनिक समज वाढवण्याची नितांत गरज आहे, तसेंच स्थानिक तक्रारी चांगल्या प्रशासनाद्वारे आणि जबाबदारीद्वारे योग्यरित्या सोडवल्या पाहिजेत.

माओवादी शहरीकरणासोबत येणाऱ्या नैसर्गिक दोषरेषांचा फायदा घेण्याचा प्रयत्न करतात. जप्त केलेल्या कागदपत्रांनुसार, सर्वेक्षण हा शहरी एकत्रीकरण मोहिमेतील पहिला टप्पा आहे. या टप्प्यात शहरी भूदृश्यांचे त्यांच्या भौगोलिक प्रोफाइलनुसार परीक्षण करणे समाविष्ट आहे, ज्यामध्ये ते औद्योगिक किंवा अविकसित प्रदेशात सेवा देतात की नाही; कार्यबलाच्या रचनेतील बदल; भाषिक आणि धार्मिक अल्पसंख्याकांचे बारकाईने परीक्षण; शहरांमधील आर्थिक असमानता; आणि वस्तीकरणात गुंतलेल्या प्रक्रियांचा समावेश आहे, कारण ही त्यांच्या भरतीसाठी संभाव्य प्रजनन स्थळे आहेत, ज्यांचे ते सहजपणे भारतीयांच्या हिताच्या विरोधात काम करण्यासाठी ब्रेनवॉश करू शकतात.

अलिकडच्या वर्षांत, अनेक महाविद्यालयीन कॅम्पसमध्ये अशांतता निर्माण झाली आहे. लोकशाही मूल्ये आणि संवैधानिक तत्त्वांच्या नावाखाली केंद्र सरकारविरुद्धचा निषेध युद्धभूमीत रूपांतरित झालेल्या या सर्व नक्सली समर्थक संस्थांना एकत्र करतो. बारकाईने तपासणी केल्यास असे दिसून येते की सरकार लोकशाही तत्त्वे दडपत नाही. परंतु असे चित्र रंगवले गेले आहे. या निषेधांमध्ये सक्रियपणे सहभागी होऊन किंवा त्यांना पाठिंबा देऊन, काही प्राध्यापकांनी आंदोलनांना तीव्र करण्याचा प्रयत्न केला आहे. सामान्य व्यक्तीला विचार करावा लागतो की, विद्यार्थी भारतविरोधी कसे झाले? या सर्व संस्था अचानक अडचणीत का आल्या आहेत?

खोट्या विमर्षाच्या पहिल्या पायरीवर, ते विष ओकतील आणि त्यांच्या घाणेरड्या विचारांनी लोकशाहीला भुरळ घालतील. ते ब्रिटिश मानसिकतेचे गुलाम आहेत, ज्यांचे शिक्षण उत्तम आहे पण सामाजिक जाणीव कमी आहे. त्यांचा पाश्चात्य दृष्टिकोनावर विश्वास आहे आणि प्रत्येक घरगुती प्रश्न पाश्चात्य समाजाच्या दृष्टिकोनातून पाहिला जातो. त्यांची अंतिम युक्ती म्हणजे समाजाचे निराशाजनक चित्र रंगवणे कारण ते राष्ट्राच्या प्रलयाच्या भविष्यवाणीवर विश्वास ठेवतात. ते फक्त भावनांवर विश्वास ठेवतात; ते आकडेवारी, तथ्ये किंवा डेटावर विश्वास ठेवत नाहीत. ते भारताला उद्ध्वस्त करू इच्छितात कारण त्यांचा असा विश्वास आहे की चीन आणि पाश्चात्य संस्कृती एका आदर्शवादी जगाचे प्रतिनिधित्व करतात, जे त्यांना वाटते की भारत कधीही असू शकत नाही.

ते वैचारिक तर्क आणि लॉजिस्टिकल मदत देऊन नक्षलवादी संघटनांमध्ये भरती वाढवतात, ज्यामुळे बंडखोर चळवळ वाढू शकते. जरी शहरी नक्षलवादी सशस्त्र युद्धात सक्रियपणे सहभागी नसले तरी, त्यांच्या कृती हिंसाचार, दंगली आणि नागरी अशांतता निर्माण करतात, ज्यामुळे गावं, नगरीय, महानगरीय प्रदेश अस्थिर होतात. शहरी नक्षलवाद्यांचे जागोजागी भाषण राजकीय ध्रुवीकरण वाढवू शकते, ज्यामुळे सामाजिक विभाजन होऊ शकते आणि लोकशाही प्रक्रियांना तडजोड करण्याची शक्यता असते. शहरी नक्षलवाद्यांविरुद्ध सरकारी कारवाई विरोधात वारंवार मानवी हक्कांच्या चिंता निर्माण उभ्या केल्या जातात, ज्यामध्ये मनमानी अटक आणि मतभेद, दडपशाहीचे दावे समाविष्ट आहेत, ज्यामुळे व्यापक सार्वजनिक अशांतता निर्माण होते. शहरी नक्षलवाद्यांचा जंगलातील नक्षलवाद्यांवर ताबा आहे. सामाजिक त्रुटींचा फायदा घेत आणि आतून व्यवस्था कमकुवत करण्यासाठी मोठ्या गर्दीचे आयोजन करून हिंसक आणि अहिंसक दोन्ही निदर्शने भडकवण्याचे काम शहरी नक्षलवाद्यांवर आहे.

(पान ६ वर)

ऋतूरंग.....
किरण डोंगरदिवे
भ्र. ७५८८५६५५७६

# गुलमोहर होता आले तर पाहावे...



**उन्हाचा तडका वाढला की हळूहळू रस्त्यावरची गर्दी कमी होऊ लागते. उन्हाची काहीली वाढली की भर दुपारी आपली सावली आपल्याच पायाखाली आसरा शोधण्याचा प्रयत्न करताना दिसते. शहरातली गर्दी उन्हाने लाहाकतांना समोर दिसेल त्या दुकानाच्या भिंतीच्या सावलीला आडोसा घेताना दिसते. अअशा रणरणत्या उन्हात कुणी एखादं भिकाऱ्याचं पोर अनवाणी पायाने आपल्याच तालात चालत जाताना दिसते, भाजतात म्हणून ते घाईने पाय उचलत नाही किंवा धावतही नाही त्याच्या चेहऱ्यावर आनंद असतो तो नेमकाच कोणत्यातरी दुकानदाराने स्वत:साठी रुपया दोन रुपयात स्वत:साठी पुण्य विकत घेताना त्याच्या पदरात टाकलेली खुळखुळीचा....अशा वेळी अशा मस्त कलंदर अवस्थेत स्वत:च्या कफल्लकतेची पर्वा न करता कुणी गुणगुणायला लागलं की मला गुलमोहर आठवू लागतो. तसाही प्रतिकूल परिस्थितीत फुलारून प्रत्येक नैसर्गिक शक्तीकडे पाहताना मला पहिल्यांदा आठवतो तो गुलमोहरच!**



तसा गुलमोहर आठवण्याची वेगळी गरज नसते कारण गुलमोहराचा झाड वर्षभर आपल्या डोळ्यासमोर असले तरी ते आपल्याला कधी बोलवत नाही, मात्र तपलेल्या उन्हात जिथे बाकीची झाडे आपला हिरवा साज शृंगार हरवून बसतात तिथे गुलमोहर अंगावर लाल शाल घेऊन आपल्याकडे पाहून असे काही हास्य करतो की आपण त्याच्याकडे वळणारी नजर थांबवूच शकत नाही.

चैत्राच्या उतार दिवसात काही गुलमोहर हळूहळू आपला लाल भगव्या रंगाचा गुलाल निसर्गात उधळून द्यायला सुरुवात करतात आणि वैशाखाच्या पहिल्या टप्प्यात तर निसर्गातले सारेच गुलमोहर बहरून येतात. वसंत जसा पळस आणि शाल्मली, पळस पांगरा अशा फुलांचा साज ओसाड डोंगरा माथ्यावर उधळून देतो आणि आपल्या वाट्याचे हे सुख वैशाखाच्या पदरी पडू नये म्हणून काटेसावरी, पळस, पळसपांगरा अशा फुलांनी सजवलेला शृंगार उतरून ठेवतो तेव्हा वैशाखाच्या देखणेपणासाठी गुलमोहर धावून येतो असे मला वाटते. रणरणत्या उन्हात बहुतांश वेळी रस्त्याच्या कडेला आणि प्रसंगी सरकारी इमारतीच्या आवारात हमखास आढळणारा गुलमोहर मनाला प्रसन्नता बहाल करणारा असतो यात मात्र शंका नाही.

उन्हाच्या कटाविरुद्ध आपली शक्ती पणाला लावून आपलं अस्तित्व आकर्षक रीतीने कसे उभे करावे? याची शिकवण देणारा गुलमोहर खरोखरच प्रेरणादायी वृक्ष आहे असे मला वाटते, कारण ६० आणि प्रसंगी ७० फूट खोल असलेल्या विहिरीचे पाझर कोरडे झाले तरी आणि ३०० ते ३५० फूट खोल असलेल्या कुपनलिका पाण्याऐवजी फक्त कोरडे हवा फेकत असल्या तरी कोरड्या रखरखीत जागेवर उभा राहून स्वत:च्या पानांना हिरवे आणि फुलांना भगवे लाल रंग बहाल करणारा गुलमोहर नेमका कोणत्या मुळीतून पृथ्वीच्या पोटातले कोणते जलजीवन खेचून आणतो? याचे कोडे मला अजूनही उलगडलेले नाही. तसे ओसाड माळरानावर पळस किंवा काटेसावरी कशी फुलते? कुठून पाणी मिळवते? याचाही शोध घेणे बाकीच आहे. मात्र, रणरणत्या उन्हात फुलून येणारी झाडे निदान मला तरी गुलाब आणि जास्वंदापेक्षा जास्त आवडतात.

माझ्या शाळेच्या रस्त्याने जाताना चैत्रामध्ये रस्त्याच्या दुतर्फा पांढुरकीशी गुलाबसर अशी ग्लिरीसिडियाची फुले झाडावरून प्रसन्नतेने हसायची त्यांचा वाळलेला पांढुरका पाचोळा झाडाखाली भिरभिरताना दिसतोय. अरे हो ग्लिरीसिडियाला ओळखलं नसेल कदाचित तुम्ही, तर लहानपणी कधीतरी घरात उंदीर झाले म्हणजे लाकडाच्या मोळ्या घेऊन येणाऱ्या बाया हातामध्ये पांढऱ्या फुलांची फांदी घेऊन येत आणि आईशी बोलताना म्हणत, बाई ही फुल घरातल्या कोपर्यात ठेवा म्हणजे उंदीर आपोआप बाहेर जाऊन मरतात आई ती फुले घराच्या कोपर्यात ठेवायची, ही कशाची फुले? असा आम्ही कधी विचारलं तर त्या फुलाचे नाव 'उंदीरमारीची फुले' असे विलक्षण असल्याचे आम्हाला कळे. अनेक दिवस ती फुले घराच्या कोपर्यात पडलेली असायचे आणि एकदा तर मी एका चिमुकल्या त्या उंदीरमारीच्या पांढऱ्या फुलांना तोंडात घेऊन पळताना पाहिले तेव्हापासून घरातले उंदीर मारायची सुपारी या पांढऱ्या निष्पाप आणि सुंदर फुलांना देणे मी बंद केले.

चैत्र बहराला असला की चैत्र पुनवेला काळ्याभोर आभाळात फुलून आलेल्या चांदण्यांची फुले आणि रानावनात फुलून आलेली ही जंगली फुले यांच्यात देखणेपणाची जणू स्पर्धा लागते. मात्र एकदा चैत्र पुनव उलटली की चैत्र अमावस्याकडे कलणारा ऋतू सर्व फुलांना जागेवर वाळवतो, त्याचा पाचोळा करतो कधी नव्हे तो कालपर्यंत हृदयामध्ये ओलावा घेऊन वाहणारा वारा माया आटल्यासारखा कोरडेपणाने वाहतो आणि एकेकाळी ज्या फुलांना अंजारले, गोंजाळले त्या फुलाचा पाचोळा किती क्षुल्लक आहे? हे दाखवत आपल्या शक्तीने उडवून लावतो. ऋतूचे हे गणित माणसाने का उचलले असावे? असा प्रश्न मला नेहमी पडतो. काही लोक आपल्यावर खूप जीव लावतात आणि पाहता पाहता जीव गेला तरी आपल्याकडे पाहत नाहीत, होय ना? हा त्यांचा दोष नाही ही निसर्गाचीच प्रवृत्ती आहे. मात्र, या निसर्गाची बिकट परिस्थितीत फुलून येण्याची प्रवृत्ती आपण जपत नाही तो भाग वेगळा.

दिवस जसे फुलांचा पाचोळा करण्यात मग्न असतात तश्या उताराला लागलेल्या चैत्राच्या रात्री सुद्धा अंधाराला आणखी गडद करणाऱ्या असतात. शेतामध्ये फार क्वचितच उन्हाळी भुईमुगासारखे पिक उभे असते आणि शेतामध्ये पीक कमी असले की पाखरांची गर्दी आपोआप वाढू लागते. ऋतू बदलाचा अंदाज घेत गुलमोहर मात्र बहरत जातो. सूर्य जितका रागाने लाल होत जाईल तितकाच गुलमोहर प्रसन्नतेने लालजर्द होत त्याला चिडवत जातो. त्यांच्या अस्तित्वाची आणि अहम भावाची लढाई कधी ग्रीष्माच्या रणरणत्या दुपारी नेमके गुलमोहराच्या फुलाच्या सावलीत उभे राहून अनुभवली पाहिजे. आम्ही तो अनुभव अनेक वेळ घेतला. वाळलेल्या गुलमोहराच्या शेंगांच्या तलवारी खेळणारी आमची पिढी, गुलमोहराच्या पाकळीतला मुलायम पांढरा भाग आवडीने खात होतो असे सांगितले तर नवीन पिढी खदखदून हसेल. मात्र, निंबाच्या झाडावरच्या चिमुकल्या पिवळ्या निंबोळ्या आम्ही हापूस आंबा चिंबवून त्याचा रस काढावा अशा थाटात चिंबवत असू हेही त्यांना सांगावंसे वाटते.

त्या चैत्रातल्या आठवणी बद्दल सांगायचे तर एक शेर आठवतो.

**पेड़ों की घनी छाँव और चैत की हिद्दत थी**
**और ऐसे भटकने में अंजान सी लज़्ज़त थी**

बाप बँकेत कारकून आणि आई शिक्षिका असली तरी अंगणातल्या निंबोळ्या जमा करून त्या कोपर्यावरच्या दुकानात विकून त्या पैशातून चित्रकलेची वही, कलर बॉक्स असे आणून घरी दाखवले म्हणजे मिळणारी शाबासकी किती लाख मोलाची असायची, ते आधुनिक काळातील यांत्रिक पिढीला कसे सांगावे? पिकलेला आंबा चवीला किती गोड आहे तो भाग वेगळा पण त्या आंब्याची कोय चुलीत खरपूस भाजून तो भाजलेला गर किती खमंग लागतो ते ज्याने ती चव घेतली त्यालाच ठाऊक. उन्हाच्या भयाने निसर्गातील इतर सर्व झाडांनी हार मानली तरी फुलांसाठी गुलमोहर आणि फळांसाठी आंबा उन्हाला वाकोल्या दावत हसत असतात. हिरव्या कैऱ्या खाली पडल्या की दात आमसर होईपर्यंत पोट गच्च करायचे दिवस पाहता पाहता मागे पडलेत. हळूच आंब्याच्या झाडावरून कुहू कुहू आवाज करणारी कोकीळ आपण शोधू लागलो की हिरव्या टपोऱ्या कैऱ्याच्या गर्दीमध्ये एखादी कैरी रंग बदलून पानांच्या गर्दीआड लपलेली असते. कधी ती हवेने स्वतःच खाली उडी मारते तर कधी माणसाच्या आवाक्यात आली की तोडून घेतो, सुगंध आणि कापल्यानंतर, फोडल्यानंतर झाडावरच पिकल्यामुळे आलेला गोडवा ज्याने चाखला त्याला गवताखाली दाबून नैसर्गिक रीतीने पिकवलेला आंबाही गोड लागत नसे तर आजच्या काळात रासायनिक पावडर टाकून पिकवलेले आंबा त्याला काय गोड लागणार?

(पान ६ वर)

# अनफ्रेंड

ज्यादिवशी तो तिला फेसबुकवर भेटला आणि तिने त्याची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारली त्या दिवशी गच्च काळे नभ भरून पावसाळी वारे वाहात होते. मग जशी संततधार सुरू राहावी तसे त्यांचे कधी मॅसेंजरवर तर कधी पटकन बरे पडते म्हणून व्हॉटस्अ‍ॅपवर बोलणे सुरू झाले. ती आपली एक छोट्या गावातली चित्रकार मुलगी. आजूबाजूचा निसर्ग न्याहाळून तो जसाच्या तसाच कॅनव्हॉसवर उतरविण्याचा तिला खुळा नाद! तो तिच्या चित्रांवर आकर्षित झालेला एक बडा दिग्दर्शक. वयानेही जरा मोठा. दोघांची व्हेवलेंथ अगदी सहज जुळलेली. नुकतेच साक्षगंध झालेल्या आपल्या भावी वराशी, विक्रमशी ती जितके बोलू शकत नसे तितके ती त्यांच्याशी बोलायची. हो त्यांच्याशी. ती त्याला मानाने अहो-जाहो असे संबोधायची तर तो तिला एकेरीने तू-मी. छान सुरू होती दोघांची संभाषण यात्रा. मन मोकळे होत होते. ''हाय रानभुली काय करतेस?'' एक दिवस पहाटेच त्यांचा मॅसेज आला. ''रानभुली? हे काय नवीन आता?'' ''तुझे नवीन नाव, सतत रानावनात फिरत असतेस ना! फुलांवर जीव लावतेस. वाऱ्यावर नाचणाऱ्या पानांवर थिरकतेस. म्हणून माझी रानभुली.'' ती नादावली.

काही वेगळे घडत होते. असे बोलणे विक्रमला का नाही सुचत? तो आपला नेहमी कॉम्प्युटरमध्येच घुसलेला. विक्रमला सोडून आपण त्यांच्याकडे जरा जास्तच झेपावतोय का? मनात उठलेल्या प्रश्नाने ती सर्रकन् दचकली. घरात आजूबाजूला पाहिले. तिच्यासारखेच तिचे घर लग्नाळू झाले होते. अहेरांच्या साड्य, शर्टपीस, भांडीकुंडी सगळी तयारी जय्यत सुरू होती. आपण हे लग्न मोडावे का? चटकन तिच्या आत एक प्रश्न उमटला. तितक्याच ताकदीने तिने तो उपटून फेकला. परंतु आपणही त्यांच्याकडे झुकतोय, याची तिला ठळक जाणीव झाली. दुपारी नारळसुपारीच्या बागेत बरसणाऱ्या रिमझिम धारा बघत ती निवांत बसली असताना पुन्हा त्यांचा मॅसेज आला. क्षणभर तिला वाटले नको ते वाचणे आणि पुन्हा त्या मंत्रमुग्ध शब्दात हरवून जाणे. ''तू मला तुझे रान दाखवशील का?'' अरे किती साधे सरळ तर विचारले त्यांनी. आपण उगाच फार खोलात शिरतोय.

मग तीही पुष्कळशी निश्चिंत होऊन तासभर बोलत बसली. एका ऐतिहासिक नायिकेवर ते एक सिनेमा दिग्दर्शित करीत होते. तिने गमतीने विचारलेही, ''मला पण कुठल्या चित्रपटाची नायिका कराल का?'' ''तुला विनापाश यावे लागेल, पण मुंबईला..., जमेल का?'' त्यांचे तडक उलट विचारणे. तिचे चरकणे. आजकाल का असे दचकायला होतंय? ते फार सभ्यपणाने बोलतात. तिने उत्तर दिले नाही तर पुन:पुन्हा मॅसेज करून त्रासही देत नाहीत. आपण त्यांच्यात अपार गुंतत चाललोय का? विचारांचा कितीही गुणाकार-भागाकार केला तरी ते सुद्धा आपल्यात फार फार गुंतलेय, याची तिला जाणीव झाली. तिने धावत जाऊन नवलाने आरशात पाहिले. आपण गोड आहोत, सुंदर आहोत असे सर्वच म्हणतात. विक्रमच्याही डोळ्यात दिसतं. पण तो कधी यांच्यासारखा फुलारून बोलला नाही की शब्दागणीक जवळ आला नाही. यांना कसे जमले दोन जीवांतले अंतर इतके झपाट्याने कापणे? विक्रमने आपल्याला भावी आयुष्यासाठी गृहीतच धरले आणि यांनी आपल्यातल्या आपल्याला मागितले. जीवनचक्र विक्रमला देण्यापेक्षा आपल्याला यांना देणे आवडेल. यांच्यातल्या कलासक्त कलाकाराने आपल्याला बरोबर उचललेय आणि निर्विवाद ते आपल्याला आवडलंय. भविष्यात हवंय. मनातला डोह खूप डचमळला असला, तरी पुढचे चार-पाच दिवस ते नेहमीसारखे बोलत राहिले. ती नेसत्या वस्त्रानिशी जरी गेली असती, तरी त्यांनी त्याक्षणीच तिच्याशी लग्न करून तिला नि:शंक करून टाकले असते. सिनेमाशी संबंधित प्रत्येकच माणूस वाईट थोडाच असतो. राहिला प्रश्न वयाचा. ती तेवीसची. ते अडतीसचे. असावा असाही काही योग. आज ना उद्या आईवडील समजून घेतीलच. हं, विक्रमला खूप वाईट वाटेल, विश्वासघात झाल्यासारखे होईल; पण सावरेल तोही. लग्नही करेल वर्षा-दीड वर्षात दुसऱ्या कुठल्या मुलीशी. कसल्याही शंकाकुशंका न ठेवता सगळ्या बाबींवर विस्तृत बोलणेझाले. तिची खात्री पटल्यावरच फोन ठेवला. निर्णय तिच्यावर सोपवला. ते इतक्या प्रामाणिक पोटतिडकीने बोलले नसते तरी तिला त्यांच्याबद्दल पूर्ण विश्वास होता.

भयंकर अस्वस्थतेत ती झोपायला गेली. आयुष्याचा सगळा साचा ठरलेला असताना आता तिला एक नवीन निर्णय घ्यायचा होता. विक्रमला मनमेंदूत कुठेही न ठेवता आपणही त्यांच्यात अडकून पडलोय, ही आठवण अर्धवट उद्ध्वस्थ झोपेत येत राहिली. आकाशात विजांचा कडकडाट सुरू होता. व्यवस्थित तयार झाली ती सकाळी. ओलीचिप्प रात्र सरून गेली होती. फोन आल्यावर कुठलाही अभिनिवेश न बाळगता तिने फोन उचलला. तिचे उत्तर तयारच होते. ''मग काय ठरवलेस तू?'' त्यांचा आत्यंतिक अधीर स्वर. ''आपण समांतर चालूया...'' ती पुढे काही बोलणार तोच विलक्षण वेगात फोन कट झाला. तिला वेड्यासारखे झाले एकदम.

आधार सुटल्यासारखी ती भिजलेल्या झाडा-पाना-फुलात हातपाय मारू लागली. तिला खूप समजावून सांगायचे होते त्यांना. आज त्यांच्यापेक्षा मोठे होऊन मन सांभाळायचे होते. त्यांचे व्यक्त होणे जर तिने कधी गैर मानले नाही तर त्यांनी का म्हणून तिचे पूर्ण ऐकून घेऊ नये? व्यक्ती आहे, व्यक्त होणार! रक्त आहे, आरक्त किंवा विरक्त होणारच! समांतर राहणेही राहणेच आहे ना? त्यांच्याआधी तिच्या आयुष्यात विक्रम येऊन थांबल्याने सोबतीचा अट्टाहास धरण्याची वेळ निघून गेली होती. ते सच्चे आहेत याबद्दल तिचे दुमतच नव्हते. त्यांच्या आतवर चाललेल्या भयानक उलथापालथीची ती कल्पना करू शकत होती. नुसते तेच तुटले नसून आपणही भुईसपाट झालोय. त्यांचे येणे हा वळवाचा पाऊस होता. तो गंध आयुष्यभर घमघमवतही राहिला असता कदाचित... त्या दिवशी त्यांना फोन करायची, त्यांचा मॅसेज बघायची तिला हिंमत झाली नाही. कुठेतरी ते आपल्याला, परिस्थितीला समजून घेतील, आपले सहप्रवासी म्हणून सोबत राहतील अशा आशेत ती निजली.

दुसऱ्या दिवशी न राहवून तिने व्हॉटस्अ‍ॅप उघडले. त्यांचा डीपी गायब होता. तिने त्यांना मॅसेज पाठवला, पण मॅसेज गेला नाही. त्यांनी तिला अनफ्रेंड, ब्लॉक केले होते. ती मलूल, दु:खी झाली. त्यांना दुसऱ्या फोनवरून फोन करावा, असेही मनात आले. मात्र, तिने तसे केले नाही. त्यांचे ठिबकणे थांबतपर्यंत वेळ जाऊ द्यायचे ठरवले. त्यावेळी.... त्यावेळीही मुसळधार पाऊस कोसळत होता.

जयश्री दाणी

पान१ वरून

# मृगजळ की नवी सुरुवात?

आरोग्याशी संबंधित जागतिक मानके ठरवणे, संशोधनाला दिशा देणे आणि आपत्तीच्या वेळी समन्वय साधणे हे तिचे प्रमुख कार्यक्षेत्र. मात्र, 'कोविड' काळातील तिची भूमिका आणि परिणाम पाहता तिच्या पुनर्मूल्यांकनाची गरज निर्माण झाली आहे. सार्वजनिक आरोग्याबाबत निर्णय घेणार्या संस्थेकडे पारदर्शक, दबाव झुगारणारे आणि विज्ञानाधिष्ठित नेतृत्व असणे आवश्यक आहे. सध्या झालेला हा नवा करार या प्रक्रियेचा सुरुवातीचा टप्पा असू शकतो. पण, जर त्यामध्ये निर्णायक अटी, जबाबदार्या आणि न्याय्य वितरणाची काळजी घेतली नाही, तर तो केवळ एक सैद्धांतिक दस्तऐवजच ठरेल. 'जागतिक आरोग्य संघटने'चा नवा 'महामारी करार' हा भविष्यातील महामारी रोखण्याचा एक महत्त्वाचा प्रयत्न आहे. पण, हा प्रयत्न साकार होत असताना, दुसरीकडे 'जागतिक आरोग्य संघटने'ची विश्वासार्हताही पणाला लागली आहे. जागतिक आरोग्य व्यवस्थेला केवळ धोरणांची गरज नाही, तर त्यांची अंमलबजावणी करणार्या पारदर्शक यंत्रणांचीही गरज आहे, अन्यथा असे केलेले अनेक करार हे नजीकच्या भविष्यात बुडणार्या बँकेचा, पुढील तारखेचा धनादेश ठरण्याचीच शक्यता अधिक आहे.

ललित
रश्मी वाघमारे

# मतदान



ळ्या करता करता सुमनने बाहेर पाहिलं. समोरून भोंगा चालला होता. 'मते द्या, मते द्या, मते द्या. सायकलला विजयी करा.' सगळीकडे इलेक्शनची रणधुमाळी चालू होती. पानठेल्यापासून तर सरकारी दप्तरापर्यंत इलेक्शनशिवाय दुसरा विषय नव्हता. चौकाचौकात जमणारे, पानठेल्यावर पिचकाऱ्या मारणारे टोळभैरव कामाला लागले होते. ''सुमन, ए सुमन! असं म्हणत मंदा आत आली. ''झाली काम?'' ''अग कामं कुठं समतात होय? आता ते कुणी वार्ताहर उतरले लॉजवर. त्यांना डब्बे द्यायचेत.''

सुमन म्हणाली. ''हे बघ सुमन, ते सगळं राहू दे. आपल्याला आता सभेला जायचंय.'' ''छे गं बाई, सभेला कसली जातेय.'' ''अगं ऐक तर खरं, ते तीनशे रुपये देणार आहेत. पंधरा आण म्हणे. मी आपल्या मैत्रिणींना सांगून आलेय. चल पटकन.'' ''अगं पण वेळ किती जाईल?'' ''काही वेळ जात नाही. तिथे जायचं तोंड दाखवायचं. पैसे घ्यायचे, सही करायची आणि परत यायचं. चल तिनशे रुपये मिळताहेत ना.'' सुमनने पोळ्यांचा गोळा झाकून ठेवला. अंगावरचं जुनेर बदलून तारेवरची साडी ओढली. पटकन नेसून ती निघाली बरोबर. बाकीच्या सगळ्या बाहेर वाटच पाहत होत्या. मंदाने डोकी मोजली. बरोबर पंधरा. तिनं राघवला सांगितलं होतं. पाच हजार दे, पंधरा जणी आणते. या सगळ्यांना वाटूनही तिच्याजवळ पाचशे रुपये उरणार होते.

आपल्या व्यवहारचातुर्यावर मंदा मनोमन खूश झाली. मैदानावार तशी फारशी गर्दी नव्हती. राघवं त्यांची वाटच पाहत होता. त्यानं सगळ्यांचा फोटो काढला. कागदावर नावे लिहीत सगळ्यांच्या सह्या घेतल्या आणि मंदाच्या हाती पैसे दिलेत. तिकडे भाषण सुरू झाले होते. राघव गेलेला पाहुन मंदाने सगळ्यांना बाहेर काढलं. ''चला बाहेरच देते पैसे-'' प्रत्येकीच्या हाती पैसे देत मंदा मोकळी झाली. ती सुमनला म्हणाली. ''बघ, अर्धा तासात मिळाले न ा तीनशे रुपये. चल जाऊया घरी.'' भाषणाशी काही कर्तव्य नव्हतं. थोडं दूर गेल्यानंतर मनोज त्यांना आडवा आला. ''काय मंदाताई, मोर्चा घेऊन आल्या होतात वाटतं.'' ''हो बाबा, मिळताहेत तेवढं पदरात पाडून घ्यावं.'' ''हो ना? मग संध्याकाळी या रोड शो आहे आमचा.'' ''तू कुठला रे बाबा?'' ''अहो, मी टेलिव्हिजनचा. देणार ना मत तुम्ही टेलिव्हिजनला? पाचशे रुपये देतो, रोड शोमध्ये या.'' ''आता अर्धा तासात तीनशे भेटले. पाचशेमध्ये किती वेळ थांबवशील?'' ''एक तास.'' ''ठीक आहे. येऊ आम्ही संध्याकाळी सहा वाजता.''

मनोज गेला. तशी मंदा सुमनकडे वळून म्हणाली, ''चला, सुगीचे दिवस आहेत आपले. मिळतात तेवढे दाणे टिपूयात.'' सुमन घरी येऊन अर्धवट राहिलेल्या पोळ्या करू लागली. शंकर ते डब्बे पोहोचवून आला होता. पण एवढा वेळ झाला तरी त्याचा पत्ताच नव्हता. आता कुणाला डब्बे न्यायला सांगावं, असा विचार करत ती दाराबाहेर आली तर शंकर भेलकांडत येताना दिसला.

सुमन ओरडली. ''काय हे? दिवस नाही, रात्र नाही. पैसे मिळाले की, ढोसायची का?'' ''पैसे नाही, पैसे नाही. अगं फुक्कट वाटतोय तो दारू. प्या लावा. आपण प्यायलो. आंगठा लावू नंतर.'' असं म्हणत तो घरात जाऊन लुडकला. ज्यांचे डब्बे पोहोचवायचे तीच माणसं समोरून येताना दिसली. सुमन ओशाळली. ''अहो, पाठवायचे होते डब्बे, पण हे पाहा काय करून ठेवलंय सायकलवाल्यांनी.'' तिने दारूच्या नशेत पसरलेल्या शंकरकडे बोट दाखवलं. ''नक्कीच सायकलवाल्याने पाजली?'' ''सायकलवाल्यांनीच पाजली. तो सांगतोय तर तसंच.'' वार्ताहर विरोधी पक्षाचे. आयतं खाद्य मिळालं त्यांना. त्यांनी आपला व्हिडीओ कॅमेरा सरसावला. ''त्याला बाहेर आणून शिव्या घालाल का चार? पैसे देतो.'' शिव्या घालण्याची एवढी चांगली संधी, तेही पैसे घेऊन. सुमन कशी सोडेल! शंकरला कॉलरला धरून तिनं बाहेर आणलं... ''आरं भाड्या, काही वेळ काळ नाही तुला, फुक्कटाची दिली का! कुणी?'' दोन्ही हात सायकलच्या पॅडलसारखे मारले. सुमनने मग यथेच्छ तोंडसुख घेतल. हे सगळं व्हिडीओत बंदिस्त झालं. पाचशे देऊन आणि आपले डब्बे घेऊन ती लोक चालू लागली.

आता सुमनला जाणीव झाली, भूक लागली आपल्याला. तिनं आत जाऊन एक ताट वाढलं. कोपऱ्यात पसरलेल्या शंकरसमोर नेऊन आदळलं. पुन्हा त्याला बकोटं धरून 'गिळा आता आणि मग पसरा.' असं म्हणून आपलंही ताट वाढायला घेतलं. तेवढ्यात तिची म्हातारी सासू लंगडत आली. सुमनने दोघींची ताटं घेत विचारलं, ''दाखवला पाय डॉक्टरला?'' ''हो. पस झालाय जखमेत. चिरा दिला डॉक्टरने.'' मग जेवता जेवता सासूनं विचारलं, ''गेली होतीस मंदाबरोबर; मी पण आली असती.'' ''अवं पण तुम्हाला डॉक्टरकडे जायचं होतं ना! पुन्हा जायचंय मंदाबरोबर. सुमनने नंतर थोडावेळ झोपण्याचा प्रयत्न केला. पण संध्याकाळचे डब्बे तिला खुणावत होते. ते भरूनच मग रोड शो मध्ये जाता आलं असतं. ती पुन्हा संध्याकाळच्या स्वयंपाकाला लागली. सहा वाजताच्या सुमाराला मंदा आली. ''मी पण येणार.'' म्हातारीनं ऐलान केलं. ''अगं, पण तुला चालायला त्रास होईल ना!'' ''दुखला तर दुखला पाय. पाचशे रुपये भेटतील.'' मावशीला कसं न्यावं. मनोजला पण विचार पडला. त्याने एक युक्ती केली. एका गाडीवर दिलं त्यानं मावशीला बसवून. मग काय रॅलीमध्ये गाडीतून आयतं फिरायला मिळालं. मावशी मस्त झोपली. ''मावशी, घे झोपायचे पाचशे रुपये.' ''अरे सुमनजवळ दे, तिलाच लागतात मीठ-मिरचीसाठी.'' मावशीच्या संमजसपणाच सुमनला कौतुक वाटलं. दोघींचेही पैसे आपल्या पर्समध्ये टाकून ती निघाली तर मंदाने पुन्हा थांबवल.

''उद्या शेजारच्या गावात सभा आहे. गाडीत घेऊन जातील आपल्याला. जेवण तिथेच आन् वर पाचशे रुपये दक्षिणा. सकाळी आठ वाजता इथे चौकातच येईल गाडी.'' ''अगं पण सकाळची...'' ''पडू द्यायची दोन दिवस. नंतर कोण बोलावतंय आपल्याला.'' ''डब्बे आहेत ना?'' तेवढ्यात समोरून येणाऱ्यानं सांगितल, ''उद्या डब्बे नको काकू. तिकडेच आहे जेवण.'' ''सुटला तुझा प्रश्न.'' मंदा म्हणाली. दुसऱ्या दिवशी अशाच भाडोत्री बायकांनी मंडप सजला होता.

युवा नेता आम्हालाच मते द्या असे ओरडून सांगत होता. त्या गोंगाटातही खुर्चीवर बसल्या बसल्या सुमनला जी झोप लागली, ती मंदाने हालवून उठवल्यावरचं ती जागी झाली. ''चल लवकर. पाच मिनिटात भाषण संपेन. त्याच्या आधी जेवण करून घेऊ.'' जेवण करून दोघी गाडीजवळ आल्या तर बाकीच्याही उभ्याच होत्या. मनोजने सगळ्यांना एकदा नारे लावायला लावले आणि पाचशे रुपयाची बिदागी दिली. पुढले दोन दिवस मंदा नेईल तिकडे जात राहिली. तिच्या पर्समधली गंगाजळी वाढत होती. आज मतदानाचा दिवस. सकाळपासून सुमन अस्वस्थ होती. ''आपण तर सगळ्यांकडूनच पैसे घेतलेत. आता मत कोणाला द्यायचं?'' तिला प्रश्न पडला. सुमनला पैसे घेणं खटकत होतंच. तिन ते बोलून दाखविल्यावर मंदा उसळली. ''अगं तो काय त्याच्या कष्टाचे देतोय? लोकांकडूनच लुबाडलेले वाटतोय झालं! तू का धर्मराज बनतेस?'' सुमन गप्प बसली. पण आता मतदानाला जायचं तिच्या काही मनात येईना. तेवढ्यात बाहेरून हाक आली, मनोज उभा होता बाहेर. ''सुमनताई, अहो चार वाजलेत. मत दिलं नाही अजून? चला गाडी आणलीय तुमच्यासाठी.'' त्यानं सुमनला बळेबळेच बाहेर काढलं.

(पान ६ वर)

संत

प्रकाश एदलाबादकर

# म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे...



**माज हृदयी सदगुरू। जेणे तारिलों हा संसारपूरू। म्हणउनि विशेषें अत्यादरु। विवेकावरी।। जैसें डोळ्यां अंजन भेटें। ते वेळीं दृष्टीस फांटा फुटे। मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी।। कां चिंतामणि जालया हातीं। सदा विजयवृत्ती मनोरथीं। तैसा मी पूर्णकाम निवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे।। म्हणोनि जाणतेनो गुरु भजिजे। तेणे कृतकार्या होईजे। जैसें मूळिसंचनें सहजें। शाखापल्लव संतोषती ।।** ग्रंथराज ज्ञानेश्वरीच्या प्रारंभी मंगलाचरण झाल्यावर माउलीने सद्गुरू स्तवन केलेले आहे. गुरुचरणी अनन्य निष्ठाच भवसागरातून तारून नेते. 'गुरू' म्हणजे मोठा. परंतु केवळ वयाने नव्हे, तर ज्ञान- अनुभव- व्यवहार या सर्व दृष्टीने मोठा. आपल्यापेक्षा वयाने लहान असलेली व्यक्तीही केवळ तिचा अशा गुरुपणामुळे 'गुरुपदी' बसण्यास योग्य असते. सद्गुरूंचे स्मरण हेच कार्यपूर्तीचे समाधान देते.

गुरुकृपा हेच जीवनवृक्षाचे मूळ आहे. त्याचे श्रद्धारूपी पाण्याने सिंचन करा, त्या वृक्षाची अन्य सर्व अंगे फुलातील. वरील ओव्या वाचल्यानंतर, सद्गुरूंया ठायी असलेली ज्ञानेश्वर माउलीची भक्ती आणि श्रद्धा दिसून येते. सांप्रतच्या सामाजिक आणि सांस्कृतिक वातारणात तर समाजधारणेचे कार्य फारच कठीण कर्म झालेले आहे. त्यासाठी कुणातरी अनुभवी व्यक्तीचे मार्गदर्शन हवे असते. अशा अनुभवी आणि योग्य वेळी योग्य मार्गदर्शन करणाऱ्या व्यक्ती सहजासहजी मिळत नसतात. अशी व्यक्ती देवाच्याच जागी असावी लागते आणि ती असते सद्गुरू! गुरू आणि शिष्य यांचे संबंध आई आणि तिचे अपत्य यासारखे असतात. आई आपल्या अपत्याला वाढवते, त्याला चालणे-बोलणे शिकविते. त्याला व्यवहारज्ञान शिकविते. त्याच्यावर एखादे संकट आले तर त्याला आपल्या पदराच्या छायेत घेते. त्याला संस्कारयुक्त करते. आपला मुलगा/ मुलगी एक उत्तम नागरिक व्हावी याचा प्रयत्न करते. गुरूही आपल्या शिष्यावर अपत्यवत प्रेम करतात. ज्ञानेश्वरीच्या पहिल्या अध्यायाच्या ओव्यांमध्येच गुरुवंदना आहे. '**तैसा पुढुति पुढुति तोचि। मियां वंदिला श्रीगुरूचि। जो अभिलाखित मनोरथुची। पुरविता।।**' ज्ञानदेवांच्या जीवनात सद्गुरू हा फार मोठा आधार होता. केवळ त्यांच्याच नव्हे, तर सर्वच संत आणि सत्पुरुषांच्या आयुष्यात सद्गुरू हा त्यांचा जीवनाधार ठरलेला आहे. या संतसज्जनांचे आणि सत्पुरुषांचे हे गुरू म्हणजे त्यांच्या जीवनाला आकार देणारे, त्यांची जडणघडण करणारे हात आहेत. या प्रत्येकाने आपापल्या गुरूंच्या चरणावर आपले जीवनच समर्पित केलेले आहे म्हणा ना! संत निवृत्तिनाथांसारखा गुरू आणि संत ज्ञानदेवांसारखा **शिष्य! तिथे भक्तीला आणि प्रतिभेला धुमारे फुटणारच. म्हणूनच माउली म्हणतेतैसा वागविलास विस्तारू। गीतार्थेसी विश्वभरु। आनन्दाचे आवारू। मांडू जागा।। फिटो विवेकाची वाणी। हो काना मना जीनी। देखो आवाडे तो खाणी। ब्रह्मविद्येची।। दिसो परातत्व डोळा। पाहो सुखचा सोहळा राघो महाबोध सकळा। माजी विश्व।।** गुरू कसा असावा याचे निवृत्तिनाथ आदर्श आहेत. हे गुरू केवळ अनुग्रह आणि गुरुमंत्र यापुरते मर्यादित नाहीत. त्यांनी शिष्याची योग्यता पूर्णपणे ओळखलेली आहे. ते शिष्याचा केवळ आधारच नाहीत तर सोबती आहेत. शिष्य ज्या मार्गाने जाऊ इच्छितात त्या मार्गावर त्यांना मायेची पाखर देणारे असे हे गुरू मुख्यत्वेकरून एकांतात राहतात. एकांतवासात चिंतन करतात. आपल्या शिष्याच्या ज्ञानवाटा कशा उजळतात, कशा विस्तारित करता येतील याचेच ते चिंतन करतात आणि लोकांतात वावरताना तसे आचरण करून दाखवतात. म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या बाराव्या अध्यायाच्या प्रारंभी ज्ञानदेवांनी गुरुस्तवनच्या ज्या ओव्या निवेदिल्या आहेत, त्या म्हणजे गुरुमाहात्म्याची परमावधीच आहे.

सद्गुरू हा ज्ञानाचा अथांग सागर असतो आणि ज्ञानाचा चण्डप्रतापी सूर्यही असतो. म्हणूनच ज्ञानेश्वरीच्या अध्यायांमधील ही गुरुस्तवने अत्यंत मौल्यवान आहेत. ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायातील गुरुस्तवनावर तर एखादा ग्रंथच लिहिता येईल. गुरुकृपेतून आलेल्या अनुभवांचे ज्यावेळेस आकलन होते, त्यावेळेस साधकाची, अभ्यासकांची चित्तवृत्तीच पालटते. शिष्यातील क्षमतांचा विकास करतो तो गुरू. बाराव्या तसेच सोळाव्या अध्यायाच्या प्रारंभी माउली म्हणते **जय जय शुद्धे। उदार प्रसिद्धे अनवरत आनंदे। वर्षतीये।। १२/१ विषयव्याळें मिठी। दिधलिया नुठीताठी। ते तुझिये गुरुकृपा दृष्टी। निर्विष होय।।** १२/२ **मावळवीत विश्वभासु। नवल उदयला चंडांशु। अद्वयाब्जीनिविकाशु। वंदूं आतां।।** १६ /१ **जो अविद्ये राती रुसोनियां। गिळी ज्ञानाज्ञान चांदणियां। जो सुदिनु करी ज्ञानियां। स्वबोधाचा ।।** १६/ २ ज्ञानदेवच नव्हे तर संतप्रवर जगद्गुरू तुकाराम महाराजांनीही गुरुकृपेचा महिमा वर्णिलेला आहे. मुख्य म्हणजे त्यांनी दांभिक, अर्धवट आणि पोटभरू गुरूंचा भरपूर समाचारही घेतलेला आहे. मुमुक्षुला सद्गुरू शोधावे लागत नसतात. सद्गुरूच स्वतः शिष्याचा शोध घेत येतात, याची कित्येक उदाहरणे देता येतील. सर्व संत-सत्पुरुष सारखेच असतात, परंतु त्यातील आपले गुरू हे नियोजितच असतात. गुरू केव्हा लाभतील हे सांगता येत नाही. भगवंताच्या इच्छेनुसार यथाकाळी संत तुकोबारायांना सद्गुरू बाबाजी चैतन्य महाराज भेटले. त्यांनीच तुकोबारायांना 'रामकृष्णहरी' हा मंत्र दिला. तुकोबाराय सांगतात **सत्य गुरुराये मज कृपा केली। परी नाही घडली सेवा काही।। सापडविले वाटे जाता गंगास्नाना। मस्तकी तो जाणा ठेविला करू।। बाबाजी आपुले सांगितले नाम। मंत्र दिला रामकृष्ण हरी।। माहो शुद्ध दशमी पाहूनी गुरुवार। केला अंगीकार तुका म्हणे।।** गुरुकृपेचे असे महिमान अनेक संतांनी सांगितलेले आहे. कोणताही शास्त्राभ्यास, कलेची साधना, परमार्थसाधन हे गुरुकृपेवाचून सिद्ध होत नसते. आपल्या बुद्धी आणि प्रतिभेच्या जोरावर कितीही ज्ञान मिळविले, तरी त्यामुळे अभावितपणे आणि अनाहूतपणे येणारा अहंकार ज्ञानाला ग्रहण लावतो. हा अहंकार केवळ आणि केवळ गुरुकृपेनेच निरास पावतो आणि अहंकारविरहित ज्ञान हे ज्ञानसाधकाची उंची वाढविणारे ठरते. अध्यात्म हे अनुभवाचे शास्त्र आहे.

आपल्याला येणारी प्रचीती हा त्याचा आत्मा आहे. जो साधक शुद्ध भावाने भगवंताची आराधना करतो, त्याचे अनुसंधान करतो, त्याची मानसपूजा करतो त्याला ही अनुभवावस्था प्राप्त होते. येथे परत संत निवृत्तिनाथ आठवतात. संत मुक्ताबाईला अशी 'स्थिती' निवृत्तिनाथांच्या गुरुकृपेने प्रा झाली होती. मुक्ताई म्हणते- **निवृत्तीने दिली शक्ती। चित्त पावले विश्रांती।। विसांवया आले मन। मन जाहले उन्मन ।। धन्य जीविताची थोरी । एकविध चराचरी ।। भास मावळला ठायी । सुखी झाली मुक्ताई ।।** आत्मसाक्षात्काराच्या वाटेवरचे ही सारे प्रवासी होते. या आत्म साक्षात्काराच्या वाटेवर प्रत्येकाला गुरू प्राप्त झाले. समर्थ रामदासांचे गुरू तर प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र होते. त्याचे अनेक दाखले देता येतील. तात्पर्य एकच, जीवनाच्या वाटचालीत आपल्याला कुणीतरी मार्गदर्शक हवा असतो. आपल्याला सांभाळून घेणारा, प्रसंगी आपल्या चुका सांगून रागावणारा, आपल्या वाटेवरची सावली होणारा असा कुणीतरी हवा असतो. आयुष्यात आपण अनेकदा समस्यांच्या चक्रव्यूहात सापडतो. त्यातून बाहेर निघण्याची वाटच गवसत नाही. दिशांचे भान विसरायला होऊन आपण दिशाहीन होतो. आपल्या अशा अवस्थेत आपली म्हणवणारी माणसेसुद्धा संपर्कात राहत नाहीत. आपल्याला दूर सारतात. भोवताली पसरलेल्या भयाण अंधारात तेजाची बारीकशी शलाका आपले जीवन उजळण्यासाठी यावी, हीच आपली आशा असते. तो तेजाचा कण म्हणजे गुरू! असे गुरू लाभणे हे सुद्धा भाग्याचे लक्षण असते. गुरू करायचा नसतो, गुरूच आपल्या शिष्याला शोधत येतो हे जाणीवपूर्वक लक्षात ठेवले पाहिजे. गुरूची खरी शिकवण काय असेल, तर तो आपल्या शिष्याला त्याच्या

स्वत्वाची जाणीव करून देतो. खरी गुरुकृपा ती हीच! कर्मकांडाचे अवडंबर दूर ठेवून केवळ आपल्या उपदेशाने शिष्याचे जीवन उजळतो तो गुरू! प्रत्येकाच्या जीवनाच्या वाटा जन्मसिद्ध असतात. या वाटाच त्याचा प्रकृतिधर्म असतो. प्रत्येक वाट सरळ असेलच असे नाही. वळणे असणारच. प्रत्येक वाट स्वच्छ आणि निष्कंटक असेलच असेही नाही. या वाटांवरील अडथळे नष्ट करण्याचे बळ देतो तो गुरू. आपल्या आयुष्यात घडणाऱ्या घटनांचे कार्यकारणभाव जाणण्याची शक्ती देतो तो गुरू. आपल्या संपर्कात येणाऱ्या व्यक्तींची योग्य पारख करण्याची दृष्टी देतो तो गुरू. अध्यात्मशास्त्रातील गुरुकृपा तर महत्त्वाची आहेच; पण दैनंदिन व्यवहारातही गुरुकृपा हवीच. निदान सध्याच्या आत्मकेंद्री राहण्याच्या काळात तर हवीच हवी! गुरुकृपा ही व्यवहाराला विशुद्धतेची जोड देते. आपण सर्वसामान्य प्रापंचिक आहोत. आपल्या ठायी जसे विचार आहेत तसेच विकारही आहेत, हे कुणी नाकारू शकत नाही. तरीही मनःशांतीसाठी म्हणून परमार्थाचीही आपल्याला ओढ आहे. प्रपंच आणि परमार्थ ही तारेवरची कसरत असते. परंतु याचाही ताल आणि तोल केवळ गुरुकृपेनेच साधतो. यालाच स्वात्मभावाची जागृती म्हणतात. यानेच दृष्टी निरंजन होते. वृत्ती निरामय होते, निदान व्हावी ही अपेक्षा असते. मनाचा दुबळेपणा नष्ट होतो. एका वेगळ्या सामर्थ्याचा अनुभव येतो. आपल्या संस्कृतीत व्यक्तीचे दोन जन्म सांगितलेले आहेत. पहिला आईच्या गर्भातून होतो आणि दुसरा सद्गुरूने दिलेल्या ज्ञानातून! आपल्या मनात अनेक विचारांचे थैमान सतत सुरू असते. या विचारांना योग्य दिशा देण्याचे काम गुरू करतात. त्यातूनच विवेक जन्माला येतो. गुरुकृपेने प्राप्त झालेला हा विवेकच आपला दुसरा जन्म असतो. हा विवेकच आयुष्य उजळून टाकतो. 'रामचरित मानस'च्या रचनेच्या प्रारंभी गोस्वामी तुलसीदासांनी गुरुवंदनपर पद्य लिहिलेले आहे. ते म्हणतात, आयुष्यात केलेली पुण्यकर्मे केवळ गुरुकृपेनेच फलिभूत होतात. शिष्याला जे काही कर्म करायचे आहे ते त्याने निरहंकारी वृत्तीनेच केले पाहिजे आणि ही निरहंकारी वृत्ती केवळ सद्गुरू कृपेनेच अंगी बाणते. गुरू आणि वेद यांच्या आदेशानुसार जे कर्म केले जाते, त्याचे फळ हे परिश्रमाशिवाय प्राप्त होते. ते म्हणतात- **गुरु श्रुति संमत धरम फलु पाईअ बिनहि कलेस। हठ बस सब संकट सहे गालव नहुष नरेस।। गुरु पद रज मृदु मंजुल अंजन। नयन अमिअ दृग दोष बिभंजन।। तेहिं करि बिमल बिबेक बिलोचन। बरनउं राम चरित भव मोचन। सद्गुरूंच्या पायाची** धूळ हेच, दृष्टीत असलेल्या अज्ञानाचा आणि अहंकाराचा अंधार नष्ट करणारे अंजन आहे. हे अंजन सर्वांना प्राप्त होवो.

---

**अतिमार्गक्रमण, उन्हात फिरणे, डांबरी रस्त्यांवरून अनवाणी फिरणे, फार तिखट व उष्ण पदार्थ खाणे, सांसर्गिक रुग्णाशी संपर्क येणे इत्यादी कारणामुळे मूत्ररोग होतो.**

# मूत्र रोगाची कारणे व उपाय

आजीचा बटवा

नारायण कारंजकर
भ्र. ९४२३७५८४०१



**उपायः-**
१) लघवी अडली असेल तर सिताफळीची होणे मुळी शिळ्या पाण्यात उगाळून खडीसाखरेची पूड घालून प्यावयास द्यावी. २) उन्हाळे लागले तर- सराट्याचा काढा थंड झाल्यावर मध प्यावा. ३) थेंब थेंब लघवी होत असेल तर कोथिंबिरीचा रस समभाग पाणी मिसळून प्यावा. ४) मूत्र कढत- कढत व मूत्र मार्गाचा दाह, होत असेल तर भोजनोत्तर दोन्ही वेळा चंदनासव दोन तोळे समभाग पाण्याबरोबर घ्यावा. ५) वलांडा भरल्यावर बंगभस्म एक गुंज तूप साखरेतून दोन वेळा घ्यावे.

**पथ्य-** नाचण्याची आंबील व ताक द्यावे. ६) गरमी भरली तर सारिवासव दोन तोळे समभाग पाण्याबरोबर द्यावे.

**मुत्ररोगावर उपाय-** अ) गुळवेल सत्व ४ गुंजा सकाळ संध्याकाळ गाईच्या दुधात द्यावे. ब) दूध एक कप पाणी एक कप, सारा २ गुंजा व सोनकाव अर्धा तोळा हे मिश्रण उभे राहून पोटभर प्यावे व लघवी उभ्यानेच करावी. या उपायाने ताबडतोब आराम वाटतो.

**मूत्रागावर पथ्यः-**
दूध, तूप, ताजे गोड ताक, दूधभात, नाचण्याची आंबील, भाकरी, तुरीचे वरण, भूग, केळी, असणे, तिचा डाळिंब, आवळे, चंदन, वाळा, गुलाबकळी, असणे. गुलकंद, थंड पाणी, पडवळ, शेवगा, भेंडी, कारली.

**मूत्ररोगास अपथ्यः-**
ऊनपाणी, जागरण, वातूळ पदार्थ, फणस, पपई, बटाटे, हरभरे, पुरणपोळी, नाटक-सिनेमा पहाणे, अश्लील पुस्तकाचे वाचन.

**मूतखड्याची कारणे व उपायः-**
जेव्हा वायू बस्तीतले शुक्रयुक्त किंवा पित्तयुक्त शुक्र किंवा कफ यांचे शोषण करितो तेव्हा त्या बस्तीमध्ये शुक्रादिक गोठून खडा होतो. त्यास मुतखडा असे म्हणतात.

**कारणे व लक्षणेः-**
मूत्र मार्ग कोंडणे, जोर केला तर फार क्लेश होणे, बस्तीमध्ये क्षत झाले तर रक्तमिश्रित मूत्र इत्यादी याचे चार प्रकार आहेत.
१) वाताश्मरी २) पित्ताश्मरी ३) कफाश्मरी ४) शुक्राश्मरी.

**वाताश्मरीची लक्षणे-** अत्यंत पीडा, दात



खाणे, कफ, शिस्र (पुरुषाचे जननेंद्रिय) व नाभी यास हाताने पिळवटणे, कुंथणे, थेंबथेंब मूत्र होणे, अश्मरी काल्यासारखी खुपणे इत्यादी.

**उपचार-** १) शेवग्याच्या मुळ्यांचा काढा करून तो गरम असताना द्यावा २) सूंठ, ऐरण, पाषाणभेद, कोष्टी कोलिंजन, वायवर्णा, गोखरू, हिरडा आणि बाहव्याचे शेंगेचा मगज याचा काढा करून त्यात हिंग जवखार आणि सैंधव यांचे चूर्ण घालून द्यावा.

**कफाश्मीरीची लक्षणेः-**
बस्तीमध्ये पीडा, आश्मिरी थंड, जड व मोठे असणे, तिचा वर्ण मधासारखा किंवा पांढरा असणे.

**उपायः-** शेवग्याची साल व वायवर्ण्याची साल यांचा काढा जवखार घालून द्यावा.

**शुक्राश्मरीची लक्षणेः-**
मैथुनाचेवेळी स्थानापासून सुटलेले शुक्र पुरेसे मैथुन न झाल्यामुळे न पडलेला शुक्रधातू आपल्या स्थानापासून निघून शिस्राचे व वृषणाचे मध्यभागी आला म्हणजे वायुकुपित होऊन शुक्रधातुचे शोषण करून त्याला ग्रंथीरूप करतो, त्यास शुक्राश्मरी म्हणतात. त्याची लक्षणे बस्तीत शूळ, उन्हाळे वृषणाला सूज इत्यादी.

**सर्व अश्मीरीवर उपायः-**
१) ओव्यास ताकाच्या २१ भावना द्याव्या. नंतर त्याचे बारीक चूर्ण करून ताकातून द्यावे. २) ५ तोळे ताकात २ तोळे जवखार घालून द्यावा. ३) कोहळ्याचे रसात ४ गुंजा भाजलेला हिंग व २ ग्रॅम जवखार घालून द्यावा. ४) उंबराच्या मुळाचे ५ तोळे पाणी प्यावयास द्यावे. ५) कुड्याची साल दह्यात उगाळून द्यावी. ६) उंबराची मुळी गाईच्या दुधात उगाळून शिस्नावर लेप करावा. ७) सिताफळीच्या मुळी पाण्यात उगाळून द्यावी. ८) शतावरीच्या मुळ्यांचा रस याचा काढा करून त्यात हिंग, जवखार आणि व गाईचे दूध समभाग एकत्र करून द्यावे.

**मूतखड्यास पथ्यः-**
मूग, गहू, कुळीथ, तांदुळजा, रमन, लंघन

**मूतखड्यास अपथ्यः-**
मल, मूत्र, शुक्र यांच्या वेगाचा अवरोध करणे, जडान्न इत्यादी.
( मेहता ट्रस्ट सौजन्याने.)

---

थोडं मनातलं

विश्वास देशपांडे
भ्र. ९४०३७४९९३२

# रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य


(भाग ४३)

## भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी रवींद्रनाथ - भाग तीन

जगभरातील विविध देशात रवींद्रनाथ भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून आपला ठसा उमटवत होते. बर्याच ठिकाणी त्यांची व्याख्याने होत होती. युरोपातील बऱ्याच ठिकाणी त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली आणि त्यांच्या चित्रकलेच्या वेगळ्या शैलीने लोकांचे लक्ष वेधून घेतले. याचवेळी आणखीही एक महत्त्वाची गोष्ट घडली. ते इंग्लंडमध्ये असताना ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीने तेथे होणार्या प्रतिष्ठित अशा हिबर्ट व्याख्यानमालेसाठी रवींद्रनाथांना आमंत्रित केले. यावेळी त्यांचे वय ६९ वर्षे होते.

या व्याख्यानमालेचे वैशिष्ट्य असे होते की ही व्याख्याने युरोपातील विद्वान अशा तत्वज्ञ लोकांसाठी होत असत. या व्याख्यानांमध्ये बोलणारी व्यक्ती देखील अत्यंत विद्वान तत्वज्ञ असावी अशी परंपरा होती. परंतु भारताच्यादृष्टीने एक सुखद आश्चर्य असे घडले की आतापर्यंत साहित्यिक आणि शिक्षण-तज्ज्ञ म्हणून ख्याती असलेल्या रवींद्रनाथांना या व्याख्यानमालेसाठी तत्वज्ञ म्हणून आमंत्रित करण्यात आले. त्यांना या व्याख्यानांसाठी आमंत्रित करणाऱ्या विद्यापीठातील अधिकाऱ्यांचे म्हणणे होते की रवींद्रनाथांचे तत्त्वज्ञान त्यांच्या काव्यातून प्रकट झाले आहे आणि त्यांच्या प्रतिभेला आपण तत्त्वज्ञ म्हणून मान्यता देऊ शकतो. हा रवींद्रनाथांचा आणि त्यांच्या प्रतिभेचा मोठाच गौरव होता.

१९३० साली त्यांनी दिलेल्या या अभ्यासपूर्ण व्याख्यानांचे पुस्तक ऑक्सफर्ड विद्यापीठाने 'द रिलीजन ऑफ मॅन' या नावाने प्रसिद्ध केले. ते स्वतः या पुस्तकाच्या संदर्भात बोलताना म्हणतात, मानवतेतील आमच्या ईश्वराची कल्पना किंवा मानवात अंतर्भूत असलेले देवत्व हाच मुख्य विषय या पुस्तकात आहे. ईश्वराविषयी असलेल्या माझ्या विचारांचा विकास कुठल्याही वेगळ्या तत्त्वज्ञानाच्या आधारे झाला नाही. उलटपक्षी माझ्या बालपणी माझ्या तत्कालीन स्वभावानुसार हे घडले



होते. ज्याला पाश्चात्य विद्वान रवींद्रनाथांचे तत्त्वज्ञान असे म्हणत होते, ती तर त्यांची धारणा होती. एका कवीची ती धारणा होती. तो त्यांचा जीवनधर्म होता आणि त्यांच्या जीवनाला आकार देण्यामध्ये त्या गोष्टीची मोठी भूमिका होती.

या व्याख्यानांमधून रवींद्रनाथांचे एक तत्त्वज्ञ म्हणून विलोभनीय रूप जगासमोर आले. या व्याख्यानांमध्ये त्यांनी उदात्त अशा मानवता धर्माचा उद्घोष केला. त्यांनी जे सांगितले ते साररूपात असे सांगता येईल. ते म्हणाले की जगातील विविध धर्म हे परस्पर विरोधी नाहीत तर ते एक सार्वभौम, शाश्वत सत्य विविध प्रकारे सांगण्याचा प्रयत्न करतात. असे शाश्वत सत्य की जे मानवी मर्यादांच्या पलीकडे आहे. यालाच आपण व्यापक अर्थाने मानवता धर्म असे म्हणू शकतो. हा मानवता धर्म आपल्याला एकता, स्वातंत्र्य आणि प्रेम यांच्या मार्गावर अग्रेसर करतो. आपल्यामध्ये मानव म्हणून विविध प्रकारचे भेद असले तरी आपण एका मोठ्या मानव समाजाचा आणि मानवता धर्माचा भाग आहोत. म्हणून आपल्या मतभेद आणि मर्यादांच्या पलीकडे जाऊन आपण जी शाश्वत आणि सर्वकालीन मूल्य आहेत त्याकडे लक्ष केंद्रित केले पाहिजे.

हिबर्ट व्याख्यानमाला संपल्यानंतर रवींद्रनाथ तेथून पुढे पॅरिस आणि बर्लिनला गेले. तेथे त्यांच्या चित्रांची प्रदर्शने भरली. बर्लिन येथे त्यांची एक मैत्रीण डॉ. सेलिंग हिने तेथील त्यांच्या चित्र प्रदर्शनाची जबाबदारी घेतली. आपल्याला कधीही आणि कोणत्याही परिस्थितीत उपयोगी पडू शकतील अशा प्रकारचे मित्रत्वाचे संबंध रवींद्रनाथ यांचे सर्वांशी होते. परदेशातील व्यक्तीही त्याला अपवाद नव्हत्या. बर्लिनमध्ये रवींद्रनाथांनी विद्यार्थ्यांना संबोधित करून त्यांच्याशी संवाद साधला. तेथून पुढे ते जिनिव्हाला गेले. तेथील वास्तव्यातच त्यांना सोविएट रशियात येण्याबद्दलचे निमंत्रण मिळाले. यापूर्वी त्यांचे रशियात जाणे झाले नव्हते. त्यामुळे रशियातील सामाजिक परिस्थिती, परंपरा इ. गोष्टी जाणून घेण्याची त्यांना उत्सुकता होती. त्यांच्या या रशियाच्या भेटीत त्यांना तेथील ज्या- ज्या गोष्टी चांगल्या आढळल्या, त्यांची त्यांनी मुक्तकंठाने स्तुती केली. नंतरच्या काळात भारत आणि रशिया या दोन देशांच्या दरम्यान संबंध दृढ होण्यास त्याची मोलाची मदत झाली. भारत रशिया दरम्यान मैत्रीचा पाया जणू त्यामुळे घातला गेला. रशियात त्यावेळी कम्युनिझमची नुकतीच सुरुवात झाली होती. ही नवीन प्रणाली असल्याने तेथील सर्वसामान्य जनता त्याच्या विरोधात होती. या काळात रशियातील दोन वैशिष्ट्ये त्यांच्या नजरेत भरली. पहिली गोष्ट म्हणजे तेथील मोठ्या प्रमाणावर सामूहिक शिक्षण देण्याची व्यवस्था आणि दुसरी गोष्ट म्हणजे तेथील अशिक्षित, दरिद्री समाजाने मोठ्या कष्टाने स्वतः मधील आत्मविश्वास जागृत करून स्वतःची प्रगती साधण्यात मिळवलेले यश. या दोन चांगल्या गोष्टी त्यांच्या लक्षात आल्या तरी त्यातील उणीव सुद्धा त्यांच्या लक्षात आली. या सुधारणा एकांगी आहेत असे त्यांना वाटले कारण समाजात व्यक्ती आणि समष्टी असे दोन घटक असतात. या दोन्ही घटकांच्या परस्पर हिताचे समन्वयन घडवून आणणे महत्त्वाचे असते तरच व्यक्ती आणि समष्टी दोघांचेही कल्याण होऊ शकते असे त्यांचे मत होते. रशियातील आपल्या वास्तव्यामधील अनुभव त्यांनी 'रशियार चिठ्ठी' या पुस्तकात लिहून ठेवले आहेत.

तेथील शिक्षणाबद्दल त्यांना असे वाटले की ही सामूहिक शिक्षण पद्धती सदोष आहे. त्यांनी शिक्षणाचा जणू एक साच्याच तयार केला आहे. परंतु साच्यातून स्वतंत्र व्यक्तिमत्व तयार होत नाही. जर शैक्षणिक तत्वे जिवंत मनाला सामावून घेणारी नसली तर त्यातून मने दुभंगली जातात, व्यक्तिमत्व विकास होत नाही. रशियाने जी नवीन आर्थिक प्रणाली स्वीकारली होती. त्यामुळे वैयक्तिक स्वातंत्र्य आणि हक्कांवरही गदा आली होती. या नवीन व्यवस्थेतील दोषही रवींद्रनाथांच्या लक्षात आले. त्याबद्दल आपले मत व्यक्त करताना ते म्हणतात, संपत्तीचे वैयक्तिक हक्क ज्याच्या त्याच्याकडेच राहू देऊन एका मर्यादेपर्यंत ते उपभोगण्याचा अधिकार देण्यात यावा. मर्यादांपलीकडचा अतिरिक्त भाग मात्र समाजाच्या वापरासाठी दिला गेला पाहिजे. त्यामुळे अती द्वेष, मत्सराच्या भावनेतून आलेल्या फसवेगिरी पासून या सांपत्तिक हक्काचा बचाव करता येईल. व्यक्तिशः लोकांच्या आवश्यक गरजा भागल्या पाहिजेत. परंतु त्याच वेळेला प्रत्येक बाब अशी मर्यादित हवी की ती समाजाच्या फायद्याची ठरावी. कोणताही उपाय हा नेहमी समाज आणि व्यक्ती या दोघांनाही मानवणारा असावा.

रवींद्रनाथ आता सत्तरीचे झाले होते. सततच्या प्रवासाने त्यांची शक्ती पण क्षीण झाली होती. पण तरी देखील परदेशातून आलेली आमंत्रणे ते नाकारत नव्हते कारण त्यानिमित्ताने बाहेरील जगाशी सांस्कृतिक नाते निर्माण करता आले तर ते त्यांना हवेच होते. ती त्यांची आवड होती. त्यानंतर पर्शिया आणि इराणच्या आमंत्रणावरून ते त्या देशांमध्ये गेले तेथे त्यांचे मोठ्या प्रेमाने आणि आपुलकीने स्वागत झाले.

रवींद्रनाथ जागतिक कीर्तीचे महान कवी आणि साहित्यिक तर होतेच परंतु विशेष म्हणजे ते आशिया खंडातील असल्यामुळे या आशियाई देशांना रवींद्रनाथांचा विशेष अभिमान होता. ते त्यांच्याकडे 'इंडो आर्यन' या नजरेने पाहत होते. आपला मूळ पुरुष एकच असून रवींद्रनाथांचा आणि आपला रक्ताचा संबंध आहे असे त्यामुळे ते मानत होते. त्यामुळे एक आशियाई व्यक्ती म्हणून रवींद्रनाथांचा प्रचंड अभिमान त्यांना होता. यानंतर इराकला भेट देऊन ते १९३२ मध्ये भारतात परतले. त्यानंतर त्यांनी एकदाच परदेश प्रवास केला. ते १९३४ मध्ये समुद्रमार्गे श्रीलंकेला गेले. तेथे त्यांनी व्याख्याने दिली आणि आपल्या चित्रांचे प्रदर्शनही भरवले. तेथील लोकांनी सुद्धा त्यांचे विशेष आदराने आणि आपुलकीने स्वागत केले. आता त्यांचे वय ७३ वर्षांचे झाले होते. परदेशात भारतीय संस्कृतीचे प्रतिनिधी म्हणून कार्य करण्यात त्यांनी कोणतीही कसूर बाकी ठेवली नव्हती. (क्रमशः)

# ग्रहसंकेत

**(रविवार, २० एप्रिल ते शनिवार, २६ एप्रिल २०२५)**

**नारायण जगन्नाथ कारंजकर, ज्योतिष भास्कर**
ज्येष्ठ पत्रकार, फिल्टर पंपाजवळ, माढा रोड, मु.पो.कुर्डूवाडी, जि.सोलापूर (भ्र. ९४२३७५८४०१)

✻ **रविवार, २० -एप्रिल-** भानुसप्तमी, ईस्टर संडे, श्री भैरवनाथ यात्रा चोपडी, येलूर (ता. पाटण), मलाई वडजाई यात्रा चिंचोली, ज्योतिर्लिंग यात्रा अंजली खुर्द (शिराळा) ✻ **सोमवार, २१ एप्रिल-** कालाष्टमी, भारतीय वैशाख मासारंभ, सिध्दनाथ यात्रा तुरूची (तासगाव), नाथभैरव सिध्दष्टमी उत्सव फुलचिंचोली, दुर्गामाता उत्सव, श्री पद्मावती देवी यात्रा उर्से मावळ, यमाई यात्रा मार्डी व म्हाळुंग, अन्नपूर्णादेवी यात्रा मानेगाव (ता. माढा) ✻ **मंगळवार, २२ एप्रिल-** जागतिक वसुंधरा दिन, खंडोबा यात्रा भोकळे, वाडसिध्दनाथ रथोत्सव- बगाड बनवडी (कोरेगाव), भैरवनाथ यात्रा खडकी, श्री सिध्देश्वर यात्रा खांगवड ✻ **बुधवार, २३ एप्रिल-** कालभैरव यात्रा गुंजवडी, चौंडेश्वरीदेवी यात्रा पिंपळेश्वर, वाकडेश्वर यात्रा कुडाळ, जागतीक पुस्तक दिन, नाथ यात्रा विटे (जि. सांगली) ✻ **गुरुवार, २४ एप्रिल-** वरुथिनी एकादशी, श्री वल्लभाचार्य जयंती, कालभैरवनाथ यात्रा सोनारी (ता. परांडा), चंद्रसेन महाराज यात्रा तळबीड (ता.कराड), गोरक्षनाथ यात्रा बत्तीस शिराळा, भैरवनाथ यात्रा गोपूळ (खटाव) ✻ **शुक्रवार, २५ एप्रिल-** प्रदोष, मुक्ताई यात्रा नारायणगाव, ज्योतिर्लिंग यात्रा खोडशी (ता. कराड) व सासने, स्वामी शिवानंद जयंती पांगरे, सिध्दनाथ यात्रा खरसुंडी (ता. आटपाडी) ✻ **शनिवार, २६ एप्रिल-** शिवरात्री, श्री स्वामी समर्थ पुण्यतिथी, संत गोरोबाकाका कुंभार पुण्यतिथी, श्री भैरवनाथ यात्रा उंब्रज, वेणीराम महाराज पुण्यतिथी मिरज, मृत्यूंजय जयंती धारवाड

**मुहूर्तः-** ✻ **साखरपुडा-** २० एप्रिल (१२ नंतर), २१, २२ एप्रिल ✻ **बारसे-** २० एप्रिल (१२ नंतर) ✻ **जावळ-** २४ एप्रिल ✻ **गृहप्रवेश-** २० एप्रिल (१२ नंतर), २१ एप्रिल

### मेष :- लाभदायक निर्णय ठरतील

दुसर्याचं चांगल झालेलं पाहून आनंद होत असेल तर आपण समाधानी आयुष्य जगत आहोत. पंचमेश रवि आपल्या राशीत तिसर्या स्थानी आहे. त्यामुळे आपले धाडसी निर्णय खरोखरचं लाभदायक ठरणार आहेत. नोकरी, व्यवसायात मनासारख्या घटना घडतील. फार धावपळ करू नका. आर्थिक स्थितीत सुधारणा होत जाईल. महत्त्वाच्या संधी विचाराने स्वीकाराव्यात. शुभ ता. २१, २२

### वृषभः- दगदग करु नका

वाईट काळ आला तर पैशाचा उपयोग करावा. पण, पैसा दिसतो म्हणून वाईट मार्गावर चालू नये. लाभस्थानी पंचगृही झालेली आहे. राशीही व्ययात आहे. त्यामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. अपेक्षीत घटना घडतील. फार दगदग करू नये. वितंडवादाचे प्रसंग टाळावेत. संततीच्या हितसंबंधाकडे अधिक लक्ष द्यावे. विचाराने रहावे. शुभ ता. २१, २४

### मिथुनः- स्थावर प्रश्न वाढवू नका

मिठासारखा मित्र मिळाला तर ह्यायात जपून ठेवावा. त्याला किड लागत नाही की चवही बिघडत नाही. लाभस्थानी रवि असल्याने महत्त्वाची कामे करून घ्यावीत. खर्च वाढले तरी प्राप्तीचे प्रमाणही समाधानकारक राहील. कार्यक्षेत्रात जागरूक रहावे. स्थावर प्रश्न वाढवू नका. धार्मिक, सामाजिक कार्यात पुढाकार घ्याल. समस्यांतून मार्ग निघत जाईल. शुभ ता. २२, २४

### कर्कः- प्रकृतीस जपावे

दुःखाचा चटका बसलेल्यांना दुःख काय असंत हे त्याला जगण्यानं शिकवलेलं असतं. आपल्या जलतत्वाच्या राशीत तेज तत्वाचा मंगळ असल्याने मुख्यतः प्रकृतीची काळजी घ्यावी. सरकारी कामासाठी पाठपुरावा करावा लागेल. आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने रहावे. दगदग वाढवू नका. शुभ ता. २१, २४

### सिंहः- फार चिंता करु नका

स्वार्थासाठी इतरांच्या भावनांचा खेळ करायचा नसतो. अष्टमात पंचग्रही, बारावा मंगळ त्यामुळे आर्थिक बाबतीत विशेष जागरूक रहावे. कार्यक्षेत्रात समाधानकारक घटना घडतील. रेंगाळलेली कामे मार्गी लागतील. नवे विचार विचारपूर्वक अंमलात आणावेत. फार चिंता करू नये. गुंतवणूक विचाराने करावी. प्रकृतीच्या तक्रारींची वेळीच दखल घ्यावी. विलंबाने सौख्याच्या घटना घडतील. शुभ ता. २१, २४

### कन्याः- स्वास्थ टिकवावे

श्रीमंती पुन्हा मिळवता येते. पण निसटलेली माणसे पुन्हा जशीच्या तशी मिळविता येत नाहीत, राशी समोरच पंचग्रही आहे. त्यामुळे शारीरिक, मानसिक स्वास्थ टिकवावे. कृषि, वैद्यकिय क्षेत्रात अनुकूलता वाढेल. घाईने कोणतेही निर्णय घेऊ नये. नवं विचार विचारपूर्वक स्वीकारावेत. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित कामे विलंबाने होतील. दगदग टाळावी. शुभ ता. २१, २४

### तुलाः- आत्मविश्वासाने रहावे

ज्यांच्याकडे भावना समजून घेणारं मन असेल असाच मित्र अथवा जोडीदार निवडावा. धनेश, सप्तमेश मंगळ, दशमात आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात उत्साहवर्धक घटना घडतील. वातविकारापासून जपून असावे. आर्थिक व्यवहार विचारपूर्वक करावेत. वैद्यकिय, संरक्षण क्षेत्रात अनुकूलता राहिल. आत्मविश्वासाने रहावे. प्रगती होत जाईल. अपेक्षित घटना घडतील. शुभ ता. २१, २४

### वृश्चिकः- प्रगतीच्या घटना

मनात नेहमी जिंकण्याची आस असावी. नशीब बदलो वा न बदलो पण वेळ नक्कीच बदलते. कर्मेश रवि षष्ठात आहे. त्यामुळे कार्यक्षेत्रात प्रगतीच्या घटना घडतील. योजलेली कामे मनासारखी होतील. अडचणींवर मात कराल. कौटुंबिक जीवनात सौख्याच्या घटना घडतील. फार चिंता करू नका. अपेक्षीत संधी लाभतील. चिकाटीने रहावे. सुसंधी लाभतील. शुभ ता. २४

### धनुः- अस्वास्थ वाढवू नये

माणूस वाईट परिस्थितीमुळे कमीपण, टोचून बोलण्यानेच जास्त खचत असतो. सुखस्थानी पंचग्रही आहे. त्यामुळे किरकोळ कारणांमुळे अस्वास्थ वाढवू नये. शिक्षण, अनुभवातून प्रगती साधता येईल. पोटाच्या तक्रारींची दखल घ्यावी. स्थावर, वाहन सौख्य लाभेल. अडचणीतून मार्ग निघत जाईल. अपेक्षित कामे होतील. विचाराने रहावे. दगदग टाळावी. शुभ ता. २२, २४

### मकरः- सामंजस्याने रहावे

कधी कधी मनाला दगडासारखे बनवावे लागते. कितीही आघात झाले तर तोडणारा थकतो, मात्र दगड नाही. अष्टमेश रवि, चतुर्थात आहे. सध्या कामासाठी जास्त दगदग होऊ शकते. कौटुंबिक जीवनात सामंजस्याने राहावे. वादाचे प्रसंग टाळावेत. प्रतिकुलतेवर मात करू शकाल. नव्या संधी लाभतील. अनुकूलता वाढत जाईल. शुभ ता. २१, २४

### कुंभः- उत्साहवर्धक घटना

प्रेम टिकवायचं असेल तर प्रेम करावं लागत. अहंकार न ठेवता. माफ कराव लागतं न मागताही. आर्थिक कामे विलंबाने होणार असली तरी चिंता करू नका. स्पर्धांमध्ये यश मिळेल. आर्थिक बाबतीत जागरूक रहावे. अनावश्यक खर्च टाळावा. उत्साहवर्धक घटना घडतील. नव्या विचारांना चालना मिळेल. प्रतिकूलतेवर मात कराल. शुभ ता. २१

### मीनः- चांगल्या घटना

एखाद्याला आपली किंमत कळाली नाही म्हणून नाराज नाही व्हायचं. कारण भंगार व्यापार्याला हिर्याची पारख नसते. राशीत पंचग्रही आली आहे. एखादी चिंता मनात असली तरी आपल्या दैनंदिन कार्यात व्यत्यय येऊ देवू नका. विलंबाने पण चांगल्या घटना घडतील. प्रकृतीच्या तक्रारींची दखल घ्यावी. सरकारी कामे होतील. सर्व मनासारखे घडत जाईल. शुभ ता. २१

!! शुभ भवतु !!

पान ३ वरून

## भारतातील शहरी नक्षलवादाबद्दल...

ते अटक केलेल्या नक्षलवाद्यांसाठी कायदेशीर मदत पुरवत आहे. याव्यतिरिक्त, मानवी हक्कांच्या नावाखाली व्यवस्थेला झुकण्यासाठी भाग पाडले जात आहे. खोट्या कथा पसरवून लष्करी किंवा बौद्धिकदृष्ट्या नक्षलवादी संघर्षाला पाठिंबा देणाऱ्या नवीन सदस्यांना आकर्षित करणे. ट्रेड युनियन आणि शैक्षणिक संस्थांचे सदस्य नक्षलवादी चळवळीत सामील होण्यासाठी सहजपणे प्रवृत्त होत असल्याने, या संघटनांमध्ये व्यक्तींना पेरून हे साध्य केले जाते. व्यवस्थेला कमकुवत करण्याचा त्यांचा आणखी एक मार्ग म्हणजे राजकीय, कायदेशीर आणि नोकरशाही क्षेत्रात त्यांच्या व्यक्तींना अधिकारपदावर बसवणे. सर्वात धोकादायक म्हणजे नक्षलवादी खोट्या कथेला समर्थन देण्यासाठी आणि पुढे नेण्यासाठी पत्रकार म्हणून स्वतःला उभे करणे. शिवाय, ते राष्ट्रवादी, दहशतवादविरोधी आणि नक्षलविरोधी शक्तींना चुकीचे ठरवतात.

मार्क्स, लेनिन, स्टॅलिन, माओ आणि चीनच्या विचारसरणीचे समर्थन करणारे हे मोठ्या प्रमाणात पाश्चात्य-शिक्षित ढोंगी लोक भारताच्या सार्वभौमत्वाला आणि राष्ट्रीयत्वाला सतत कमकुवत करण्याचे काम करत आहेत जेणेकरून १४० कोटी लोक विविधतेने नटलेले आणि जवळजवळ ४० कोटी गैर-हिंदू असलेले राष्ट्र सतत संघर्षमय राहून, संतुलन गमावून एका अशांत समाजात विखुरले जाईल. म्हणूनच, ते आपल्या देशाच्या आरोग्याला गंभीर हानी होण्यासाठी दिवसरात्र कार्यरत आहेत. हे शहरी नक्षलवादी विविध ध्येये साध्य करत आहेत, ज्यात प्रदेश, भाषा, जाती आणि धर्मानुसार लोकांना विभाजित करणे तसेच हिंदू आणि इतर धार्मिक गटांना विरोध करणे यांचा समावेश आहे. महाराष्ट्र पोलिसांचे माजी महासंचालक (विशेष ऑपरेशन्स) जयंत उमराणीकर यांच्या मते, शहरी नक्षलवादी चळवळ ही पारंपारिक नक्षलवाद्यांपेक्षा जास्त धोकादायक आहे. ही मनं घरी बसून, सोफ्यावर, कॉफी पिऊन तरुण मनांना सरकारी यंत्रणेविरुद्ध युद्ध करण्यास प्रवृत्त करतात आणि हे अधिक हानिकारक आहे. मार्क्सवादी, शहरी नक्षलवादी आणि परदेशी लॉबीच्या निषेधांमुळे स्टरलाईट कॉपर कारखाना कायमचा बंद करण्यात आला. त्यांचे मुख्य ध्येय भारताची समृद्धी अस्थिर करणे होते. निदर्शने खूप सुनियोजित आणि चांगल्या प्रकारे निधी उपलब्ध असल्याने सरकारला झुकून उद्योग बंद करावा लागला. शहरी आणि हिंसक नक्षलवादामुळे देशाला जीडीपी आणि आर्थिक विकासाच्या बाबतीत मोठे नुकसान होत आहे, ज्याचा रोजगार आणि व्यावसायिक संधींवर नकारात्मक परिणाम होतो.

**निष्कर्ष**

आपल्या संपूर्ण समाजाला खासकरून तरुणांना आपल्या आत आणि आजूबाजूला असलेल्या देशविरोधी वृत्तीबद्दल जागरूक होण्याची ही योग्य वेळ आहे. हे एक मंद विष आहे जे समाजाला कमकुवत करते आणि राष्ट्राला अस्थिर करते. हे सामाजिक-आर्थिक आणि सांस्कृतिक विकासाला अडथळा आणते, ज्यामुळे देश या निकषांवर सर्वात वाईट कामगिरी करणारा देश बनतो. मानवतेच्या या शत्रूंचा सामना करण्यासाठी आपण अधिक जागरूक आणि जागृत होऊया.

# शिवपूर्वकालीन इतिहास

**दुर्ग जिज्ञासा**

**प्राची पालकर**



इतिहासाच्या प्रकाशात मार्गक्रमण करणारे राष्ट्र चिरंतन वैभवशाली असते. भारताचा इतिहास तर एक धगधगती मशाल आहे, जिच्या उजेडात चालताना मार्ग आपोआप प्रशस्त होत जातो. इतिहासाचे अध्ययन करताना योग्य संदर्भ अत्यंत आवश्यक असतात; सोबतच सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून चिंतन करणेही गरजेचे असते. आपल्या पूर्वजांच्या पराक्रमाने पावन झालेल्या भारतभूमीचा इतिहास अत्यंत प्रेरणादायी आहे. मात्र, तो सत्याच्या आधाराने समजून घेणे आवश्यक आहे. भारताच्या इतिहासात पूर्वीपासूनच किल्ल्यांचे महत्त्व होते.

गडकिल्ले या विषयाबद्दल माहिती घेताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या आधीच्या ऐतिहासिक घडामोडींचे स्मरण करणे आवश्यक आहे. भारताच्या सुजलाम् सुफलाम् भूमीवर पूर्वीपासूनच परकीयांनी अनेक आक्रमणे केली. त्यामुळे येथे सतत सत्ता परिवर्तन होत गेले. महाराष्ट्र, छत्रपती शिवाजी महाराज, गडकिल्ले, सागरी सुरक्षा हे विषय समजून घ्यायचे असल्यास प्रथम भारतावर झालेली परकीय आक्रमणे थोडक्यात समजून घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्रातील सगळेच किल्ले शिवकालीन नाही तर त्या आधीपासून भारतात किल्ल्यांचे अस्तित्व होते. येथे प्रत्येक सत्ता गडकिल्ल्यांचे महत्त्व ओळखून राज्य करीत होती. सुरक्षिततेच्या दृष्टीने डोंगरी, भुईकोट किल्ल्यात वास्तव्य तसेच नगरांना परकोट बांधणे आवश्यक समजले जात असे. भारतीय इतिहासाचा आरंभकाळ म्हणजे समाजातील स्थलांतरे व हिंदुकुश पर्वतरांगा ओलांडून वायव्य दिशेकडून झालेली आक्रमणे होय. बाहेरून आलेले हल्लेखोर त्यांच्या आक्रमक प्रवृत्तीमुळे व क्रूरतेमुळे विजयी होत गेले. आपल्या पुण्यभूमीवर सर्वात पहिले आक्रमण सिकंदरने केले. त्यावेळी राजे चंद्रगुप्त व आचार्य चाणक्य यांनी मिळून ग्रीक आक्रमणाला सर्वशक्तिनिशी विरोध केला. त्यांनी संपूर्ण उत्तर भारत व्यापणाऱ्या मौर्य साम्राज्याची स्थापना केली.

भारताचे राष्ट्रीय प्रतीक म्हणून मान भूषविणारे सिंहमुद्रांकित चक्रस्तंभ यांचा जनक राजा अशोक यांच्यामुळे मौर्य राजघराणे अजरामर झाले. मात्र सम्राट अशोकाच्या मृत्यूनंतर साधारण ५० वर्षांनी मौर्य साम्राज्याची वाताहत झाली आणि दख्खन पठारी प्रदेशात प्रथमच सातवाहन राजवट अस्तित्वात आली. सातवाहन घराणे वैदिक धर्माचे उपासक होते. 'गाथासप्तशती' हा तत्कालीन समाजरचनेचे यथार्थ दर्शन घडविणारा ग्रंथ ही सातवाहन काळातील धरोहर आहे. सातवाहन राजा गौतमीपुत्र सातकर्णी 'त्रिसमुद्रतोयपतिवाहन' अशी उपाधी लावून घेत असे. सातकर्णीच्या नाण्यावर शिडाचे जहाज होते. याचा अर्थ सातवाहन राज्य सागरापर्यंत पसरलेले होते. पुढे रोमन साम्राज्याचा विस्तार झपाट्याने झाला आणि युरोप खंड सागरी मार्गाने भारताशी जोडला गेला. कोकणच्या किनारपट्टीवर विदेशी जहाजे येऊ लागली. दख्खन प्रदेशात शीघ्रगतीने नागरीकरण झाले. साहजिकच कोकण आणि घाटमाथा यांना जोडणारे नाणेघाट, माळशेज घाट आणि इतर घाटमार्गावर लक्ष ठेवण्यासाठी सह्याद्रीत गडकोट घडविल्या गेले. दुसऱ्या शतकाच्या आरंभी शक भारतात आले आणि हूण, कुशान यांच्याप्रमाणे भारतात स्थायिक झाले. पश्चिम किनाऱ्यावरील बंदरावर ताबा ठेवण्यासाठी शकांची सातवाहनांशी सतत युद्धे झाली. या काळात उत्तर भारतात आधी कुशाण आणि नंतर गुप्त घराण्याच्या राजवटी होत्या. गुप्त घराण्यातील विक्रमादित्य यांची कारकीर्द आपल्या सर्वांना ज्ञात आहे. सातवाहन काळानंतर नाशिक, खानदेश प्रदेशावर अभीर व अहीर या गवळी घराण्यांची सुमारे दीडशे वर्षे सत्ता होती. नाशिकजवळ पांडवलेण्यात एका शिलालेखात वीरसेन अभीर राजाचा उल्लेख आहे. त्र्यंबकेश्वरजवळील अंजनेरीस त्यांची राजधानी होती. नावापुढे अहीर लावणे, अहिराणी भाषा यावरून आपल्याला या घराण्याचा प्रभाव दिसतो. याच काळात महाराष्ट्राचा इतर भाग त्रेकुटक, वाकाटक, आणि अश्मक यांच्या अधिपत्याखाली होता. वाकाटक कुळातील विद्वान राजा प्रवरसेन याने प्राकृत भाषेत 'सेतुबंध' हे महाकाव्य रचले आहे. यानंतरची सुमारे सहा शतके दख्खन प्रदेश प्रामुख्याने चालुक्य आणि राष्ट्रकूट यांच्या राजवटीत आढळतो.

राजा हर्षवर्धन शिलादित्याने अनेकदा दक्षिणेवर हल्ला करण्याचा प्रयत्न केला, परंतु चालुक्य राजा दुसरा पुलुकेशी याने त्याला विंध्य पर्वत व नर्मदा नदी ओलांडू दिली नाही. चालुक्य राजा कुंतालेश्वर भूलोकमल्ल सोमेश्वर हा विद्या, कला, शिल्पशास्त्र आदींचा चाहता होता. त्यांनी नीतिशास्त्रविषयक 'मानसोल्लास-अभिलाषितार्थ चिंतामणी' नावाच्या ग्रंथात किल्ल्यांची त्यांचे परिसर वैशिष्ट्य अभ्यासून नऊ प्रकारात वर्गवारी केली आहे. या ग्रंथात किल्ल्यांच्या बांधकामासाठी वापरायच्या साहित्याचा तपशीलदेखील दिला आहे. बौद्ध, जैन गुंफाची बांधणी चालुक्य काळात मोठ्या प्रमाणात झाली. नळदुर्ग, उदगीर हे किल्ले चालुक्य काळात बांधले आहे. पुढे चालुक्य राजा कीर्तिवर्मा याचा पाडाव करून दंतीदुर्ग याने राष्ट्रकूट राजवटीची स्थापना केली. राष्ट्रकुटांची पहिली राजधानी सातमाळा पर्वतरांगेतील मार्कंड्या किल्ल्यावर होती. राष्ट्रकूट काळातील १९ राजांनी राज्य केले. उत्तरेस नर्मदा ते दक्षिणेस कावेरी नद्यांच्या मधील संपूर्ण परिसर त्यांच्या अधिपत्याखाली होता. कैलास लेणे, शिवमंदिर, राजा कृष्णराज यांच्या प्रेरणेने खोदल्या गेले. देवगिरीसारखा बलाढ्य किल्ला राष्ट्रकूट राजा कृष्णराज यांनीच घडविला. या काळात मंदिर शिल्पशैलीचा जो बहर आला, त्याचा परिणाम दख्खन प्रदेशातील मंदिर बांधणीवरही झाला. याचे श्रेय राष्ट्रकूट आणि चालुक्यांना जाते. यावरून लक्षात येते की, भारत हे पूर्वीपासून सर्व दृष्टीने परिपूर्ण असे राष्ट्र आहे.

मध्ययुगावर प्रभाव पाडणाऱ्या दोन घटना या दरम्यान घडल्या. आद्य शंकराचार्यांनी हिंदू धर्मविषयक श्रद्धांना उजाळा दिला व बौद्ध धर्माचा प्रभाव बऱ्याच प्रमाणात लोप पावला. दुसरी घटना म्हणजे अरबस्थान मक्केत जन्मलेल्या महम्मद पैगंबराच्या उपदेशाचा प्रसार करण्याची जबाबदारी महम्मद गझनी, घोरी यांच्यासारख्या दुष्ट तुर्कांनी स्वीकारली. इस्लाम धर्म प्रसाराच्या मुखवट्याखाली महम्मद गझनीने भारतावर १८ स्वाऱ्या केल्या. प्रत्यक्षात घरे, मंदिरे, मठ भ्रष्ट करून, नष्ट करून मोठी लूट परदेशात नेली. चालुक्य, राष्ट्रकूट घराण्यांचा प्रभाव ओसरला. आता यादव व शिलाहार घराण्यातील सुभेदार सत्ता प्राप्त करण्याचा प्रयत्न करू लागले. शिलाहार स्वतःला सामंत म्हणून घेत. त्यांनी पन्हाळा, कोल्हापूरवरून दख्खन भागावर व ठाणे, घारपुरीवरून उत्तर कोकणावर राज्य केले. मुंबईतील वाळुकेश्वर मंदिर, अंबरनाथचे शिव मंदिर यांच्या बांधणीचे श्रेय शिलाहारांकडे जाते. सातारा येथे एक ताम्रलेख सापडला. त्यानुसार शिलाहार राजा दुसरा भोज याने चंदन, वंदन, नांदगिरी-कल्याणगड, पन्हाळा, केळंज, पांडवगड, पावनगड, बावडा-गगनगड, भुदरगड, वसंतगड, रांगणा, खेळणा- विशाळगड, सातारा- अजिंक्यतारा, सामानगड, विराटगड अशा १५ किल्ल्यांची निर्मिती केली. शिवाय कोकणात जयगड, विजयदुर्ग, अशेरी या किल्ल्यांची निर्मितीदेखील शिलाहार काळात झाली, असे पुरावे आढळतात.

देवगिरीवर यादवांनी राजधानी केली. यादवांच्या नेतृत्वात मराठी संस्कृतीची ध्वजा डौलाने फडकू लागली. मराठी भाषेस राजदरबारी प्रतिष्ठा प्राप्त झाली. याच काळात संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी रचली, चक्रधरस्वामींनी महानुभाव पंथाची स्थापना केली. शिखर शिंगणापूरचे महादेव मंदिर यादवांनी बांधले. महाबळेश्वर मंदिराचे ते आश्रयदाते झाले. राजे रामदेवराय यादव यांचा अष्टपैलू मंत्री हेमाद्री याने शेतीला उत्तेजन दिले.

त्याकाळी पत्रव्यवहारासाठी वापरण्यात येणारी मोडी लिपीचा त्याने प्रसार केला. अनेक ग्रंथ रचले. हेमाडपंथी ही वास्तू बांधणीची शैली विकसित केली. चुन्यासारख्या लिंपणाचा वापर न करता हेमाडपंथी शैलीतील अप्रतिम सौंदर्याने नटलेली मंदिरे आजही संपूर्ण भारतात व महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात आढळतात. उत्तर भारतात जम बसवलेल्या मुस्लिम राजवटी आता दक्षिणेकडे आल्या. आक्रमणे सुरू झाली. अल्लाउद्दीन खिलजीने अफगाण सेनेसह देवगिरीवर हल्ला केला. यादव राजे रामदेवराय यांची संरक्षणसिद्धता पुरेशी नसल्याने यादवांचा पराभव झाला. देवगिरीत भली मोठी लूट झाली. खिलजी सतत आक्रमण करीत राहिला. राजा शंकरदेव यादव, हरपालदेव यांची हत्या झाली. मराठा साम्राज्य नेस्तनाबूत झाले व परकीय सत्तेच्या ग्रहणाने प्रदीर्घ काळ ग्रासले. खिलजीनंतर मुहम्मद तुघलक दिल्लीचा बादशाह झाला. त्याने आपली राजधानी दिल्लीहून देवगिरीवर हलविली. हा क्रूरकर्मा सैन्यासह दक्षिणेत स्थलांतरित झाला आणि देवगिरीचा दौलताबाद झाला.

पान ४ वरून

## गुलमोहर होता आले तर पाहावे...

तर झाडावर पिकणाऱ्या त्या कैरीला आम्ही पाड म्हणत असू. पाडाला पिकला आंबा या गाण्याच्या तीन शब्दात नैसर्गिक रीतीने परिपूर्ण वाढ होऊन पिकलेल्या गोष्टीचे महत्त्व गीतकाराने आपसुकच सांगितले आहे. मात्र गाण्याचा ठेका, कमरेला लचका देत पेश होणारे नृत्य यामुळे आपण त्या शब्दांकडे कधी बारकाईने पाहिललेच नसते. फार खोलवर विचार केला तर पाडाला पिकणारा आंबा, म्हणजे वयात येणारी ललना, तिची नैसर्गिक वाढ जोपर्यंत होत नाही तोवर तिच्या सहवासात गोडवा नाही अशा अर्थान बाल विवाहविरुद्ध संदेश देणारे ते गाणे आहे की काय? असे वाटू लागते. आंबा राखणीचे दिवस गाव खेड्यात फार महत्त्वाचे असतात. साधारण तिसऱ्या चौथ्या वर्गात असताना देऊळगाव कुंडपाळ या माझ्या मूळ गावी आजोबा सोबत आंबे राखणीचे काम मी जवळून पाहिले आहे. आंबा उतरण्याची लगबग, आंबा उतरल्यावर आंब्याचा होणारा ढिग, आंब्याची वाटणी, नंतर घरात गवत टाकून त्या गवताखाली आंबा पिकवण्याची पद्धत मला अजूनही आठवते.

आंबा जसा उन्हामध्ये गोडवा पेरत जातो तसा गुलमोहरही रणरणत्या उन्हात प्रसन्नता पेरत जातो. गुलमोहर अगर तुम्हारा नाम होता, मौसम मे गुल को हसाना भी हमारा काम होता अशा सुंदर ओळींनी सुरुवात असलेले गुलजार यांचे एक गाणे मी अनेकदा ऐकतो मात्र तेवढी एक ओळ सोडले तर डवरलेल्या गुलमोहराची सर गुलजारच्या त्या गाण्यालाही येत नाही,

वसंत फुलांचा आणि प्रेमाचा ऋतू त्यामुळे ओसाड माळरान असो की बगीच्या, तिकडे फुलांची रेलचेल मोठ्या प्रमाणात असते. मात्र ग्रीष्मामध्ये बहावा किंवा एखादे दुसरे विदेशी वाणाचे फुल सोडले तर गुलमोहराच्या बरोबरीने कोणाशी स्पर्धा करणारे कोणीही मैदानात नसते. नाही म्हणायला डोंगराळ झाडी मधून करवंदाची इवली इवली फुले गुलमोहराच्या बरोबरीने आपले अस्तित्व राखून असतात. मात्र, वैशाखाच्या आगमनासह फुलांचा साज उतरून करवंदाचे मणी अंगावर चढवण्याची त्यांना घाई असते. गुलमोहराचे तसे नसते वैशाखात फुललेला एखादा जिद्दी गुलमोहर अगदी पावसाच्या सरी अंगावर झेंलून आपल्या फुलांचा दाह कमी होईपर्यंत उभाच असतो. सातारा शहरात एक मे हा दिवस महाराष्ट्र दिनाबरोबरच गुलमोहर दिवस म्हणून सुद्धा साजरा केला जातो.सागर गायकवाड आणि पी. व्ही. तारू या दोघांनी सर्वात आधी ही कल्पना मांडली आणि १९९९ पासून सातारकरांनी गुलमोहर डे साजरा करायला सुरुवात केली. कोणत्याही कस्तुरीचा गंध उरामध्ये न बाळगता फक्त आपल्या रंगामुळे अनेक पक्षांना आणि कीटकांना आकर्षून घेत, तिथे सारी सृष्टी पाण्यासाठी व्याकुळ झालेली असते तिथे आपल्या फुलाच्या रसाने पक्षी आणि कीटकांना तृप्त करणारा गुलमोहर समजून घेता येणे जितकं सहज असत तितकंच गुलमोहर होणे सुद्धा सोपं असतं असं वाटतं म्हणूनच वाटते की, 'उन्हाच्या दाहकतेत अस्वस्थ झाल्यापेक्षा स्वतःच गुलमोहर होता आलं तर पाहावं!'

पान ४ वरून

## मतदान

मतदानाला जायचं तिच्या काही मनात येईना. तेवढ्यात बाहेरून हाक आली, मनोज उभा होता बाहेर. ''सुमनताई, अहो चार वाजलेत. मत दिलं नाही अजून? चला गाडी आणलीय तुमच्यासाठी.'' त्यानं सुमनला बळेबळेच बाहेर काढलं. तिच्या हातात पाचशेची नोंट कोंबत तो म्हणाला. ''तिसऱ्या नंबरचं आपलं. ते दाबायचं.'' मतदान केंद्रांवर येऊन मतदान कक्षात सुमन उभी राहिली तर काचेच्या खिडकीबाहेरून मनोज तीन बोटं नाचवीत होता. तिने खाली बघितलं. ईव्हीएम मशीनवर तिला 'तो' तरळताना दिसला. तिच्या डोळ्यासमोर त्या दिवशीचा प्रसंग उभा राहिला. करकरीत तिन्ही सांजा झाल्या होत्या देवासमोर दिवा लावला सुमनने. 'तो' उभा दिसला दारात. आत त्यानंही सुमन सोबत हात जोडले. नंतर सुमनला नमस्कार केला. ''काकू, मी आज तुमच्याकडे दान मागायला आलो आहे. मी मत विकत घेत नाहीत. माझी औकात पण नाही. एवढचं सांगतो. तुम्ही निवडून द्याल तर सचोटीने काम करेन. भ्रष्टाचार करणार नाही. पाय नेहमी जमिनीवरच असतील.'' तो पुन्हा सुमनच्या पायाशी वाकला. सुमनने त्याला आशीर्वाद दिला- 'विजयी भव' आणि त्याच्या हातावर साखर ठेवली. खडबडून जागी झाल्यासारखी सुमन त्याची निशाणी शोधू लागली. ती दिसताच तिनं बटण दाबलं आणि कक्षाबाहेर आली. आजूबाजूला होणाऱ्या कुठल्याच चौकशांना उत्तर न देता सुमन तडक घरी आली. आता तिचं मन शांत झालं होतं.

सकारात्मकतेचे तत्त्वज्ञान
डॉ. नितीन ह. देशपांडे
deshapandenh@gmail.com

# मानसशास्त्राचे संरक्षक कवच



सकारात्मकतेचे तत्वज्ञान २६४

आ संकटात असताना भेदरून जातो, गांगरून जातो आणि स्वतःला एकाकी समजतो. आसपास आधाराला एखादा चेहेरा शोधतो अन्यथा सत्वहीन होऊन जातो. मदत मिळाली तर ठीकच नाहीतर हताशा, शीण अशा भावनांनी घेरले जातो. अशावेळी एक चूक सार्वत्रिक होते- आपण स्वतःकडे आधारासाठी बघायचं विसरतो. स्वतःमधील अमर्याद शक्तीकडे डोळेझाक करतो आणि सगळ्या संभाव्य अडचणींचा बागुलबुवा करीत बसतो. आतमध्ये नजर टाकली तर जे शक्यतांचं गाठोडं न मागता आपल्याला पुरवलं गेलंय त्याचा शोध लागतो. यालाच आत्मशोध म्हणतात.

प्रत्येक परिस्थितीला, घटनेला तोंड देण्याचे अंतःसामर्थ्य घेऊनच आपण जन्मलेलो असतो. सगळ्या विरुद्ध प्रवाहांना आपल्यातील अध्याहृत शक्ती पुरून उरेल अशी निसर्गदत्त योजना असते. तिचा एकतर विसर पडलेला असतो किंवा आपण ती ऊर्जा चांचपूनच बघितली नसते. या लेखात सदर ओळखीचा प्राथमिक प्रपंच केलेला आहे. प्रतिकूलतेवर मात करता करता आपण कौशल्ये हस्तगत करतो, क्षमतांचे विकसन करतो आणि अंगी अशा कळा बाणवतो की त्यातून आपण केवळ दीर्घकालीन तग धरून राहत नाही तर उत्फुल्लपणे आयुष्याचा रस उपभोगतो.

पिएरर जेनेट हा फ्रेंच मानसशास्त्रज्ञ असं म्हणतो- प्रत्येक जीवन हा कलेचा एक तुकडा असतो, हाती उपलब्ध असलेल्या साधनांमधून तो तसा बनलेला असतो. वरील विधानाचा विचार करताना कायम डोळ्यांपुढे रंगीत आणि गुंतागुंतीचे असे एक कलाचित्र नजरेसमोर येते ज्यात सुखदुःखाचे धागे गुंफलेले असतात, विविध पर्याय हाताळून बघितलेले असतात आणि नक्षीकाम पूर्णत्वाला नेलेलं असतं. प्रतिकूलता अशीच असते- आपल्या बाल्यावस्थेत आपण आपल्या पालकांना संघर्ष करताना बघितलेलं असतं. त्यातून ते कसे कणखर बनत जातात आणि अवघड परिस्थितीवर मात करून ते कसे आपल्या गंतव्याला पोहोचलेले असतात, हे सारं आपल्या नजरेसमोर घडताना आपण बघितलेलं असतं.

आयुष्याला कला ही संज्ञा दिली तर त्या जीवनाच्या चित्रात रंग भरायला काय कर्तबगारी आवश्यक असते याचा विचार मनात आल्यावाचून राहत नाही. अडचणींवर मात करीत पुढे जाताना कोणते संरक्षक घटक महत्वाचे असतात आणि त्यांचा मानसिक निरामयतेमधील सहभाग तपासणे आनंदाचे आणि तितकेच आव्हानयुक्त असते.

**मानसशास्त्रातील संरक्षण व्यवस्था-**

सकारात्मक विकास आणि स्वतःच्या मतांना वेळप्रसंगी मुरड घालत भयप्रद प्रसंगांना आणि सांस्कृतिक घटनांना तोंड देणे म्हणजे मानसशास्त्राने पुरविलेले संरक्षण कवच ही व्याख्या आहे लोपेझ, पेड्रोट्टी आणि सँयडर यांचे २०१९ सालचे! हे पुढे जाऊन सिद्ध झालं नुकत्याच अनुभवलेल्या कोरोना या जागतिक संकटात.

प्रतिकूलता वाट्याला येणाऱ्या मंडळींसाठी गरीच, हॅम्बी आणि बायार्ड यांनी २०१५ साली एक प्रारूप सुचविले ज्यामध्ये काही अंगभूत गुणांच्या आधारे स्थितिस्थापकत्व आणि आरोग्य यांचा लाभ कसा होऊ शकतो याचे त्यांत वर्णन आहे. या प्रारूपात स्व-नियमन आणि समाजाचा आधार हे घटक प्रामुख्याने तीन गटात विभागलेले आहेत-

**१) स्व-नियमन**

उत्तेजना देणाऱ्या क्षणांपासून दूर जात, अनियंत्रित भावनांना लगाम घालत ठामपणे प्रतिकूलतेचा संयमी सामना करणे हेच आपल्या हाती असते आणि ते प्रयत्नपूर्वक शक्य असते.

**२) भक्कम नातेबंध**

कुटुंब, मित्रपरिवार आणि संपर्कक्षेत्रातील समाज सदस्य आपल्याला कोणत्याही वादळी प्रसंगातून सावरायला पुरेसे असतात. त्यांच्याकडे मदतीचा हात मागण्यात काही गैर नसते. अशा नात्यांची प्रयत्नपूर्वक मशागत करणे मात्र आपल्या हातात असते.

**३) आयुष्याचा अर्थ लावणे आणि समजणे**

आघात समजून घेण्यात आणि त्यांचे भयावह परिणाम समजावून सांगण्यात आपण कमी पडत असतो. आपण स्वतःशी तरी फुरसत काढून संवाद साधतो कां, घटितांचा अर्थ लावण्याचा प्रयत्न करतो कां हाच महत्वाचा प्रश्न असतो.

तेथे अडकलो की निचरा तर दूर, जवळपास असलेल्या उत्तरांकडेही आपली डोळेझाक होते. मानसिक आरोग्य साधायचे असेल तर धार्मिक तसेच अध्यात्मिक आधारही शोधायला हरकत नसते कारण त्यातूनच हिंसक घटना आणि अडचणींवर विजय मिळविण्याचे बळ मिळू शकते.

आपल्यात असलेल्या सर्व क्षमतांचे एकत्रीकरण केले तर आपले समस्यांना हाताळणी करण्याचे कौशल्य वाढू शकते आणि तितका ताणाचा भर उणावतो. स्वतःजवळ असलेल्या संसाधनांची बेरीज केली तर आपला हिंसेला दिला जाणारा प्रतिसाद अधिक अर्थपूर्ण होतो. हे संरक्षक कवच अनेक प्रकारे काम करीत असते. प्रतिकूलतेची धग कमी करणे, स्वास्थ्य आणि शांतता यांचा आधार देणे, आघातांचा प्रभाव कमी करणे असे संशोधन २०१५ साली झाले आहे.

९/११ चा हल्ला न्यूयॉर्क मधील रहिवाशांची सत्वपरीक्षा बघणारा होता. ते अनुभव दाहक होते आणि त्यातून बाहेर पडण्यास खूप वेळ गेला. आपल्याकडील २६/११ चे उदाहरण आपल्यातील सहनशक्तीला आव्हान देणारे होते. पण आपण त्यातून झळाळून बाहेर पडलो.

मार्टीन सेलिग्मनची आशावादाची विचारसरणी असे अधोरेखित करते की काही माणसांकडे जन्मजात देणगी असते नकारात्मक घटनांना तोंड देण्याची कारण आशावाद हे मानसशास्त्राने दिलेलं एक हत्यार आहे. हंबी आणि बायार्ड यांनी २०१७ साली एक प्रयोग केला- प्रतिकूलतेवर मात करू शकतात अशा तीन निकषांचा: वस्तुनिष्ठ कृतकृत्यता, आघातानंतरची वाढ मानसिक आरोग्याची लक्षणे!

त्यातून कोणती संरक्षक मांडणी आपल्या साहाय्याला येत असते याचा अदमास लागतो-

**स्व-नियमनाचे पाठबळ**

- भावनिक जागरुकता
- जुळवून घेण्याची तयारी आणि क्षमता
- प्रामाणिकपणा आणि विनम्र भाव
- क्रोध नियमन
- सहनशीलता

**अंतर्बंधाची शक्ती**

- करुणा
- पुनर्निर्माणाच्या संधी
- समाजाधार
- क्षमाशीलता
- दातृत्व
- आजोळांशी भावनिक गुंतवणूक
- भूमिकांची अदलाबदल

**अर्थपूर्णता बहाल करणाऱ्या शक्ती**

- हेतू/ ध्येय
- आशावाद
- अध्यात्म
- नातेबंध
- कुटुंबाधार
- नैतिकता

**बाल्यावस्थेत अपेक्षित असणारे संरक्षण इथे तीन गट होतात-**

**(१) व्यक्तिगत**

- शारीरिक वाढ
- शैक्षणिक कर्तृत्व
- स्वतःवरचा विश्वास
- समस्या निवारण, परिस्थितीशी जुळते घेणे
- भावना नियंत्रण

**(२) कुटुंब**

- मर्यादा, नियम, नियमन
- नात्यांचे आधार
- वर्तन आणि नीतिमूल्यांच्या स्पष्ट अपेक्षा

**(३) शाळा /परिसर**

- क्षमता-विकसन, आवडत्या क्षेत्रांमध्ये पदार्पण
- मार्गदर्शक
- शाळेतील सहभाग
- सकारात्मक वातावरण
- सुस्पष्ट जीवनहेतू
- शारीरिक आणि मानसिक सुरक्षा

**मानसिक निरामयतेमधील भूमिका**

शुश्रूषा करणाऱ्या व्यक्ती, सामाजिक कार्यकर्ते, प्रशिक्षक आणि परिस्थितीशी झगडणाऱ्या व्यक्तींसोबत काम करणाऱ्या सगळ्यांसाठी मूल्यांकन प्रक्रियेचा एक भाग म्हणून मानसशास्त्रीय संरक्षक रचना उपयुक्त असते.

लायोस, चॅन्सलर म्हणतात- आनंदी व्यक्तींमध्ये मानसिक व्याधी कमी असतात. समाधान, कृतकृत्यता असलेल्या व्यक्तींना चिंता, निराशा, खिन्नमनस्कता अशा नकारात्मक भावनांना कसे हाताळायचे याचे उपजत ज्ञान असते.

एकाकी, वेदना आणि निराशावादाने घेरलेल्या व्यक्तींना प्रतिकूल प्रसंगांमधून उदभवणाऱ्या तीव्र दुःखांचा सामना करण्याची शक्ती समाधानी प्रवृत्ती मांडून मिळते. आरोग्याच्या समस्यांशी झुंजणाऱ्या लोकांची संख्या दिवसेंदिवस वाढतेय. त्यामुळे सकारात्मक वातावरणात भावना, वर्तन आणि विचारांचे उन्नयन केले तर मनःस्वास्थ्य सुधारते, विकारांची तीव्रता कमी होते. कामामध्ये, निरामयतेमध्ये सुधारणा दिसू लागतात आणि जोखिमीची भीती उणावते.

सकारात्मकता नवनिर्मितीला प्रोत्साहन देत, समस्या सोडविण्याची क्षमता वाढविते. मानसिक सुरक्षा वाढवायची असेल तर

- कृतज्ञता जाहीररीत्या व्यक्त करणे
- आशीर्वादांची मोजदाद करणे
- आशावादाची जोपासणी करणे
- कनवाळू वृत्तीची जोपासना करणे
- सामर्थ्याचावापर करण्याचे नवे मार्ग शोधणे
- व्यक्तीमूल्यांना सर्वोच्च प्राधान्य देणे
- ध्यानात स्वतःवर लक्ष केंद्रित करणे
- स्वायत्तता विकसित करणे


या मार्गांनी मनःसामर्थ्य वाढते आणि नव्या जोमाने व्याधींशी सामना करण्याची तयारी होते. हे संक्षिप्त, सोपे आणि अजिबात खर्चिक नसते.

जागतिक कोरोना समस्येने ग्रस्त झाल्यावर काही वर्षांनी आपण सुटकेचा निःश्वास टाकलाच. त्यातून स्वतःमधील सामर्थ्याचा शोध लागला. आपल्यापैकी प्रत्येकाकडे असे संरक्षक कवच असते, कधी ते उपयोगात येते तर कधी न वापरता ते तसेच पडून राहते. पण शेवटी आयुष्याच्या नक्षीत त्यांचे तुकडे नजरेस पडतातच आणि पश्चात्ताप होऊ शकतो- स्वतःजवळील आयुधांचा वापर न केल्याची हळहळ आपल्याला व्यापून उरते. अधिक चांगले आयुष्य व्यतीत करता आले असते याची चुटपुट लागून राहते. चांगल्या घटितांना जवळ करणे आणि त्रासदायक प्रसंगांमधून अलगद बाहेर पडणे यातून नवे अध्ययन जमू लागते. कला कधीच परिपूर्ण नसते, पण जी आहे ती सुंदर आणि आनंददायी नक्कीच असते.

कोणे एके काळी
स्वाती काळे (कोलारकर)

# नदीतमा...

अनादि अनंत काळापासून नदीच्या काठावर समृद्धी आणि संस्कृती एकत्र नांदत आहेत. तिच्या तळाशी मानवी इतिहासाचे अवशेष विखुरलेले आहेत आणि तिच्या धीरगंभीर प्रवाहात भविष्याचे अबोध पडघम ऐकू येत आहेत. बहुतांश मानवी वसाहती नदीच्या काठावरच फुलल्या. काठावर वसलेल्या छोट्या छोट्या खेड्यांचे जनपदांमध्ये रूपांतर झाले. त्यांची पुढे मोठी मोठी राज्ये विकसित



न**दीः पिबन्ति बहुला गंगां सिन्धुं सरस्वतीम्। गोदावरी नर्मदां च बाहुदां च महानदीम्॥** ऋषीचे कुळ आणि नदीचे मूळ विचारू नये म्हणतात. पण नद्यांच्या जन्म कथा, त्यांचे एकमेकींशी होणारे रुसवेफुगवे, तरीसुद्धा त्यांची एकमेकींना भेटण्याची उत्कट ओढ, मनुष्याला समृद्ध करण्याची अखंड धडपड हे सगळं जेवढे अद्भुत, अगम्य तेवढेच अतिशय जिवंत आणि लोभसवाणे आहे. नद्यांच्या प्राचीन इतिहासामध्ये लोकभावनांची विलक्षण गुंफण आहे आणि म्हणूनच नदीकाठी असलेल्या राऊळातली घंटा किणकिणली की, डोळ्यात नकळत गंगा यमुना उभ्या राहतात. गंगा यमुनेबरोबर सरस्वतीचेही नाव आपसूक ओठांवर येते. सरस्वती नदी लुप्त आहे खरी; पण अबोल सतारीची तारच खरं तर हृदयाला खोलवर छेडते. प्रयागराज घाटावरच्या प्रचंड गजबजाटातही लुप्त सरस्वतीचे अगम्य अस्तित्व आपल्याला जाणवते. तिच्या काठावर वसलेल्या अति प्राचीन संस्कृतीच्या गाथा तिच्या अद्भुत पात्रातून अलगद वर येतात आणि आपल्याशी गुजगोष्टी करतात.

ऋग्वेदात सरस्वती नदीला उद्देशून तीन सूक्ते आहेत. तिच्या खळाळणाऱ्या प्रचंड प्रवाहाचे वर्णन ऋग्वेदात असे केले आहे- 'गजराजाने कमळ उपटावे त्याप्रमाणे आपल्या प्रचंड प्रवाहाने व खळाळत्या लाटांनी ही पर्वतांचे कडे उचलते. हिचे सामर्थ्य अपार असून ही अजिंक्य आहे. ही तेजस्वी जलधारांनी खळखळ आवाज करीत जाणारी, उदकपूर्ण नदी आमच्या सर्व शत्रूंना व्यापून टाको.' आश्चर्य म्हणजे याच सूक्तातील शेवटच्या ऋचा मात्र वेगणघा आहेत. ही नदी आटत चालली आहे का, अशी शंका याच सूक्तातली शेवटच्या ऋचा वाचून येते- 'तुझ्या अंगावरील दूध तोडून आम्हाला दुर्बल करू नको. आमचं कोडकौतुक कर आणि तुला सोडून भलत्याच देशात जाणे आम्हाला भाग पाडू नको.' (६.६१.१४ ऋग्वेद). आई दिसली नाही म्हणून लहान मुलाच्या व्याकुळ रडण्याची आठवण ही ऋचा वाचताना वारंवार येते. वेदोत्तरकालीन वाङ्मयात कुरुक्षेत्र येथे सरस्वती नदी गुप्त होते; त्या स्थानाला 'विनशन' असे म्हटले आहे. 'लाट्यायन श्रौत सूत्रात' असे म्हटले आहे की, सरस्वती नदीचा सुरुवातीचा भाग आणि शेवटचा भाग सर्व लोकांना दिसतो, पण मध्यभाग भूगर्भात गुप्त होऊन वाहत आहे, त्याला विनशन असे म्हणतात. (१०.१५.१) डॉ. डी. एन. वाडिया आणि दासगुप्ता या विद्वानांच्या मते ऋग्वेदात वर्णन केलेली सरस्वती नदी पूर्ववाहिनी होऊन गुप्त झाली आणि प्रयाग क्षेत्रात गंगायमुना संगमाला मिळाली.

'सरस्वती नदी शोध अभियान' १९८५ मध्ये आयोजित केले होते. या अभियानाचे प्रमुख संयोजक कै. डॉ. वि. श्री. वाकणकर होते. अभियान यात्रेने निष्कर्ष काढला की, वैदिक सरस्वती नदी हिमालयातून आदिबद्रीज जवळून सपाट प्रदेशात बाहेर येते. तेथे तिची रुंदी सहा ते आठ किलोमीटर एवढी महाकाय होती. नंतर ती पश्चिमेकडे काठघरकडे वळून हरयाणातून अनुपगड, सुरतगडपर्यंत वाहात सिंध प्रांतात दक्षिण दिशेकडे वळून कच्छच्या रणात संपत होती. त्यानंतरही अनेक संशोधकांनी लुप्त सरस्वतीवर संशोधन केले. तिच्या मार्गाचा अभ्यास केला. डॉ. विमल घोष, डॉ. कार, डॉ. हुसेन या अभ्यासकांनी निष्कर्ष काढला की, कधीतरी वैदिक सरस्वती नदी पूर्व राजस्थानच्या भूमीवरून अधिक पूर्वेच्या बाजूने वाहत असावी. ऋग्वेदात नदीतमा म्हणजे सर्व नद्यांमध्ये सर्वात मोठे पात्र असलेली सरस्वती नदी आज भारताच्या नकाशात लुप्त झाली. पण भाविकांच्या मनामनातली ही नदीतमा सरस्वती तिच्या शांत धीरगंभीर अद्भुत प्रवाहात युगानुयुगे सर्वांना सामावून घेत आहे. या लुप्त सरस्वतीच्या काठी असलेल्या आपल्या पूर्वजांच्या प्राचीन वसाहती आणि तेथे नांदणाऱ्या प्राचीन संस्कृतीचे मनोरम प्रतिबिंब तिच्याबद्दल ऋग्वेदात वर्णन केलेल्या खळाळत्या प्रवाहात पडलेले दिसते.

पाण्याला आठवण असते म्हणतात. मनाची ओंजळ करावी आणि लुप्त सरस्वतीचं पाणी अलगद धरावं. आपल्या प्राचीन संस्कृतीचा तळ आरसपानी दिसतो. सरस्वती नदीच्या समयसूचकतेची एक लोभस गोष्ट आहे. वसिष्ठ विश्वामित्र यांचे एकदा जोरदार भांडण झालं. विश्वामित्रांनी सरस्वती नदीला आदेश दिला की, तिच्या काठी असलेल्या आश्रमाशेजारी वसिष्ठाला घेऊन यावे. विश्वामित्राला वसिष्ठ ऋषींना मारायचे होते. सरस्वतीची वसिष्ठावर माया होती. विश्वामित्राची मात्र तिला भीती वाटत होती. त्यामुळे विश्वामित्राच्या आज्ञेप्रमाणे तिने वसिष्ठाला प्रवाहित करून आणले, पण जेव्हा विश्वामित्राने त्याला मारण्यासाठी शस्त्र उचलले तेव्हा तिने चपळाईने आपल्या लाटेवर वसिष्ठाला परत दूर वाहून नेले. तिची हुशारी पाहून विश्वामित्राला प्रचंड राग आला. त्याने तिला शाप देऊन रक्तप्रवाही बनवले. पण वसिष्ठाने तिच्यावरचे संकट दूर केले. तिच्या मुळाशी जाऊन पृथ्वीकडे रोखून पाहात वरुण मंत्राचा वापर केला. त्याच्या दोन डोळ्यांच्या सामर्थ्याने दोन प्रवाह बाहेर आले. एक जवळच्या प्लक्ष वृक्षाच्या मुळातून बाहेर पडला. ते रक्त या वृक्षाने अडवले. नदी स्वच्छ झाली.

दुसऱ्या डोळ्याने साभ्रमती नदी निर्माण झाली. त्रिवेणी संगमात सरस्वती सोबत गंगा आणि यमुना या दोन नदीतमांचे मिलन होते. गंगेच्या नितळ महावस्त्राला यमुनेची हिरवीकंच पाचू किनार लाभते आणि दोघीही मनोमन सुखावतात. महाभारतातील भीष्म हा गंगेचा पुत्र. त्याच्या आयुष्यातील कठीण वळणांवर त्याने नेहमीच गंगा मातेशी हितगुज केले. गंगेला वेदकाळापासूनच महत्त्वाचे स्थान होते. शतपथ ब्राह्मणात भरत राजाने गंगेच्या काठी अश्वमेध यज्ञ केला. आदिपर्वात गंगा हिमालयाच्या सोनेरी मुकुटावरून खाली आली आणि तिच्यापासून सप्त नद्या निर्माण झाल्या. महर्षी व्यासांनी गंगेचे पावित्र्य भीष्माच्या आईच्या रूपात गुंफत मातृत्वाचे विलोभनीय रूप गंगा आणि अंबा संवादात दाखवले आहे. ऋग्वेदात तीर्थाचा अर्थ नदीतून चालत येण्याचा मार्ग असा होतो.

प्राचीन वाङ्मयातील तीर्थांचे संबंध यज्ञविधींशी जोडले आहेत. कुरुक्षेत्र, सोमतीर्थ, गंगारूद, कौशिकी, प्रयाग अशा तीर्थांवर राजसूय यज्ञ झाले आहेत. नर्मदा नदीवर एक 'कल्होडी' तीर्थ आहे. एकदा गंगा एका गायीच्या रूपात तिथे स्नान करायला गेली आणि तिथेच ती रमली. एका तीर्थाने दुसऱ्या तीर्थस्थानी जाणे अशा अनेक कथा तीर्थ माहात्म्यात असतात. या कथेवरून नद्यांची प्रतीके साधारणपणे कोणाची तरी मुलगी, पत्नी, बहीण किंवा पशू रूपात असेल तर गाय म्हणून असतात. यामागे नदीचे पाणी हे दूध आहे हा प्राचीन लोकभाव असावा. अंबा भीष्माचा सूड घेण्याच्या उद्देशाने यमुनेत उभी राहून कठोर तपश्चर्या सुरू करते. हे कोणत्या आईला सहन होईल? गंगामाता रागाच्या फणकाऱ्यात अंबेला बोलते, 'अंबे, तू नदी होशील, पण नदीचा धर्म पाळू शकणार नाही. तुझ्या कुशीत वसलेल्या गावांना आणि तीर्थांना तू सुजलाम् सुफलाम् करू शकणार नाही.'

भीष्म पर्वात म्हटले आहे, 'विश्वस्य मातर सर्वाः सर्वाश्चैव महाबलाः' नदी ही विश्वाची जननी आहे. नद्यांच्या भोवतीच सबंध विश्व वसते आणि म्हणूनच गंगामाईला महाभारतातील प्रमुख व्यक्तिमत्त्वाचा म्हणजेच भीष्माच्या आईचा दर्जा मिळाला. शंतनू आणि गंगेच्या प्रणय कथेपासूनच महाभारत पुढे फुलत जाते. भीष्म जन्मानंतरच या गाथेला कर्तव्याची आणि वीरत्वाची झळाळी प्राप्त झाली आहे. गंगेच्या कनवाळू मायेची पखरण महाभारतात जागोजागी झाली आहे. त्याचबरोबर यमुनेच्या पाण्यात उभे राहून उग्र तपश्चर्या करणाऱ्या अंबेची असहाय्य जखम अजूनही युगानुयुगे भळभळते आहे. गंगेचे निर्व्याज प्रेम आणि यमुनेची व्रतस्थ गूढता हा भारतीय संस्कृतीचा आत्मा आहे. या महानद्यांच्या कुशीत वसलेल्या प्राचीन वसाहती, वसाहतींमध्ये उगम आणि उन्नत पावलेली भारतीय संस्कृती आणि विशाल पात्रांमधून वाहणारा आध्यात्मिक वारश्याचा धीरगंभीर प्रवाह हेच माणसाच्या जीवनाचे सार आणि सार्थक आहे. महाभारतात अनेक प्राचीन नद्यांचे उल्लेख आहेत. सुंदर वर्णने आहेत. गंगा, सिंधू, सरस्वती, गोदावरी, नर्मदा, महानदी, बहुदा, चंद्रभागा, द्रिशद्वती, विपाशा या नद्या महत्त्वाच्या आहेतच; पण यमुनेला विशेष स्थान आहे.

यमाची बहीण यमी म्हणजेच आपली यमुना नदी. यमाने तिला वर दिला की, तिच्या धारेत स्नान केल्यावर माणसाला मोक्ष मिळेल. तिच्या काठी गोपींसमवेत भगवान श्रीकृष्णांनी रासलीला केली. यामुळे कृष्णाची प्रेयसी म्हणजे यमुना. रामायणात त्रिवेणी संगमाच्या काठी भारद्वाज ऋषींचा आश्रम होता. रामाला राजवस्त्रांचा त्याग करून सर्वसामान्य जीवन जगायला या नद्यांनी शिकवलं.

महाभारतात पांडव त्यांच्या वनवास काळात याच नद्यांच्या काठी विसावले. अन्यायाविरुद्ध उभे राहण्यासाठी याच नद्यांनी पांडवांना शक्ती दिली. सत्यप्रिय हरिश्चंद्राच्या तपाचे मोल याच नद्यांनी जाणले. श्रीकृष्णाला गोप-गोपिकांच्या भक्तीचे दर्शन यांच्या काठावर झाले आणि धीरगंभीर भारतीय तत्त्वज्ञानाला खोडकर शृंगाराचा साजदेखील काठावरील कदंब वृक्षांच्या सळसळीने दिला. या नदीतमांचे सातत्यपूर्ण स्मरण केले तरी आपल्या प्राचीन इतिहासाचा आणि समृद्ध संस्कृतीचा तळ पुसटसा दिसू लागेल.

विशेष

**अशोक हांडे**



# दिवस आंबा खरेदीचे

**यंदाचा आंबा मोसम भराला आला आहे. या पृष्ठभूमीवर परिपक्व आंबा ओळखायला शिकायला हवं. देठाजवळच्या आंब्याला थोडा खोलगा असेल, खालच्या बाजूने भरलेला असेल आणि त्याच आकाराच्या इतर आंब्यांच्या मानाने थोडा वजनदार असेल, केशरी पिवळा झाला असेल तर निश्चित गोड लागणार आणि पिकल्यावर पाच-सहा दिवस टिकणार याची खात्री बाळगावी. फक्त आंबा विश्वासपात्र दुकानदाराकडून घेतला पाहिजे.**

प्रचंड उष्म्यामुळे उन्हाळा कितीही त्रासदायक वाटत असला, तरी आंब्यासारख्या रसदार आणि मधुर चवीच्या फळामुळे हा ताप सहन करणंही सोपं होतं, असं म्हणता येईल! आंबा हे या काळातलं महत्त्वपूर्ण आकर्षण केंद्र असतं. त्यातही 'हापूस'ची महती वेगळीच. आंब्याच्या विविध जाती असल्या, तरी हापूसला मिळालेली जगन्मान्यता हा अभिमानाचा विषय आहे. पण गेल्या पाच-सहा वर्षांत यावरही मोठं संकट येत आहे. कोकणच्या हापूसवर आलेलं हे संकट म्हणजे कर्नाटकी हापूस! भौगोलिक सीमावादाप्रमाणेच या दोन राज्यांत आर्थिक सीमावाद वाढला आहे.

सध्या तरी कर्नाटक महाराष्ट्रावर मात करताना दिसत आहे. बरं, यातला फरक तरी कसा ओळखावा? मार्केटमध्ये कर्नाटकवरून गाडी आली की तिच्या नंबरप्लेटवरून हा कर्नाटकचा माल, हा गुजरातचा माल, हा रत्नागिरी, हा सिंधुदुर्ग असा भेद कळतो. २०२२ च्या आधी देवगडचे आंबे चक्क पत्र्याच्या ट्रंकेत यायचे. पण हल्ली ते प्लॅस्टिकच्या क्रेटमध्ये येतात. बाकी सर्व ठिकाणी लाकडी खोके किंवा पुठ्याचे बॉक्स असं पॅकिंग दिसून येतं. मार्केटमध्ये प्रत्येक भागातला आंबा सहज ओळखता येतो. कारण देवगडचं पॅकिंग वेगळं, विजयदुर्गचा लाकडी खोका वेगळा, रत्नागिरीचा पिंजरा वेगळा आणि रायगडचे बॉक्स वेगळे. पण एकदा मार्केटमध्ये येऊन माल विकण्यासाठी रिकामा केला आणि सगळा माल एकत्र केला तर त्यातला फरक फक्त जाणकारांनाच कळू शकतो. अन्यथा, प्रत्यक्ष चव घेतल्याशिवाय त्यांच्यातला फरक कळणं अशक्य आहे. कोकणातल्या शेतकऱ्यांनी प्रदीर्घ लढा देऊन 'हापूस' या शब्दाचं भौगोलिक मानांकन मिळवलं आहे. म्हणजे कोकणातल्या पाच जिल्ह्यात जो पिकतो तोच 'हापूस'.

कर्नाटकचा आंबा हापूस म्हणून विकल्यास कारवाई होणार, पण ही कारवाई करणार कशी? मुख्य म्हणजे दोन्हीतला फरक ओळखण्याचा नीर-क्षीर विवेक ग्राहकांना कसा कळणार? पिवळा दिसतो तो आंबा एवढ्यापुरताच अनेकांचा आंब्याचा अभ्यास असतो. मग तो कृत्रिमरीत्या पिकवलाय की शास्त्रशुद्धरीत्या (म्हणजे ईथेलॉन चेंबरमध्ये) असा विचार त्याच्या गावीही नसतो. स्वस्त मिळेल तिथून आंबा घ्यायचा, हा सर्वसामान्य ग्राहकांचा सोपा हिशेब असतो. मग त्यातले दोन-चार आंबे आतून खराब निघाले की काय करायचं? अशा अनेक समस्या ग्राहकांसमोर उभ्या असतात. शिवाय तो उभ्याउभ्याच आंब्याची खरेदी करतो. मला आंब्यातलं फार कळतं, असं दाखवतो. पण आपल्याला आंब्यातलं नेमकं काय कळतं हे त्यालादेखील सांगता येईल का, हा प्रश्नच आहे. आंब्याचा हंगाम सुरू होत असल्याच्या पृष्ठभूमीवर गिऱ्हाईकाची फसवणूक कशी होते ते आता पहा. देवगडचा आंबा ५०० रुपये डझन तर बंगळुरुचा ३०० रुपये डझन आहे असं समजा. फक्त देवगड घेतला तर ५०० रुपये डझन महाग वाटतो, पण दोन्ही एकत्र करून ४०० रुपये दर म्हटल्यावर ग्राहक हसत हसत घेतो. बऱ्याच वेळा काही थोर विचारवंत आरडाओरड करतात की, पहा; इथे रिटेलमध्ये ५०० रुपये भाव घेतात आणि शेतकऱ्यांना मात्र फक्त साडेतीनशे रुपये देतात. दलाल शेतकऱ्यांचे पैसे मधले खातात. म्हणूनच दलाल हटवले पाहिजेत. त्यानंतर मग रिलायन्स, अदानी, फ्रेश फ्रूट असे नवीन दलाल सुरू होतात. आपण फूटपाथवर बसलेल्या भय्याकडे दराची घासाघीस करतो, पण तिथे मात्र 'फिक्स्ड रेट' असतो आणि ग्राहकही तो हसत हसत देतो. कारण मॉलमध्ये फिरून परत आंब्यासाठी दुसरीकडे जाणं त्याला शक्य नसतं. त्यांच्याकडे वेळही नसतो आणि मुख्य म्हणजे मॉलमध्ये फिरून चांगलीच दम छाक झालेली असते. शेतकऱ्याकडून आलेला आंबा कच्चा म्हणजे हिरवा असतो. तो रिकामा करून बारीक मोठा करावा लागतो. त्यात जवळजवळ सरासरी १५ टक्के आंबा खराब निघतो. त्यानंतर तो चेंबरमध्ये पिकवावा लागतो. पाचव्या- सहाव्या दिवशी पुन्हा आंबा फिरवावा लागतो. त्यात पिवळे झालेले आंबे बाजूला काढून राहिलेले हिरवे पुन्हा पिकायला घालावे लागतात. त्यात पुन्हा काही नासतात. ते नुकसानही जवळपास १५ टक्के असतं. अशा प्रकारे एकूण ३० टक्के आंबा खराब निघतो. (अर्थात ते आंबे फ`कून दिले जात नाहीत, पण अगदी अल्प किमतीत विकावे लागतात.) माल घेतल्यापासून दोनदा ग्रेडिंग, सॉर्टिंग होतं आणि तिसऱ्या वेळी आंबा बॉक्समध्ये भरला जातो. यासाठी मजुरांपासून आंब्याची उत्तम पारख असणाऱ्या कुशल कामगारांपर्यंत अनेकांचा समावेश असतो. अर्थातच त्याचा खर्च वाढतो. आंबा पिकविण्यासाठी वेगळे क्रेट लागतात.



ते सहा दिवस इथिलीन चेंबरमध्ये ठेवावे लागतात. त्याचं भाडं साधारण १०० रुपये प्रति पेटी असं असतं. या सगळ्या यातायातीत वाहतूक आणि जागेचं भाडं (मुंबईसारख्या ठिकाणी ते सीझनला पाच ते दहा लाख रुपये कमीत कमी असतं.) भरावं लागतं आणि एवढं करून 'दोन गेले सडून, एक विकेची ना' असाही प्रसंग उभा राहतो. हा सगळा खर्च आंब्याच्या मूळ किमतीच्या सुमारे ५० टक्के आहे. कधी कधी आंबा ३०० रुपये डझन आणि खर्चही ३०० रुपये डझन अशी परिस्थिती निर्माण होते. रिटेल विक्रेत्याची सगळी किंमत ही मात्र कायम असते. तरीही शेतकरी, आडते आणि किरकोळ गिऱ्हाईक यांच्या परस्पर विश्वासावर हा व्यवसाय सुरू आहे. म्हणूनच चांगला आंबा खायचा असेल तर गिऱ्हाईकाला किंमत मोजावीच लागेल. १०० आंब्यातून एक डझन आंबे निवडून दिले तर त्याची किंमत जास्त असणार हे उघड आहे. आंबा विक्रेते किरकोळ गिऱ्हाईकांना जास्त असलेला दर सांगतात, पण शेवटी उरलेले आंबे मातीमोल भावात विकावे लागतात. शेवटी आंबा हे शीघ्र नाशवंत फळ आहे.

थोडक्यात, उत्तम प्रतीचा आंबा हवा असेल तर पैसे मोजण्याखेरीज पर्याय नाही. इथे परिपक्व आंबा कसा ओळ-खावा हेदेखील जाणून घ्यायला हवं. देठाजवळच्या आंब्याला थोडा खोलगा असेल, खालच्या बाजूने भरलेला असेल आणि त्याच आकाराच्या इतर आंब्यांच्या मनानं थोडा वजनदार असेल, केशरी पिवळा झाला असेल तर तो आंबा निश्चित गोड लागणार आणि पिकल्यावरही पाच-सहा दिवस तो टिकणार, याची खात्री बाळगावी. फक्त आंबा विश्वासपात्र दुकानदाराकडून घेतला पाहिजे. आंब्याशी संबंधित आणखी एक मुद्दा शेतकऱ्यांसाठी पायाभूत सुविधा हा आहे. त्याचाही ऊहापोह व्हायला हवा. मुंबई-गोवा महामार्ग पूर्ण झाल्यावर कोकणातल्या आंब्याच्या गाड्यांना प्रवासात दोन तास कमी लागणार आहेत. सरकारने दिंडी महामार्ग केला तसा आंब्याच्या सीझनमध्ये सागरी महामार्ग आंबा महामार्ग म्हणून कमीत-कमी चौपदरी केल्यास आंबा वाहतुकीचे चार तास वाचतील. अशा काही गोष्टी राज्य सरकारच्या हाती तर काही केंद्र सरकारच्या हाती आहेत. वास्तविक, शेतकऱ्यांना आणि शेतमालाला जीएसटी नाही हे खरं, पण शेतकऱ्यांना लागणाऱ्या खतं, औषधं, कीटकनाशक, मशिनरी, अवजारं, प्लास्टिक क्रेट्स या सगळ्यांसाठी १२ ते १८ टक्के जीएसटी लागतो. तो भुर्दंडही कमी करता येईल का, याचा विचार करावा लागेल. पेट्रोल, डिझेलमुळे वाहतूक खर्च वाढला आहेच. थोडक्यात सांगायचं तर, राज्यस्तरीय असो, राष्ट्रीय स्तरीय असो वा आंतरराष्ट्रीय स्तरावर असो; सगळं काही शेवटी शेतकऱ्याला भोगावं लागतं. याचं एकमेव कारण म्हणजे शीघ्र नाशवंत माल. म्हणूनच आता राज्यकर्ते, पणन महामंडळ, एपीएमसी, शेतकऱ्यांचे- आडत्यांचे-वाहतूकदारांचे-हमाल, माथाडी आणि प्रातिनिधिक स्वरूपात ग्राहकांचे प्रतिनिधी घेऊन याचा एकत्र विचार करणं आवश्यक आहे. शेतकऱ्यांच्या मालाचं मोल वाढविण्यासाठी, त्याला येण-ारा खर्च कमी करण्यासाठी आणि अतिशीघ्र नाशवंत असल्यामुळे होणारं नुकसान कमी करण्यासाठी मूलभूत प्रयत्न करणं हाच विचार या फळाची बाजारपेठ वाढविण्यासाठी आवश्यक आहे.

(लेखक प्रसिद्ध निवेदक व आंबा तज्ज्ञ आहेत.)

---

**राज्य घटनेने कलम १४ आणि १५ मध्ये समानतेचे तत्त्व सांगितले आहे; परंतु भारताबरोबरच जगभर रंग, रूप, वर्णावरून भेद केला जात आहे. रंगरूपावरून गुणवत्ता, योग्यता ठरत नाही, हे कानीकपाळी ओरडून सांगूनही वर्णद्वेषामुळे अनेकांना अपमानाला सामोरे जावे लागते. केरळच्या मुख्य सचिव शारदा मुरलीधरन यांना अलिकडे रंगावरून मानहानीला तोंड द्यावे लागले. त्यानिमित्ताने घेतलेला आढावा..**



# वर्णद्वेषी मानसिकतेतून बाहेर कधी येणार?

समाजभान

**जनार्दन पाटील**

काळा रंग कधी रंग बदलत नाही. रंगाऐवजी मनाने सुंदर असायला पाहिजे. काळा रंग अंधारात दिसत नाही तसेच माणसाचे मन चांगले आहे का नाही हे दिसत नसते. दिसण्यावरून किंवा रंगावरून तुलना करणे हा संबंधिताचा अवमान असतो. त्यांच्या कर्तृत्वाला कमी लेखले जाते. सावळा किंवा कृष्णवर्ण म्हटले की, आजही नाक मुरडले जाते. आजही स्त्री सौंदर्य गौरवर्ण, नितळ कांती, सडपातळ बांधा अशा साचेबद्धतेत अडकून पडले आहे. स्पर्धांमध्येही सौंदर्य याच तराजूत तोलले जाते.

सावळा किंवा कृष्णवर्ण म्हटला की नाके मुरडली जातात; पण दक्षिण आफ्रिकेच्या झोझिबिनी तुंझीमुळे सौंदर्याकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलतो. ती मिस युनिव्हर्स ठरली आहे. असे असले, तरी केरळच्या मुख्य सचिवांना अलिकडेच ज्या पद्धतीने रंगावरून मानहानीला सामोरे जावे लागले. त्यावरून अजूनही लोक मध्ययुगीन मानसिकतेतून बाहेर आले नाहीत, हे स्पष्ट होते. सौंदर्य पाहणाऱ्याच्या नजरेत आहे, असे म्हणतात. सौंदर्याची ठरावीक व्याख्या करता येत नाही. गौरवर्ण, उजळ त्वचा ही आयुष्यात यश मिळविण्याची परिमाणे ठरू शकत नाहीत. त्यासाठी लागते ते कर्तृत्व, धमक, क्षमता आणि कौशल्य. अशा असंख्य कर्तृत्ववान महिला आपल्या आसपास आहेत. त्यांचा परिघ विस्तारलेला आहे. सौंदर्याची ठोकळेबाज परिमाणे त्यांच्या कर्तृत्वाच्या आड कधीही आली नाहीत. या महिलांचा चेहरा नाही तर काम बोलते.

विविध सौंदर्यप्रसाधनांच्या गोरे बनवणाऱ्या क्रिम्सच्या जाहिरातींचा सातत्याने मारा होत असतानाही महिलांच्या चेहऱ्यावर झळकणारे त्यांच्या कर्तृत्वाचे, हुशारीचे, बुद्धिमत्तेचे तेज या बेगडी जगाला बरेच काही सांगून जाते. रंग-रूप कोणाच्याही हातात नसते. सार्वजनिक जीवनात नेते किंवा सेलिब्रेटीही त्यांच्या रूपापेक्षा त्यांच्या कार्यावरून आणि कर्तृत्वावरून ओळखले जातात. कोणाशी पटले नाही, म्हणून प्रतिवाद करताना शारीरिक व्यंगावरून छेडणे किंवा रंग-रूपावरून टिंगलटवाळी करणे हे भारतीय संस्कृतीत मुळीच शोभादायक नाही.

रंग-रूपावरून बोलणाऱ्यांना दक्षिण आफ्रिकेतील झोझिबिनी या कृष्णवर्णीय युवतीने 'मिस युनिव्हर्स' किताब जिंकून उत्तर दिले आहे.

२०११ मध्ये अंगोलाच्या लैला लोपेसने असाच इतिहास घडवला होता. दक्षिण आफ्रिका हा वर्णभेदाने पोळ-लेला देश. या देशातल्या कृष्णवर्णीयांनी समानतेच्या हक्कांसाठीअनेक वर्षे लढा दिला आहे. नेल्सन मंडेला यांनी या लढ्याचे नेतृत्व केले होते. त्यामुळे त्याच देशातल्या कृष्णवर्णीय युवतीने 'मिस युनिव्हर्स'सारख्या सर्वात मोठ्या सौंदर्य स्पर्धेचे विजेतेपद मिळविणे ही खूप मोठी गोष्ट म्हटली पाहिजे.

या पृष्ठभूमीवर अजूनही मुख्य सचिव असलेल्या महिलेचे कर्तृत्व पाहण्याऐवजी रंगावरून टिप्पणी केली जात असेल, तर सडकी मानसिकता किती खोलवर रुजली आहे, याचा प्रत्यय येतो. क्रिकेटपटू हरभजन सिंगने 'आयपीएल'च्या कॉमेंट्रीदरम्यान अलिकडेच जोफ्रा आर्चरवर वर्णद्वेषी टिप्पणी केली होती. एका सामन्याप्रसंगी त्याने जोफ्रा आर्चरला 'ब्लॅक टॅक्सी' असे संबोधले होते. या वर्णद्वेषी कॉमेंटनंतर हरभजनला अनेक गोष्टी ऐकाव्या लागल्या.

लंडनमध्ये काळी टॅक्सी वेगाने धावते आणि इथे आर्चरसाहेबांचे मीटरही वेगाने धावते, असे त्याने समालोचन करताना म्हटले. हरभजनच्या या वक्तव्यावर सोशल मीडियावर टीका झाली. त्याला कॉमेंट्री पॅनलमधूनही काढून टाकण्याची मागणी झाली. यापूर्वी २००७-०८ मध्ये ऑस्ट्रेलिया दौऱ्यात ॲण्ड्र्यू सायमंडसनेही हरभजन सिंगवर सिडनी कसोटीमध्ये वर्णद्वेषी टिप्पणी केल्याचा आरोप केला होता. हरभजन सिंगने ॲण्ड्र्यूला म्हणे 'माकड' असे संबोधले होते. हा आरोप त्याला मान्य नव्हता. या आरोपानंतर हरभजन सिंगवरही तीन कसोटी सामन्यांची बंदी घालण्यात आली होती; मात्र बऱ्याच दिवसांनी 'मंकी गेट'चा वाद संपला आणि दोघांची मैत्री झाली. ते दोघेही एकत्र आयपीएल खेळले. भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील क्रिकेट कसोटी सामन्यादरम्यान क्रिकेट समालोचक इसा गुहाने भारतीय गोलंदाज जसप्रीत बुमराहला 'एमव्हीपी' म्हणून संबोधून चुकीचा शब्द वापरला.

त्यावर त्याने दुसऱ्याच दिवशी माफी मागितली. बॉलिवूडमध्येही कृष्णवर्णीय आणि गोरे यांच्यात वाद निर्माण झाले आहेत. फेअरनेस क्रिमच्या प्रमोशनबाबत अभिनेता अभय देओलने एकदा अनेक बड्या स्टार्सवर भाष्य केले होते. यामध्ये त्याने आपल्या सोशल मीडिया पोस्टवर लिहिले होते की, देशातील अनेक कंपन्या काळ्या त्वचेपेक्षा गोरी त्वचा चांगली अशी कल्पना विकत आहेत; पण हे अपमानास्पद, बनावट आणि वर्णद्वेषी आहे.

अमेरिकेत जॉर्ज फ्लॉयड नावाच्या आफ्रिकन अमेरिकन वंशाच्या तरुणाच्या हत्येनंतर बॉलिवूडमध्ये पांढरा- काळा वाद सुरू झाला. भाजपाचे खासदार तरुण विजय हेही वर्णद्वेषी वक्तव्य करताना अडकले होते. त्यांनी एका मुलाखतीत म्हटले होते की, भारतीयांना वर्णद्वेषी म्हणता येणार नाही. कारण ते दक्षिणेकडील राज्यांमध्ये राहणाऱ्यांसोबत राहतात.

या वक्तव्यानंतर विरोधकांनी भाजपाला धारेवर धरले आणि तरुण विजय यांच्याविरुद्ध देशद्रोहाच्या प्रकरणात एफआयआर दाखल करण्याची मागणी केली होती. विजय यांनी आपल्या वक्तव्यावर माफीही मागितली होती. आता शारदा मुरलीधरन यांना काळ्या रंगावरून डिवचल्यानंतर त्यांनी आपल्या पोस्टमध्ये विचारले की, गडद रंगाला वाईट का मानले जाते? काळा रंग हे विश्वा-चे सत्य आहे. ते सर्व काही शोषून घेऊ शकते. हे ऊर्जेचे सर्वात शक्तिशाली भजन आहे. काळा रंग गणवेशाचा असतो. काळ्या ढगातून तर पाऊस बरसतो. गोऱ्या मुलाला काळे तीटच लावले जाते. शारदा यांनी लहानपणाची एक गोष्ट सांगितली. त्यांनी आईला विचारले होते की, 'आपल्याला पुन्हा गर्भात ठेवून पुन्हा गोरे करता येईल का?' लहानपणापासून त्यांना रंगावरून किती मानहानीला सामोरे जावे लागले असेल, याची ही प्रचीती.

लोकांच्या चिडवण्यामुळे त्यांना काळ्या रंगात सौंदर्य आणि मूल्य दिसत नव्हते. त्या गोऱ्या त्वचेकडे आकर्षित झाल्या होत्या. कारण त्यांना वाटत होते की, गोरी त्वचा असलेले लोक चांगले आहेत. त्यामुळे त्यांना त्याची कशी तरी भरपाई करावी लागेल. शारदाजी म्हणतात, भारतात त्वचेच्या रंगाबाबतचे गैरसमज खोल रुजले आहेत. माझी जात सार्वजनिक नसल्याने समाजाच्या जातीय रचनेत मला कोठे ठेवावे, याबाबत लोकांमध्ये नेहमीच संभ्रम होता. 'पहिल्यांदा लोक मी मल्याळी नाही, असे गृहीत धरतात. नंतर माझ्या नावाच्या आधारे त्यांना मी सवर्ण आहे, असे वाटते; पण माझा रंग पाहून ते गोंधळून जातात.

'शारदा यांची ही टिप्पणी आपल्याकडे काम ापेक्षा रंग आणि जातीमध्ये लोकांना किती रस आहे, हे दाखवून देते. नोकरशाहीतही हा भेदभाव दिसून येतो. 'तुम्ही वरच्या पदावर असलात तरी कोण बोलू शकते, कोणाचे ऐकले जाते आणि कोणाकडे दुर्लक्ष केले जाते, हे महत्त्वाचे असते. तुम्ही सत्तेच्या संरचनेच्या शीर्षस्थानी नसाल, तर तुमचा आवाज ऐकायला मिळणे आणखी कठीण होऊन बसते,' ही शारदा यांची प्रतिक्रिया उच्चपदस्थांनाही रंग- रूपावरून कशी मानहानी पत्करावी लागते, हे स्पष्ट करते.

भारतीय समाजात गोरी त्वचा ही सुंदर, स्वीकारार्ह आणि कार्यक्षम मानली जाते तर काळी त्वचा असलेल्यांबद्दल नकारात्मक दृष्टिकोन बाळगला जातो. एका व्यक्तीने त्यांच्या त्वचेच्या रंगाबद्दल अपमानास्पद टिप्पणी केली. माझ्या कार्यकाळाला 'काळा' आणि माझ्या पतीच्या कार्यकाळाला 'पांढरा' असे संबोधण्यात आले. म्हणजेच रंगामुळे त्यांचे काम निकृष्ट आणि पतीच्या श्वेतवर्णामुळे त्यांचा कार्यकाळ सर्वोत्तम म्हटले गेले. पती व्ही. वेणू ३१ ऑगस्ट २०२४ रोजी निवृत्त झाल्यानंतर शारदा मुरलीधरन यांनी मुख्य सचिव म्हणून पदभार स्वीकारला.


१९९० च्या बॅचच्या आयएएस अधिकारी असलेल्या मुरलीधरन यांनी सरकारी सेवेत अनेक महत्त्वाच्या पदांवर काम केले आहे. कुडुंबश्री बचत गट, ग्रामीण विकास मंत्रालयाच्या राष्ट्रीय ग्रामीण उपजीविका अभियान आणि पंचायत राज मंत्रालयात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अशा स्थितीत कामावरून मूल्यमापन करण्याऐवजी रंगावरून करणे त्यांना खटकले आणि त्यावर त्यांनी दिलेले उत्तर सर्वांच्या डोळ्यांमध्ये अंजन घालणारे आहे.

---

## भावना

जगायच्या त्या काठावरची
एक कथा ती लिहून गेली
मातीवरच्या खोल जाणिवा
पाण्यासोबत मुरवत गेली.
श्वास तिचा तो धरून होता
वाऱ्यासोबत गंधित माती
तिच्या उदरातून डोकावताना
हसरी अवखळ प्रगल्भ नाती. होय!
रोपटे जाणिवांचे उमलून आशेचा
किनारा हृदयी त्या
काठाशी पानांसोबत जगणे,
हसणे कृतार्थ होई. तिच्या काठाशी
मम हृदयाचा श्वास गहिरा
पेरून होता कळी भावना रुजवून
जगाशी संवाद निखळ उद्याचा जेता.
बंद कोशात प्रगल्भ कथा
ती प्रवाहातले जगणे होते
आज उद्याचे निखळ वागणे
तिच्या ठायीच उरणे होते.
व्यक्त सुमनांची गाथा सारी
वाऱ्यासोबत गंधित होती
आयुष्याचे कथन जगाशी सांग
म्हणाया मातीतच उरली.
सांगते, सांधते, वागते मुलागत
जाणिवांची ती खोल साधना कथा
अनंत तिच्यात उरते अन् विरून
जाते फूलभावना..

**श्रद्धा राऊत बुरले**




मी मज हरपून बसले गं...
कशी मी मज हरपून बसले
ऽऽगंऽऽ मी मज हरपून.....
आज पहाटे त्या गंधाने
घर पुरते हे सुरभित झाले....
गाढ झोपेमधेच अवचित
माझिये मन मोहरले ग...
मी मज हरपून........(१)
तो सुवास करी कस्तुरीवत
पळभरातच सारे मोहित वाऱ्याच्या
त्या हिंदोळ्यावर सुगंध सदनी
दरवळलाऽगंऽऽ...
मी मज हरपून........(२)
त्या केसर पिवळ्या रंगाने
रविकिरणासम घर लखलखले गं
दिसला मग तोऽऽऽ
दिसला मग तो राजा फळांचा
अन् लोचन मम सुखावले गं
मी मज हरपून........(३)
आम्रफलास त्या पाहून गं
मी मज हरपून........(४)
आम्र-ऋतू-शुभेच्छा!

**रेखा लक्ष्मण मोघे**